मासिक

# शिक्षण यात्री

वर्ष:५ वे अंक: ३ रा मार्च २०२० किंमत:६० रुपये

महिला दिन विशेषांक
२०२०



## उंच माझा झोका...

# A BOARDING SCHOOL WITH ENDLESS OPPORTUNITIES

## ADMISSIONS OPEN FOR 2020 - 2021



## KEY FACILITIES

SMART CLASSROOM | HORSE RIDING | HOSTEL | FOOTBALL | SKATING | MUSIC | SWIMMING

**Quality Education | Trained Teachers | World Class Infrastructure | Highly Secured Residential Facilities | Hygienic & Nutritious Food | State of the Art Music Rooms | Excellent Playgrounds & Sports Facilities | Spacious Air Conditioned Auditorium | Focus on Overall Development | Speech & Drama**

SHRI VILE PARLE KELAVANI MANDAL'S

**Mukesh R. Patel School (CBSE)** Affiliation No 1130530

Ankleshwar - Burhanpur Highway, Shirpur - Chopda Road, Tande, Tal: Shirpur, Dist: Dhule 425405

Tel: 9067595936 / 95521 93001 / 88063 63306 Email ID: mrpslearning@gmail.com Website: www.mrpschoolshirpur.com

SVKM

SVKM'S NMIMS Deemed to be UNIVERSITY

MADNCRAZY_014/20-21

|| समस्त नारी शक्तिच्या सशक्तिकरणास शुभेच्छा ||

# दि शिरपूर मर्चंटस् को-ऑप. बँक लि,शिरपूर

## बँकेच्या सुविधा

| | | |
|---|---|---|
| प्रशिक्षित व सेवाभावी कर्मचारी वृंद | सतत अ वर्ग | वातानुकुलित बँक |
| संपूर्ण संगणकीकृत | ५०% सोलर पॉवर वापरणारी एकमेव बँक | गुंतवणुकीत भरघोस वाढ |
| वीज बिल भरणा केंद्र | अविरत ७१ वर्षांची अखंड सेवेची परंपरा | लॉकर्स सुविधा उपलब्ध |
| तत्पर सेवा व अद्ययावत सुविधा | भारताचे रूपे नेटवर्कशी | विविध समाजहिताचे उपक्रम |
| सभासदांसाठी मृत्यूंजय फंड योजना | त्वरीत सोने तारणावर कर्ज सुविधा | |

सभासदांना रू.१५०००० /- चे अपघाती विमा संरक्षण

सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दरवर्षी गौरव

ए.टी.एम.,सी.डी.एम.,आर.टी.जी.एस.,एन.ई.एफ.टी, संलग्न कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढण्याची सुविधा

## सभासद व ग्राहकांचा जिव्हाळा 'आपली बँक मर्चंट बँक'

### बँकेची प्रगतीची वाटचाल
### (३१-०३-२०१९ अखेर (आकडे लाखात)

| | | | |
|---|---|---|---|
| वसुल भागभांडवल | -२४७.२९ | राखीव व इतर निधी | -९१८.४२ |
| गुंतवणूक | -३०५६.४२ | ठेवी | -११९४७.२२ |
| कर्जे | -७९५१.७० | खेळते भागभांडवल | -१२४५०.६४ |
| नफा | -५६.४१ | | |

### बँकेचे ठेवीचे दर

| | |
|---|---|
| ४६ ते ९० दिवस | ६ % |
| ९१ ते १८० दिवस | ६.७५% |
| १८१ ते ३६५ दिवस | ७% |
| १३ महिनेवरील | ८ % |

## संचालक मंडळ

**मा.श्री.प्रसन्न जयराज जैन (अध्यक्ष), मा.श्री. काशिनाथ सोमा महाजन (उपाध्यक्ष)**

| | | |
|---|---|---|
| मा.श्री. राजेंद्र शि.पंडीत | मा.श्री.तुषार वि.रंधे | मा.श्री.मनोज ओ.अग्रवाल |
| मा.श्री.नवनीत गि.राखेचा | मा.श्री.महेश जयराम लोहार | मा.श्री. सहेबराव भि.महाजनमा. |
| श्री.केवलसिंग बा.राजपूत | मा.श्री.मुकेश ता.अग्रवाल | मा.श्री.किरण य.दलाल |
| मा.श्री. रामचंद्र उखा ठाकरे | मा.श्री.विनोद शां.चावडा | मा.सौ पूनम रा.भंडारी |
| मा.श्रीमती स्मिता व.कोठारी | श्री.शाम गो.जैन (मॅनेजर) | श्री.संजय के.कुलकर्णी (असि.मॅनेजर) |

जागतिक महिला दिनाच्या सर्व माता, भगिनींना हार्दिक शुभेच्छा !

महिलांसाठी गृहकर्ज कमी व्याजदरात उपलब्ध सोबत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सबसिडी उपलब्ध

# दि हस्ती को-ऑप. बँक लि.

An ISO 9001-2015 Certified Bank — Since 1971

मुख्य कार्यालय-'हस्ती सहकार दिप' स्टेशन भाग दोंडाईचा जिल्हा-धुळे (महा) ४२५४०८ फोन नं.०२५६६-२४४८०६

विनम्र व तत्पर सेवा, कार्यक्षम, पारदर्शक अनुभवी व तज्ञ व्यवस्थापनतसेच खातेदारांची प्रगती व्हावी ही भावना असणारी बँक

३१ डिसेंबर २०१९ अखेर बँकेची अद्यावत आर्थिक स्थिती (रुपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| खपलेले भाग भांडवल- ८९६.३७ | स्वनिधी- ९०८६.६२ | ठेवी- ७४०७७.४७ |
| कर्जे- ४२७३९.२५ | निव्वळ नफा- ९१९.६५ | एकुण व्यवसाय- ११६८१६.७२ |
| सी.आर.ए.आर.-१८.४५ टक्के (किमान ९ टक्के आवश्यक) | | नेट एन.पी.ए.- ०.०० टक्के |

आधारस्तंभ कै.श्री.कांतीलालजी जैन

संस्थापक कै.श्री.हस्तीमलजी जैन

## विनम्र व पारदर्शी सेवेची ४९ वर्षांची परंपरा

### ग्राहकांसाठी सेवा सुविधा

- बँकेच्या सुरुवातीपासून म्हणजे १९७१-७२ पासून आज तागायत सतत बँक नफ्यात
- स्थापनेपासून ऑडीट 'अ' वर्ग
- ई.कॉम
- आर.बी.आय चे ग्रेड १ गटात बँकेचा सातत्याने समावेश
- बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्यात
- एस.एम.एस. अलर्ट सेवा
- बँकेसोबत पर्यावरण साधणारी बँक
- कोअर बँकिंग अंतर्गत कोणत्याही शाखेत व्यवहार करण्याची सुविधा
- क्यु आर कोड
- नॅच अंतर्गत शासकिय निधी बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करण्याची सुविध
- मोबाईल ॲपची सुविधा
- लॉकर्स सेवा उपलब्ध
- आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. सुविधा
- पॉज्ची सुविध
- सर्व २१ शाखेत ए.टी.एम.सुविधा
- Rupay डेबिट कार्ड सुविधा
- प्रधानमंत्री जीवन ज्योती तथा सुरक्षा बीमा योजना उपलब्ध
- पॅन कार्ड सुविधा
- यु.पी.आय.
- फास्ट टैग रिचार्ज
- नेट बँकिंग
- विविध शासकिय कर भरण्याची सुविधा
- विविध कर्ज योजना ( माफक व्याज दरात )
- विविध ठेव योजना (आकर्षक व्याज दरात)

*नियम व अटी लागू

**हाऊसिंग कर्ज**

पंतप्रधान आवास योजने अंतर्गत कर्ज व्याजदर निगडीत अनुदान उपलब्ध

महिला अर्जदार ०८.७५%* | पुरुष अर्जदार ०८.९५%*

**सुलभ वाहन कर्ज योजना**

वाहन कर्ज (हायरपर्चेस)
नवीन वाहन स्टँडर्ड १ - ०९.९५%*
कमर्शियल जड वाहन ६ चाकी ०९.९५%*

**सॅलरी लोन**

व्याज दर ११.९५%*

**प्रोफेशनल कर्ज**

डॉक्टर्स, सी.ए., आर्किटेक्ट, इंजिनिअर इ.करीता तात्काळ कर्ज उपलब्ध व्याजदर १०.९५%*

**UPI सुविधा**

Welcome to BHIM
दि हस्ती को-ऑप बँक लि.
Pay Online — Scan & Pay — Money Transfer
ऑनलाईन पैसे पाठविण्याची सुविधा

**ATM व डेबिट कार्ड**

देशभरात कुठल्याही बँकेच्या ATM मधून पैसे काढण्याची सुविधा

**शैक्षणिक कर्ज**

१० लाख पर्यंत ११.००%*
१० लाखाच्या वर १२.००%*

**लॉकर्स सेवा उपलब्ध**



**१७ राष्ट्रीय व १६ राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित**




"आमची प्रतिज्ञा, तुमची प्रगती"


Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक –२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

Pragati Arts Shirpur 8421356261

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक
वर्ष : ५ वे
अंक:३रा  मार्च २०२०

● अतिथी संपादक ●
शिल्पा प्रसन्न जैन

● मानद संपादक ●
सुभाषदादा कुलकर्णी

● कार्य.संपादक ●
संदेश नंदकिशोर हजारे

● संपादन सहाय्य ●
प्रा.डॉ.माधव कदम
युवराज माने

● प्रतिनिधी सहाय्य ●
**पुणे**- रमेश काळे, **मुंबई**- जयपाल गिरासे, **नाशिक**-किरण पाटील, **सोलापूर**- उमेश काळे, **औरंगाबाद**- रवि गारूडकर, **परभणी**- युवराज माने, **जळगांव**- प्रविण माळी, **नंदुरबार**- तुकाराम धनगर, **अमरावती**- रूपेश माने, **कोल्हापूर** - गुलाब बिसेन,

● मुखपृष्ठ ●
साभार आंतरजाल...

● अंक मांडणी ●
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

• लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
• पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
• सर्व दावे शिरपूर न्यायक्षेत्रांतर्गत

# सं वा द की य



आज ८ मार्च महिला दिवस. महिलांच्या सन्मानाचा, सशक्तिकरणाच्या चर्चेचा हा दिवस. परंतू महीलांचे सशक्तीकरण झाले पाहीजे वैगेरे ह्या गोष्टींकरता आपण प्रयत्न करावेत अस म्हणतात. आपल्याला हे सशक्तीकरण म्हणजे नेमके काय हे जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. स्त्रीयांनी जीन्स घालावी, केस कापावे, मेकअप करावा, पुरूषांना कमी लेखावे म्हणजेच स्त्री सशक्तीकरण आहे. असे हळुहळु आपल्या मनात रूजायला लागले आहे. परंतू माझ्या मते सुंदर, गौर वर्ण, पतली, कमनीय बांधा ही स्त्रीची व्याख्या नव्हे किंवा ही स्त्री नाही. हे तर पाश्चात्यांचे अंधानुकरण आहे. स्त्री म्हणजे धैर्य, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे आदीशक्ती तर पुरूष हा देखील प्रत्येक वेळी तीची शक्ती बनणारा नारायण आहे. समाजात आजही काही ठिकाणी स्त्रींवर अन्याय, अत्याचार व मारझोड होते हे मी डोळ्यांनी बघितले आहे परंतू त्या अन्याया वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि जो निर्णय घेतला त्याला सिध्द करण्याची जिद्द म्हणजे सशक्तीकरण! येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्याची व त्या अनुषंगाने स्वत:साठी एक उत्तम जीवन, एक व्यक्ती म्हणून आदर, स्नेह, प्रेम व आनंद मिळवण्यासाठी मोठ्या हिमतीने केलेला प्रयत्नच आपले जीवन बदलू शकतो ही प्रबळ इच्छाशक्ती म्हणजे स्त्रीत्व.

ज्यांनी आयुष्यातील प्रत्येक संकटाशी दोन हात केले. हाय हाय आता काय करू? म्हणून रडत बसल्या नाहीत तर ह्यातून बाहेर पडून स्वत:ची अस्मिता कशी जपू? स्व ला कसे घडवू ह्याचाच विचार केला व यशस्वीरित्या आज एक सुंदर व्यक्तिमत्व, एक नारीशक्ती म्हणून आपल्या सर्वांसमोर आदर्श प्रस्थापीत केला अश्या सावित्रीच्या लेकींची ओळख उंच माझा झोका या अंकातून होत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे.

जयश्रीबेन पटेल यांनी समाजाची केलेली सेवा व प्रत्येक बाबतीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांची समाजकल्याणाची वृत्ती व समयसुचकता कौतुकस्पद आहे.

झी २४ तास या सुपरिचित वृत्त वाहिनीच्या वृत्तनिवेदिका म्हणून काम पाहणाऱ्या शैलेजा जोगल यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून चालवलेले प्रबोधन उल्लेखनिय आहे.

नंदाताई हरम यांनी जीवनातील प्रतिकुल परिस्थितीने खूचन न जाता प्रामाणिकपणा व काहीतरी करून दाखविण्याचा विश्वास व त्यासाठी पडतील

ते कष्ट सहन करण्याची तयारी अशा आभुषणांनी, रत्नानी ज्यांचे जीवन शोभायमान आहे. वसुंधराताई यांची जीवनात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द तसेच आलेल्या प्रसंगावर (बिकट) रडत बसण्यापेक्षा ती परिस्थिती बदलुन हवे ते साध्य करण्यासाठीची तळमळ माझ्या सर्व सखींना नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

सीमाताई रंधे ह्यांचा जीवनप्रवासात आपल्याला जाणवते की कुंटुंबाची साथ असेल तर एक स्त्री उत्तम गृहीणी सोबत उत्तम समाजकार्य देखील करू शकते. आशा पंडीत गजरे यांचे समस्यांनी भरलेले आयुष्य परंतू कुठलाही सन्मान किंवा बोनस किंवा बढती मिळवण्यासाठी नव्हे तर लहान बाळांच्या चेहऱ्यावरील हास्याला, आरोग्यास प्राधान्य दिले व त्यासाठी अथक परिश्रम घेतले. विजया कैलास हिरेमठ वाचाल तर वाचाल हे फक्त बोलून दाखवत नाही तर त्यासाठी कृती शील आहेत. महामहीम अब्दुल कालमांच्या स्वप्नाला एक सुंदर आकार (वाचनप्रेमी वाचनालय) देतात.

गीताजंली कोळी दारूमुळे उध्दवस्त झालेला संसार व त्याचे ओंगाळ स्वरूप बघून हादरल्या व आपल्या सर्व माताभगिंनी च्या जीवनात आंनदरूपी इंद्रधनुष्योच रंग भरण्यासाठी मार्गक्रमण करू लागल्या. व करत आहेत. सुरेखा दसरे यांनी आर्थिक विवंचनेला बळी न जाता स्वत: संधी शोधली, बँक ऑफ इंडियाच्या शाखेत जाऊन शैक्षणिक कर्ज मिळवले व संधीचे सोने केले.

मोनीका मेहता हे हसरे, गोड निस्वार्थ व्यक्तीमत्व असून नेहमी इतरांसाठी झिजण्यास तयार तसेच हिंदूसंस्कृतीला साजेशे कुंटुंबवत्सल असून. स्वप्नपूर्ती साठी ध्येयवेडी झालेली व आपल्या कलेला समाजात उत्तम दर्जा निर्माण करून देणारी नारीशक्तीचे उदाहरण आहे. वनमालाताई यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ज्यावेळी दिशा ठरवता येत नाही तेव्हा दिपस्तंभाच्या आधाराने वाटचाल करत ध्येय गाठणाऱ्या जहाजा समान मार्गदर्शन करतात. आपल्यासारख्या सर्व सखींना त्यांची जीवनगाथा एका दिपस्तंभाप्रमाणे साथ देईल व समाजाला देखील प्रेरणादायी ठरेल.

रजनीताई लुंगसे यांना पाहून जाणवते साधी राहणी व उच्च विचारसरणी, आपल्या वाक्‌चार्तुयाने नष्ट होत चाललेल्या कुंटुबव्यवस्थेला जिवंत करणारी संजीवनीमंत्र देणारी गुरूमाऊली! अनुपमा तवर एक उत्तम कवियित्री आहे व स्वत:च्या वागण्या बोलण्यातून इतरांमध्ये सकारात्मकता वाढवते. सुचिता सिसोदीया यांनी सोप्या भाषेत विविध कायद्यांची दिलेली माहीती गरजू सखींना उपयोगी होईल. मनिषा देवेंद्र पाटील यांनी तब्येतीचे निमित्त न दाखवता समाजासाठी जे शक्य आहे ते करण्याचे दाखवलेले धाडस स्त्रींयाना मार्गदर्शक ठरणार आहे. संगिता थोरात स्वत:च्या ज्ञानाचा अंहकार न बाळगता साधी राहणी, साधे वागणे असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे.

जिला देवाने नव निर्मितीची, सर्जनशीलतेची शक्ति बहाल करुन या अफाट विश्वासत पाठवले ती असहाय असूच शकत नाही. आपल्या आनंदाचे कारण आपण स्वत:च असतो ते कारण बाहेर शोधण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. तसेच दु:खाचे कारणही आपणच असतो त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न न करता आपण इतरांना दोष देत असतो. परंतु असे डेली सोपीक रडण्यापेक्षा आजूबाजूला डोळे उघडे ठेवून वाटचाल करणाऱ्या महिलांचा आदर्श घ्यावासा वाटतो. म्हणूनच स्वत:ची अस्मिता जपून स्व ला घडवणाऱ्या यशस्वीरित्या जिवन जगणाऱ्या सुंदर व्यक्तिमत्व व नारी शक्ति म्हणून आपल्या समोर आदर्श प्रस्तापित करणाऱ्या या सर्व सुवर्ण कन्यांना मी शत-शत अभिवादन करते व विविध क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविणाऱ्या या तारकांच्या समुहापुढे नतमस्तक होते.

महिला दिनाच्या सर्व महिलांना हार्दिक शुभेच्छा!

अतिथी संपादक

**शिल्पा प्रसन्न जैन**

या अंकाच्या अतिथी संपादक शिल्पा जैन या एम.एस्सी. (स्टॅटेस्टीक) असून त्यांच्या लेखणीतून समर्पण - कथा संग्रह, प्राचीन जैन मंदिर इतिहास शताब्दी स्मरणांजली, भाव माझ्या मनाचे कविता संग्रह साकार झाले असून त्यांनी आकाशवाणीवर युवावाणी व साहित्य सखी कथा-कथन सादर केले असून अनेक शाळा, कॉलेज, धार्मिक कार्यक्रमात प्रेरक वक्ता म्हणून मार्गदर्शन करीत असतात. संपर्क नं. ९०७५५९५९३९, ७४९८९३१२९३

# उंच माझा झोका...

**जयश्रीबेन पटेल उच्चपदावर आरूढ उच्च दिद्याविभूषीत तसेच आर्थिक सुबत्ता यांचा उपयोग समाजातील स्त्रीयांचे शिक्षण, त्यांचे आरोग्य तसेच तळागळातील लोकांच्या कल्याणासाठी स्वत:चा वेळ, स्वत:चे कौशल्य व स्वत:ला संपूर्ण समर्पित केले त्यांच्या या कार्यकुशल नेतृत्वाला माझा सलाम!**



सौ.जयश्रीबेन अमरीशभाई पटेल
नगराध्यक्षा
शिरपूर/मुंबई
०२५६३-२५५०४२

शिरपूर (धुळे) वरवाडे नगरपरिषदेच्या पहिल्या लोकनियुक्त महिला नगराध्यक्षा म्हणून सौ. जयश्रीबेन अमरिशभाई पटेल यांना बहुमान मिळाला.

त्यांचा जन्म दि. १ सप्टेंबर १९५५ रोजी दिल्ली येथे झाला. माउंट कॅरमल कॉन्व्हेंट इंग्लिश स्कूल भागलपूर (बिहार) व सुंदरवती महिला महाविद्यालय दिल्ली येथे त्यांचे शिक्षण झाले. लग्नानंतर गृहिणी म्हणून त्या शिरपूर येथे अनेक वर्षे राहिल्या. त्यानंतर मुला-मुलींच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी मुंबई येथील घरी वास्तव्य केले. पटेल परिवारातील त्या पहिल्या महिला आहेत ज्यांनी सुरुवातीलाच नगराध्यक्षपदाचा बहुमान प्राप्त केला. शिरपूर वरवाडे नगर परिषदेच्या माध्यमातून आमदार अमरिशभाई पटेल यांनी सुद्धा राजकीय जीवनाचा प्रारंभ केला होता. त्यांचा राजकीय वारसा त्यांच्यानंतर नगरपालिकेच्या माध्यमातून त्यांचे लहान बंधू भूपेशभाई पटेल यांनी व आता त्यांच्या धर्मपत्नी जयश्रीबेन पटेल यांनी पुढे नेण्याचे काम केलेले आहे.

जयश्रीबेन पटेल यांना सामाजिक कार्याची विशेष आवड आहे. सर्वसामान्य, गोरगरीब, आदिवासी भाग असो किंवा मुंबई शहरातील दुर्लक्षित वर्ग, या सर्वांना मदत कशी करता येईल यासाठी त्या नेहमी अग्रेसर असतात. आय. सी. एस. ई. पॅटर्न मध्ये संपूर्ण देशभरात प्रथम क्रमांक पटकावणारे विद्यार्थी ज्या शाळेतून बाहेर पडतात, त्या मुंबई येथील श्री विले पार्ले केळवणी मंडळ संचलित एस. व्ही. के. एम. इंटरनॅशनल स्कूल तसेच सी. एन. एम. इंटरनॅशनल स्कूलचे नियमितपणे कामकाज पाहत असतात. मुंबईतील गरजू मुला-मुलींना शैक्षणिक योगदान देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे देखील कौतुकास्पद राहिले आहे. श्रीमंत परिवारात वावरत असताना गोरगरीब व दुर्लक्षित महिला, मुली यांना नेहमी सेवा देण्यासाठी त्या तत्पर असतात. त्यांचे गुजराथी, इंग्रजी, हिंदी भाषेवरील असलेले प्रभुत्व वाखाणण्याजोगे आहे. तसेच विविध क्षेत्रातील ज्ञान प्राप्त करून घेण्याची आवड, राजकारण, समाजकारण, शैक्षणिक बाबी अतिशय बारकाईने अभ्यासून त्या मनापासून चांगल्या रीतीने काम करण्याच्या प्रयत्न करतात.

माजी शालेय शिक्षण मंत्री अमरिशभाई पटेल यांचा राजकीय वारसा पुढे नेताना पहिल्यांदाच विक्रमी मताधिक्याने नगराध्यक्ष पद काबीज केल्यानंतर देखील त्यांच्या मूळ स्वभावात किंचितही फरक पडला नाही हे विशेष. कोणताही अहंभाव न बाळगता शिरपूर शहराच्या जनतेसाठी त्या मनापासून काम करतात. शहराच्या जनतेला कोणत्याही समस्येला सामोरे जाण्याची वेळ येऊ नये यासाठी त्या नेहमीच प्रयत्नशील असतात.

शिरपूर वरवाडे नगर परिषद ही महाराष्ट्र राज्यात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियाना पासून राज्यभरात प्रथम क्रमांक पटकावणारी नगरपरिषद ठरली आहे. माजी मंत्री अमरिशभाई पटेल, त्यांचे लहान बंधू तत्कालीन नगराध्यक्ष व विद्यमान उपनगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व आता विद्यमान लोकनियुक्त

पहिल्या महिला नगराध्यक्ष सौ. जयश्रीबेन पटेल यांच्या प्रयत्नाने शिरपूर नगर परिषद राज्यात नेहमीच अग्रक्रमावर नावारूपास आली आहे. जयश्रीबेन यांच्या कार्यकाळात शिरपूर नगर परिषदेला स्वच्छतेबाबत चे तीन कोटी रुपयांचे पहिले बक्षीस मिळाले. नाशिक विभागात देखील नेहमीच प्रथम क्रमांकाची ही नगरपालिका ठरली आहे. भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी देशभरात सुरू केलेल्या स्वच्छ सर्वेक्षण अभियानात शिरपूर नगरपालिका मागे राहिली नाही. देशात अतिशय चांगलं मानांकन प्राप्त केल्यानंतर राज्यात प्रथम ठरलेली ही नगरपालिका सातत्याने अनेक पुरस्कार पटकावून राज्याला स्वच्छता व इतर अनेक चांगल्या पैलूंचा आदर्श देत राहिली आहे. मोकळ्या जागी लिंबाच्या लागवडीने पर्यावरणाच्या बाबतीत शहरात अतिशय चांगले काम करून वसुंधरा पुरस्कार देखील जयश्रीबेन पटेल यांच्या प्रयत्नाने नगरपालिकेला मिळवता आला आहे.

पटेल परिवाराने शिरपूर शहर व तालुक्याला न भूतो न भविष्यती एवढ्या सोयी सुविधा पुरविल्या आहेत. पाणी, आरोग्य, अतिशय उच्च व दर्जेदार शिक्षण, उद्योगधंदे, रोजगार अशा अनेकवीध तसेच सर्वच क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देऊन पटेल परिवाराने सातत्याने केलेल्या कार्याला पुढे नेण्याचे काम नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल यांनी सुरू ठेवले आहे. शिरपूर शहरात नगरपालिकेच्या मार्फत स्वच्छतेच्या बाबतीत नेहमीच वसा घेऊन पाठपुरावा करून महिला, पुरुष, युवक, युवती, महाविद्यालयीन विद्यार्थी व शालेय विद्यार्थी, दुकानदार, व्यवसायिक सर्वांमध्ये सातत्याने जनजागृती करून स्वच्छ शिरपूर, सुंदर शिरपूर, आदर्श शिरपूर ची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचे पटेल परिवाराचे काम जयश्रीबेन पटेल यांनी सुरू ठेवले आहे. गरजूंना मदत करणे, आरोग्याचे प्रश्न सोडविण्या मध्ये लक्ष घालून शिरपूर नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल मधून सर्वसामान्य गोरगरीब गरजूंना आवश्यक त्या सर्व आरोग्यसुविधा माफक व कमी खर्चात पुरविण्यासाठी त्या कटाक्षाने लक्ष घालतात.

जयश्रीबेन पटेल यांनी खास करून महिला व मुलींचे आरोग्य सुदृढ व निरोगी असावे यासाठी शिरपूर नगरपालिकेच्या वतीने 'ईव्हज पार्क' हे महिलांसाठी गार्डन सुरू केले. याठिकाणी महिलांच्या आरोग्यासाठी नियमितपणे अनेक उपक्रम राबविण्यात येतात. नुकतेच त्यांनी घेतलेला 'वॉकेथॉन' हा पायी चालण्याचा उपक्रम तर मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरला. महिला पुरुषांसह सर्वांनी नियमित पायी चालावे हा संदेश आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याबद्दल त्यांनी दिला. शहरातील शेकडो महिला मंडळांच्या सहकार्यातून ते विविध उपक्रम राबवून सर्वांमध्ये कौटुंबिक नाते जपण्याच्या मनापासून नि:स्वार्थपणे प्रयत्न त्या करीत असतात. शहरात चालणाऱ्या अनेक उपक्रमांमध्ये त्या नेहमी हिरीरीने भाग घेतात. शाळा-कॉलेजमध्ये अनेक कार्यक्रमांमध्ये व प्रशिक्षणामध्ये उपस्थित राहून त्या विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, अधिकारी यांच्याशी सुसंवाद साधून आपल्या शिरपूर शहर व तालुक्यातील मुले मुली शिक्षण क्षेत्रात पुढे कसे जातील यासाठी प्रयत्न करताना दिसून येतात.

पटेल परिवारामध्ये शिरपूर शहर व तालुक्याच्या जनतेची सेवा करण्याची ही तळमळ राज्याला व देशाला आदर्शवत व दिशादर्शक आहे. राजकीय पुढारपण व श्रीमंतीचा आव न आणणारा हा पटेल परिवार सर्वच बाबतीत आदर्श ठरला आहे. या परिवाराला पुढे आणण्यासाठी जयश्रीबेन पटेल यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

शिरपूर शहर व तालुक्याच्या जनतेसह विशेष करून तालुक्यातील शहरातील आदिवासी भागातील, दुर्गम भागातील महिला व मुलींना जास्तीत जास्त सुविधा कशा मिळतील, त्यांना कोणत्याही समस्यांना तोंड देण्याचे धाडस निर्माण कसे करता येईल यासाठी त्या दोन पाऊल पुढे असतात.

नुकतेच शिरपूर वरवाडे नगर परिषदेच्या वतीने नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल यांनी स्वच्छता मंदिराचे लोकार्पण केले. सर्व नागरिक सकाळी उठून आपल्या देवदेवतांचे नियमित पूजापाठ करतात. याच धर्तीवर आरोग्य उत्तम व ठणठणीत राहण्यासाठी आपण सर्वांनी स्वच्छतेची पूजा करायला पाहिजे, या हेतूने त्यांनी स्वच्छता मंदिर हा देशातील अभिनव उपक्रम नागरिकांसमोर आणल्याने जयश्रीबेन पटेल यांचे सर्वच स्तरात कौतुक होत आहे.

# उंच माझा झोका...

**बालपणातील बंडखोर, बेफिकीर वृत्ती आजही कायम ठेवत आई-वडिलांच्या डॉक्टर होण्याच्या इच्छेपेक्षा स्वत:चे करिअर घडवणाऱ्या शैलजा यांनी पत्रकारितेचा वसा घेत, अँकरींगची आवड जोपासत साम टिव्ही, झी २४ तास च्या माध्यमातून वास्तव वृत्त देत आवडीच्या क्षेत्रात यशस्वी करिअर घडविता येते हा पाठ घालून दिला आहे.**



शैलजा शशिकांत जोगल
वृत्त निवेदिका झी-२४ तास
मुंबई
८०८२०५५७००

नमस्कार... मी शैलजा जोगल... असं नाव सध्या ओळख झालीय... एका चांगल्या आणि नावाजलेल्या मराठी टीव्ही वाहिनीवर मला पाहिलं आणि ऐकलं जातं. पण हा प्रवास नक्कीच सोप्पा नव्हता. मीडियातल्या कामाचं कधीतरी कौतुक होतं कधीतरी बिकाऊ मीडिया म्हणून नावं ठेवली जातात...सगळ्याकडे दुर्लक्ष करुन माझी वाटचाल सुरुच आहे. हा प्रवास खरचं सोप्पा नव्हता... मागे वळून पाहिलं तर स्वत:लाच कधीकधी विश्वास नाही बसतं... आपण आयुष्यात काय काय केलंय... पण समाधानदेखील उराशी बाळगून आहे. कारण ज्या क्षेत्रात काम करायची इच्छा होती त्या क्षेत्रात काम करायची संधी मला मिळाली . खूप कमी जणांना असं भाग्य मिळतं...

शाळेत अतिशय मस्तीखोर अशी ओळख... ग्रुपपण तसाच... आणि वर्गपण... म्हणून १० वीला खास मुख्याध्यापकांनी त्यांच्या केबिनच्या शेजारी आमचा वर्ग करुन घेतला होता... प्रत्येक पालकसभेत कायम माझ्या तक्रारी ठरलेल्या असायच्या आणि त्यात भर म्हणजे आईचा ओरडा... घरी येऊन बाबांना सांगायची तुमची पोरगी आयुष्यात काहीच करु शकणार नाही... लहान असल्याने या वाक्याची चिड न येता हसू यायचं... आणि माझं हसू बघून आईची चिडचिड वाढायची... १० वीला कसेबसे ८८ टक्के आले. आमच्या आऊसाहेबांसाठी ते कसेबसेच होते... कारण पेढे वाटत असताना ती सांगायची अजून थोडा गांभीर्याने अभ्यास केला असता तर ९० चा आकडा पार केला असता... बाबांना मात्र कायम कौतुक होतं. ते आजही कायम आहे... १० वीला चांगले गुण मिळाले म्हणून जबरदस्तीने सायन्सला ऍडमिशन घ्यायला लावलं... आई - बाबांची इच्छा होती मी डॉक्टर किंवा इंजिनियर व्हावं...पण लहानपणापासून बंडखोर असल्याने असं काही झालं नाही... कॉलेजच्या पहिल्याच दिवशी इंग्रजीमधून असलेलं केमिस्ट्रीचं लेक्चर बाऊंन्सर गेलेलं आणि घरी येऊन खूप अस्वस्थ वाटतं होत... कारण माझं १० वी पर्यंतचं शिक्षण मराठीमधून झालेलं त्यात आपल्याला इंग्रजीमधून हे सगळं जमेल का... मनात खूप प्रश्न होते... हळूहळू इंग्रजीसोबत गट्टी झाली... आणि सायन्ससोबत पण... १२ वी पूर्ण कशीबशी फर्स्ट क्लासने झाली.... सीईटीच्या परिक्षेला मी गैरहजर राहून आईबाबांच्या डॉक्टर इंजिनियर होण्याच्या स्वप्नांवर पाणी ओतलं होतं... त्यामुळे आता पुढे प्लेन बीएस्सी हा पर्याय होता... तेव्हाच रुईया कॉलेजमधून आर्टस करायचा असा निर्णय घेऊन फॉर्म भरण्यासाठी कॉलेजला गेले आणि बीएमएमच्या डिग्रीचा फॉर्मभरुन घरी आले... आगीत तेलं ओतल्यासारखी परिस्थिती घरात होती.... मी ठाम होते. सुदैवाने फर्स्ट लिस्टमध्ये नाव येऊन रुईयामध्ये शिक्षण सुरु झालं... अत्यंत साधेपणाने शाळा आणि १२ वी पूर्ण केलेली मुलगी आता थोडी मॉडर्न झाली होती... रुईया मधलं वातावरणं

आत्मविश्वास वाढवणारं होतं. शिक्षकांसोबत चांगले संबंध होते... त्यांनी डिग्रीच्या ३ वर्षात माझ्यावर विशेष मेहनत घेतली हे मी कधीच नाकरणार नाही.... कॉलेजच्या तिन्ही वर्षात डिव्हिजन रिप्रेझेंटीव्हम्हणून काम केलं... यामुळे छोटं छोटं पॉलिटिक्स समजायला लागलं होतं... कॉलेजमधल्या कार्यक्रमांच अँकरिंग करण्याची संधी अनेकदा आली... याने सगळ्यांसमोर बोलण्याचा आत्मविश्वास अजून वाढला... वृत्तपत्रांमधून सोबत लिहायला सुरु केलं. सिंधुदुर्ग तरुण भारतचे संपादक विजय शेट्टी यांना सुरुवातीचे लेख आवडले त्यांनी वृत्तपत्रातून लिहायची संधी दिली. फोटोग्राफीची आवड असल्याने सामनामधून लेखन झालं... लोकसत्तामधून स्वत:ची मतं मांडता आली तर पुढारीतून कवितांचं लेखन करण्याची कॉलेजच्या दिवसात संधी मिळाली...

फायनली रुईयामधून जर्नलिझम डिपार्टमेंटमधून मी दुसरे आले. कधी समाधानी नसलेली आऊ आमची आनंदी होती त्यावेळी कारण तसचं होतं... रिझल्ट लागण्याआधी मी नोकरीला होते... हो आयुष्य कोणत्या वळणावर संधी घेऊन उभं असतं माहित नाही पण ती येताच क्षणी सोनं करुन घ्यायची तयारी आणि प्रयत्न आपले असले पाहिजेत... जास्त काही नाही सेकंड ईयरला असताना एका महिन्याची इंटर्नशिप केलेली. ते शिकलेलं काम सामच्या लोकांनी लक्षात ठेवलं होतं त्यानुसार लास्ट ईयरच्या परिक्षेच्या शेवटच्या दिवशी इंटरव्ह्यूसाठी साममधून बोलावणं आलं.... आम्ही परीक्षा संपली म्हणून फिरण्याचे प्लॅनकरत रुईच्या कट्ट्यावर बसलेलो... आणि हा फोन वाजता... मगं मनात आलं आपण मुलाखत देऊया तरी आपलं काही लगेच सिलेक्शन होणार नाही आहे... द्यायला काय हरकतं आहे म्हणून तिकडे गेले... मंदार फणसे आणि सामच्या टीमने ३ राऊंडमध्ये इंटरव्ह्यू घेतला आणि फायनली मी सिलेक्ट झाले ३ दिवसांची मुदत देऊन नोकरीला रुजू हो असं सांगण्यात आलं... आणि हक्काचे पैसे हातात येतील म्हणून पगाराची अपेक्षा न करता नोकरीला सुरुवात केली.... त्यात ग्रुपमध्ये नोकरीला लागलेली मी पहिलीच... आजही सगळा प्रवास आठवला की थक्क व्हायला होतं....

साम सकाळ मध्ये काम करताना कमालीचा आनंद होता... सकाळ समूह हा एक मोठा आणि नावाजलेला ब्रँन्ड आहे. ज्याच्यासोबत मी काम केलं याचा कायम अभिमान वाटतो. आजही हे रुणानुंबध तेवढेच जपलेले आहेत. साममध्ये काम करताना बऱ्याच गोष्टी शिकता आल्या... आज जे काही आहे त्यात आई बाबांसारखाच सामचा देखील वाटा आहे. काहीही अनुभव आणि डिग्रीचं मार्कशीट हातात नसताना हातात ऑफरलेटर मात्र होतं... कमालीचं श्रीमंत वाटतं... दिवस छान सुरु होते... हळूहळू मी सगळं शिकून घेतं होते... वर्ष झाल्यावर अँकरिंगला एँग्रोच्या बातम्यांमधून सुरुवात केली... ते शिकण्यासाठी खास ८ तास ड्युटी झाल्यावर बाकीच्या अँकर्सचं काम मी पाहतं ऑफिसमध्ये थांबायचे... अनेकदा महत्त्वाच्या दिवसांमध्ये ऑफिसमध्येच थांबायचे... १२ तास कधी १८ तास... अनेकदा फिल्डवर जाऊन स्टोरी पण केली... जेवळं कधी वेळेवर नाही ... ना ब्रेकफास्ट... कधी मॉर्निंग शिफ्ट आणि सेकंड... सगळ्याची हळूहळू शरीराला सवय झाली...

नोकरी करतानाच्या काही आठवणींमधली एक गोष्ट एकदा खूप पाऊस पडतं होता... ट्रेन बंद... गाड्या बंद... सगळीकडे पाणी... मुंबईच्या पावसाची खासियत आहे.... बाबापण घरीच थांबलेले... आई आणि बाबा दोघेही कामावर जायला काही देतं नव्हते... त्यांना समजावलं आणि ऑफिसला गेले... लांब राहणारे कुणीच ऑफिसला येणार नव्हते... तसा ऑप्शनपण नव्हता... त्यांच्याकडे... त्यातल्या त्यात मी जवळ म्हणून ऑफिसला होते.... मी गेले आणि तेव्हा पहिल्यांदा मुंबईच्या पावसावर लाईव्ह दिलं.... हातात सामचा लोगो असलेला बुम... नखखिशात भिजलेले ... मी भर पावसात उभे होते... आई बाबांनी तसं टीव्हीवर पाहिलं आणि बाबांच्या डोळ्यात पाणी आलं... पहिल्यांदा तेव्हा त्यांनी माझ्यासाठी फेसबुकवर पोस्ट लिहलेली ... प्रचंड अभिमान त्यांना वाटतं होता... आयुष्यात आणखी काय हवं असतं...नाही का ?

साममध्ये एक - एक करत ३ वर्ष गेली.... बातम्या लिहणं... गेस्ट लाईनअप सगळी काम हळू हळू शिकून गेली... इनपूटला असल्यामुळे सगळ्या रिपोटर्ससोबत

चांगले संबंध होते.... ते कायम राहिले अगदी आजतागायत... अनेक आदर सत्काराचे प्रसंग यावेळी आले.... स्वत:च्या कॉलेजमध्ये म्हणजेच रुईयात गेस्ट लेक्चरर म्हणून बोलावणं ही आलं... रुईयातल्या मुलांना शिकवताना एक वेगळाचं आनंद मनात होता...साममधलं तिसरं वर्ष जास्त खऱ्या अर्थाने खूप काही शिकवून गेलं... फिल्डवर जाऊन स्टोरी करणं, रिपोर्टिंग करणं हे भयंकर आवडायचं...मुंबईतला मराठा मोर्चा कव्हर करण्याची संधी साम टीव्हीने दिली... सामच्या टॉक शोचं अनेकदा अँकरिंग करण्याची संधी मिळाली .... अनेक सेनसिटीव्ह विषय सर मला अँकरिंगच्या निमित्ताने हाताळायला द्यायचे... अनेकदा हे सगळं करताना छान तर वाटतं... पण खूप दडपण ही मनावर असतं... ९ जानेवारी , २०१८ ला सामला जय महाराष्ट्र करत मी नवीन ठिकाणी रुजू झाले... ३१ जानेवारी. २०२० ला मी झी चोवीस तास वृत्तवाहिनीवर वृत्तनिवेदिका म्हणून रुजू झाले. लहानपणापासून जो न्यूज चॅनल पाहत मी मोठे झाले त्यात काम करायची संधी चक्क दारात आली... आयुष्यातला खूप मोठा निर्णय होता... त्यावेळी खूप जवळच्या लोकांनी मात्र मोलाची साथ दिली... आई,बाबा,शंतनू कायम सोबत होते... अनेकदा यांच्याशी कॉल झाला की निर्णय घ्यायला धैर्य यायचं.

आमंच क्षेत्र म्हणजे खरं तर ग्लॅमरस... झगझगीत, चंदेरी ... कायम प्रसिद्धीच्या झोतात असं क्षेत्र... अनेक पुरस्कार मिळतात वेगवेगळ्या ठिकाणी आदर- सत्कार होतात....पण हे सगळं करताना मात्र मी माझ्यातली नवी स्वत:ला उमगले...माझीच नव्याने मला ओळख झाली... स्वत:च्या स्वप्नांवर प्रेम करणारी मी, धडपडी, लढणारी, कधी कधी बंडखोर तर कधी कधी खूपच संवेदनशील... कुणाला आम्हाला पाहून कल्पनासुद्धा येत नाही हसऱ्या चेहऱ्यामागे काय काय लपवून आम्ही जगाला माहिती देतं असतो.... घरातले प्रॉब्लेम्स, आजारपण, ताण, चिडचिड... सगळं विसरुन हसतमुखाने सगळ्यांसमोर येतो.... अपघात, खून, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे फोटो, व्हिज्युअल्स बघायचे... बातम्या वाचायच्या... ही आमच्या दिवसाची सुरुवात... निवडणुका आल्या की घर विसरावचं लागतं... येण्याची वेळ ऑफिसला ठरलेली पण जाताना काही महत्तवाचं घडलं की घरी जायची वेळ लांबलीच म्हणून समजा... अनेकदा घरातले अनेक सुखद आणि दुखी प्रसंगाच्या क्षणी कायम अनुपस्थित हा ठपका आमच्यावर लागतो... विशेष सांगायचं म्हणजे ... या क्षेत्रात आल्यानंतर एकापण भावंडाच्या डोक्यावर अक्षता टाकण्याचं भाग्य मला लाभलं नाही... कोणत्याही सणावाराला आम्हाला सुट्टी नसते... आम्ही छान तयार होऊन लोकांना सगळे सण कसे साजरे करतायत हे स्टुडिओत बसून दाखवत असतो..... अनुभव सांगायला गेले तर खूपचं आहेत....पण आमच्या क्षेत्रात यायचं तर हे सगळं करण्याची मनाची तयारी लागते... खूप प्रसंग येतात तुम्ही एकटे पडता.... सोबत कुणीही नसतं... वाट अंधारलेली समोर येते....आपण फक्त प्रयत्न करायचे... पण ते प्रयत्न प्रामाणिक सुद्धा असले पाहिजेत तर यश नक्की तुमचं आहे... अनुभवावरुन सांगतेय... Life is a long journey, with problems to solve, lessons to learn, but most of all, experiences to enjoy...



# उंच माझा झोका...

**नंदा हरम एक संशोधिका, प्राध्यापिका व लेखिका जीवनातील प्रतिकुल परिस्थितींनी खचून न जाता, आल्या परिस्थितीला सामोरे जात स्वत:ला घडविले त्यांचा सुंदर जीवनप्रवास व साहित्य क्षेत्रातील त्यांचा प्रवास वाखाणण्याजोगे आहे.**



प्रा.नंदा हरम
विज्ञान प्रसारक/सशोधक
पुणे
९३७२१९०३०६

आपण ठरवतो एक, पण नियतीच्या मनात काही वेगळंच असतं. तसंच काहींस झालं. जेव्हा १९७८ साली मी बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. सुरूवातीपासूनच डॉक्टर व्हायची मनीषा मनात बाळगली होती, फक्त दोन गुण कमी पडले. त्या काळात बारावीच्या मार्कांवर प्रवेश मिळायचा. त्यामुळे संधी हुकली ती कायमचीच.!

मेडिकल प्रवेशाच्या तिन्ही लिस्टस लागेपर्यंत मी वाट बघत बसले. म्हणतात ना, आशेचा धागा चिवट असतो! त्याला गेले. उशीर झाल्यामुळे प्रिन्सीपॉलना भेटावं लागलं ते लगेच म्हणाले,''काय...इतके दिवस झोपला होतात की काय?'' त्यावर मी काय बोलणार?

प्रवेश घेतला, कॉलेजला जाऊ लागले. पण मन कशातच रमत नव्हंत. फक्त शारिरीकरित्या कॉलेजमध्ये जायची, यंत्रवत गोष्टी करायची,

तसं पाहिलं तर मला समुपदेशन करायला कोणी नव्हंत. काही दिवसांनी माझी मीच सावरले. विचार केला-'आता आपण जर काही केलं नाही, जर भविष्यात माझं स्थान नेमकं कोठे असेल?' कोळीष्टकं झटकावी, तशी उदासीनता झटकली आणि वर्तमानात जगायचा प्रयत्न करू लागले. अभ्यासावर लक्ष केंद्रित केलं. राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एन.एस.एस) उपक्रमात भाग घेऊ लागले. कॉलेजच्या मासिकांमध्ये कविता प्रसिध्द होत होत्या. बी.एस्सी.च्या शेवटच्या वर्षी सगळ्या कार्यक्रमात आवर्जुन उपस्थिती होती.

बी. एस्सी. ला चांगल्या गुणांनी (७० टक्कयांहून अधिक) उत्तीर्ण झाले. एस्सी. करताना जग विस्तारत गेलं. लेक्चर्सच्या निमित्ताने मुंबईत प्रवास करू लागले. धीटपणे सगळ्यांमध्ये वावरायची, बोलायची सवय झाली. लक्षात आलं की जेव्हा आपण शिकायला महाविद्यालयात जातो किंवा पदव्युत्तर शिक्षणाकरिता विद्यापीठात जातो, तेव्हां आपल्याला, केवळ पदवी मिळत नाही. तर आपला विकास होतो आपण बऱ्याच गोष्टी कळत. नकळत शिकतो आणि त्यातून घडतो.

एम.एस्सी. झाल्यावर पी.एच.डी करायंच स्वप्नं होतं, पण आर्थिक विवंचनेमुळे नोकरी करायची ठरलं. पहिली नोकरी होती. परळच्या महर्षी दयानंद कॉलेजमध्ये डिग्री कॉलेजला लेक्चरर म्हणून रूजू झाले. अर्थात ती केवळ एक महिन्याकरिता (लीव्ह व्हेकन्सी) होती. काही असो, नोकरीच्या श्रीगणेशा झाला.

त्यानंतर पार्ले कॉलेजच्या ज्युनिअर सेक्शनमध्ये 'टीचर' म्हणून लागले. अकरावी -बारावीच्या विद्यार्थ्यांना शिकवायचे होत. ही नोकरी चक्क मला घरी निरोप येऊन मिळाली होती. हल्ली काय परिस्थिती आहे! काळ किती बदलला....!

शिकवायला मला पहिल्यापासूनच आवडतं. शाळेतला एक प्रसंग आठवतो. मी आठवी इयत्तेत असताना शिक्षक दिनाच्या दिवशी पाचवीच्या वर्गाला मी विज्ञान शिकवंल होतं. पार्ले कॉलेजमध्ये नोकरी व्यवस्थित चालू

होती. ७-८ महिने झाले. असतील अन् एक सुवर्ण संधी माझ्या आयुष्यात आली. कुलाबा येथील टाटा मुलभूत संशोधन केंद्र (**T.I.F.R.**) येथे संशोधनाची नोकरी मिळाली. पी.एच.डी. करायला ही मिळेल. म्हणून सांगण्यात नोकरी मिळाली. पीएच.डी करायला ही मिळेल, म्हणून सांगण्यात आलं होतं. आंधळा मागतो एक... अशी अवस्था झाली. आता माझी स्वप्नपूर्ती होण्यात काही अडचण नव्हती.

टी.आय.एफ.आर मुळे आयुष्यात एका नव्या अध्यायाला सुरूवात झाली. पहिल्यांच वर्षी म्हणजे १९८४ साली मी इटलीतील सिसिली येथे पंधरा दिवसाच्या एका विंटर स्कूल करिता गेले. विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे (**D.S.T.**) मला जाण्यायेण्याचा पूर्ण खर्च मिळाला. फी व स्थानिक खर्च. संयोजकांनी देण्याचे मान्य केले. माझं जाणं निश्चित झालं. नाही म्हटलं तरी पोटात गोळा आला कारण त्या क्षणापर्यंत विमानाने तर नाहीच, पण भारतातही मी एकटीने कुठे फिरले नव्हते! पंख पसरवून थेट परदेशात झेप घेतली. हे मी संगळ का उदधृत करलेय? कारण ते साल होतं १९८४. इंटरनेट काय कॉम्प्युटरही ही आलेला नव्हता. एका क्लिक वर काही घडत नव्हतं. अशा अवस्थेत पुरेशी माहिती नसतांना मी परदेशात गेले. या प्रवासानंतर मी प्रचंड धीर झाले. पुढे-पुढे तर मैत्रिणींना घेऊन २-३ दिवसांच्या सहली ही घेऊन जाऊ लागले. एखादी घटना माणसात किती बदल घडवते, याचं हे उत्तम उदाहरण!

टी.आय.एफ.आर. मध्ये मला माझ्या आयुष्यांचा जोडीदार मिळाला. पुढे माझी पी.एच.डी. पूर्ण झाली. या संस्थेत असताना आमच्या लॅबतर्फे आम्ही वेगवेगळ्या परिषदा, वर्कशॉपचे आयोजन करायचो. त्यांचं सगळं काम मी बघत असे. त्यामुळे कोणत्याही कार्यक्रमांचे नियोजन करायची कुवत माझ्यात निर्माण झाली. शोधनिंबध सादर करण्याची.अनेक ठिकाणी संधी मिळाली. त्यानिमित्त देशाटन ही झाले.

१९९६ साली माझा मुलगा दीड-पावणेदोन वर्षांचा असताना इटलीतील एरिचे येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिंबध सादर करण्याची संधी मिळाली. एकूण १५-२० दिवसांचा दौरा होता. मुलाला सोडून जाताना काळजावर दगड ठेवून गेले. मागे वळून बघतांना आता नवल वाटतं. पण येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला धैर्याने तोंड देऊन कसोटी जिकांयची असते. हेच खर!

या संशोधन संस्थेत २० वर्षे काम केलं. २००४ मध्ये पुण्याला स्थलांतर केल्यावर इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये रसायनशास्त्राची प्राध्यापिका म्हणून रूजू झाले. आळंदी येथील एमआयटी मध्ये प्राध्यापिका व इंजिनिअरिंग सायन्सेसची विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले. या कारकीर्दीत केवळ शिकवण्यापुरतं जग सीमित न ठेवता अनेक गोष्टीचं आयोजन केलं. उदाहरणार्थ- शिक्षकांकरिता पाच दिवसांचा शॉर्ट टर्म ट्रेनिंग प्रोग्रॅम (सी.टी.टी.पी) दोन दिवसांची राष्ट्रीय परिषद, एक दिवसांच सेमिनार इ. टीआयएफआर मधली अनुभवाची शिदोरी उपयोगी पडली. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांकरिता विज्ञान प्रदर्शन, पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल मेकिंग कॉपिटेशन इ. उपक्रम राबविले. पहिल्या वर्षाच्या इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांकरित्या शैक्षणिक सहलींच आयोजन केलं, ही गोष्टी प्रथमच कॉलेजमध्ये घडत होती.

अर्थात हे सर्व कार्यक्रम यशस्वी झाले, ते माझ्या डिपार्टमेंटच्या सहकाऱ्यांच्या मदतीनचे! मी आमचं डिपार्टमेंट कुटुंबासारख वाढवलं होतं. प्रेमाने सर्वांना एकत्र आणलं होतं. जोडलं होतं माझा हा प्रयोग यशस्वी झाला, हे इथे नमुद करावेसे वाटते.

लहानपणापासून मी कवितेचा छंद जोपासला होता. त्यांच पर्यवसन काव्यसंग्रहात झालं २०११ साली मी माझा 'गुलमोहर' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित केला. ललितलेख, कथा लिहिणं चालूचं होतं. आमचे डिपार्टमेंट इंजिनिअरिंग सायन्सेचं असते. तरी इंग्लिशच्या प्राध्यापकांबरोबर माझी या विषयावर ही चर्चा होत असे. एकूणच माझं बस्तान चांगलं बसलं होतं.

पण...माझ्यातला लेखनाचा किडा मला स्वस्थ बसू देईना. पूर्णवेळ लेखनास मी झोकून घ्यायचं ठरवलं. ' फ्री लान्स राइटर ' आणि ' विज्ञान प्रसारक' म्हणून कार्य करायला सुरूवात केली. तसं पाहिलं तर व्यवसाय बदलायची इच्छा असली तरी तशी संधी आणि त्यायोग्य परिस्थिती किती जणांना मिळते. त्या दृष्टिने विचार करता मी, खरोखरच भाग्यवान! संशोधिका -प्राध्यापिका- लेखिका. असा प्रवास करायची संधी मला मिळाली .

विज्ञानप्रसारक म्हणून आतापर्यंत माझी विज्ञानावर सहा व शास्त्रज्ञावर दोन पुस्तके प्रकाशित झाली. 'असे घडले डॉ.कलाम' या पुस्तकाला ' उत्कृष्ट बालवाड:मय पुरस्कार चरित्र लेखन' मिळाला. तसेच शालेय विद्यार्थ्याकरिता लिहीलेल्या इ. ३ पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळून 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत महाराष्ट्रातील शाळांमध्ये त्याचे वाटप झाले आहे. दोन अनुवादाची पुस्तके ही प्रकाशित झाली. विज्ञानातील विविध विषयावर विद्यार्थ्यांकरिता (अगदी शालेय ते एम.एस्सी.पर्यंत) मी ठिकठिकाणी व्याख्याने देते. आकाशवाणी (ऑल इंडिया रेडिओ) व विद्यावाणी (पुणे विद्यापीठाचा रेडिओ) वर आतपर्यंत विज्ञानावरील अनेक मालिकांचे लेखन केले आहे.


आकाशवाणीवर समाज प्रबोधनाच्या दोन नाटिकांचे ही प्रसारण झाले. दोन स्वतंत्र काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून चार प्रातिनिधीक काव्यसंग्रहात माझ्या कवितांचा समावेश आहे. माझ्या कवितांचा सांगितिक कार्यक्रमही संपन्न झाला आहे. काव्य सादरीकरणाचे अनेक ठिकाणी कार्यक्रम केले आहेत. अशा तऱ्हेने विज्ञान व साहित्य क्षेत्रात धडपड चालू आहे.

सांगण्याचा मुहत्त्वाचा मुद्दा म्हणजे या माझ्या तिसऱ्या प्रोफेशनकरित मी ऑफिस सारखाच वेळ देते. सकाळी १० वाजता कामाला सुरूवात करते. ते संध्याकाळी ५-५.३० पर्यंत. मेहनतीला पर्याय नाही, हे अधोरेखित करावेसे वाटते.

थोडक्यात मी माझा जीवन प्रवास इथे उलगडला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रवासाच्या यशाचे शिल्पकार आहेत-माझे आई-वडील. माझे आई-वडील फारसे शिकलेले नव्हते. आई गृहिणी आणि वडील. टॅक्सी-ड्रायव्हर. पण त्यांनी दिलेल्या संस्कारांच्या पायावर माझं यशोमंदिर उभं आहे. मेहनत आणि प्रामाणिकपणा शिकावा. तर माझ्या वडिलांकडूनच! आईने अगदी छोट्या-छोट्या गोष्टीतून जीवनांची शिकवण दिली. समाधानाचा मोठा दागिना तिने आम्हांला दिला.

लग्नांनतर माझ्या जोडीदाराने तसेच सासरच्यांनीही मला चांगलीच साथ दिली. मी वटपूजा कधी केली नाही, पण माझ्या जोडीदार मला पुढचे सात जन्म मिळावा, अशी मनाशी इच्छा बाळगते.

कोणतंही काम कमी किंवा लहान न समजता, प्रामाणिकपणे करत राहिले की यश मिळणारच. असा विश्वास मनाशी बाळ गायला हवा. कोणतीही गोष्ट झटकन मिळत नाही. कठोर परिश्रमाशिवाय काही साध्य होत नाही आणि संयम ही हवाच. माझ्यातला ' त्रिवेणी संगम' हे त्यांचच घोतक आहे. असं अहंकाराने नाही तर अभिमानाने सांगू इच्छिते.



जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

## दि बॅग्ज अँण्ड गिफ्ट शॉप



लेडिज हॅण्डबॅग
स्लिंग बॅग
ब्रायडल कलेक्शन
पाऊचेस, मोबाईल पाऊचेस



लेडिज व जेन्टस वॅलेटस
स्कूल बॅग, कॉलेज बॅग



स्पोटर्स बॅग्ज
लॅपटॉप बॅग्ज



मार्केटींग बॅग्ज
सर्व किट्स गिफ्ट आर्टिकल्स
गॉगल्स, घड्याळ, डिओ

पत्ता : नगरपालिका रोड, गायत्री मंदिरा जवळ,
आदर्श नगर, शिरपूर
मो. नं. ९८२२८८७७०४, ७०२०४२०३२१

---

नांमाकीत कंपन्यांच्या
सौंदर्य प्रसाधनांसाठी एकमेव ठिकाण

Gaurav Agrawal
7276796059
9404819536

## Perfect Touch Cosmetics
..... A Complete Cosmetic Mall

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

BEARDO GATSBY LAKMÉ MAYBELLINE NEW YORK
GARNIER LOTUS HERBALS NYKAA L'ORÉAL PARIS
NIVEA ELLE 18 Nature's Essence Godrej Himalaya HERBALS
Hindustan Unilever Limited POND'S Olivia streax PROFESSIONAL

And Many More......

1973, Ambedkar Road, Shirpur - 425405

---




सेजल सुनिल अग्रवाल
मो. नं. ८८०६००९३९३

सेजल अनिल अग्रवाल
मो. नं. ७७९८९३३२३२

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

## मानसी फॅशन

MANSI
FASHION

पत्ता : नर्मदा टेलीकॉम, डॉ. आंबेडकर रोड,शिरपूर

---

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

KALAYOJAN
ARCHITECTS & INTERIOR DESIGNER

सेजल सुनिल अग्रवाल
मो. नं. ८८०६००९३९३

पत्ता : नर्मदा टेलीकॉम, डॉ. आंबेडकर रोड,शिरपूर

# महाराष्ट्रातील अव्वल दर्जाचे शिक्षण देणारे

# नगरपालिका शिक्षण मंडळ










## जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

अत्याधुनिक पायाभूत सुविधा...

गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण...

डिजीटल शिक्षणासह सहशालेय उपक्रमांची रेलचेल...

उपक्रमशील शिक्षकांचा यथोचित सन्मान...









श्री.राजेंद्र जगदिश अग्रवाल

सभापती



श्री.शे.खतिब शे.अजिज़

उपसभापती

**सदस्य**

श्री.सुरेश तुळशिराम अहिरे, श्री.हिरालाल पोपट मराठे, श्री.पंकज यशवंत बाविस्कर,श्री.तेली सिद्दीक शे.इस्माईल, श्री.देविदास अर्जुन माळी, श्री.किशोर बाबुराव पाटील,श्री.चंद्रकांत ताराचंद माळी (राजुभाऊ),श्री. सुरेश सिताराम तेली, श्री.राजेंद्र ढोमण सोनार,श्री. किशोर जगन्नाथ माळी, श्री.मोहन आर चौधरी (विभाग प्रमुख)

# शिक्षण मंडळ नगरपरिषद शिरपूर जि.धुळे

# उंच माझा झोका...

**वसुंधराताई लांडगे सुत्रसंचालक लेखीका म्हणून नावारूपाला आलेल्या व सानेगुरूजींनी कर्मभुमी असलेल्या अमळनेरास ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने गौरान्वित केले. त्यांचा जीवनप्रवास वाचतांना खरोखर आपणासही त्यांच्याविषयी अभिमान दाटून येतो.**



वसुंधरा दशरथ लांडगे
सुत्रसंचालक
अमळनेर जि.जळगांव
९६८९०३७८४१

जन्मल्यापासून ते शेवटच्या श्वासापर्यंत माणसाची जगण्याची धडपड म्हणजेच त्याचा जीवन प्रवास. या प्रवासात अनेक प्रवासी भेटत असतात. चांगले-वाईट अनुभव घेत घेत आपला पुढचा प्रवास अव्याहतपणे चालूच असतो. कमी-अधिक सर्वांच काहीसं सारखच असतं.

माझा जन्म भटाणे पो.वरूळ ता.शिरपूर जि.धुळे येथे झाला. वडील कै. शंकरराव भलकार (बापूजी) आणि आई कै. धुडाताई. भटाणे हे गाव तसे लहानच. फारसे पुढारलेले नव्हते. आई वडील अशिक्षीत पण शिक्षणाचे महत्त्व त्यांना होते. सहा बहिणीमंध्ये मी सर्वात लहान. शाळेत नाव वसुंधरा पण राजू या टोपण नावानेच मला संबोधायचे. इ. १ली ते ४थी पर्यंत शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. इ.५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण नूतन विद्यालय भटाणे येथे झाले. लग्नही लवकरच झाले. शालेय शिक्षण घेत असतांना गाण्याची आवड असल्यामुळे खूप कार्यक्रमात सहभाग असायचा. खूप वाहवाही मिळवली.

माझे लग्न अमळनेर येथील श्री. दशरथ नाना लांडगे यांच्याशी दि. १५ मे १९८२ रोजी झाले. शेतकरी कुटुंब, खटल्याचं घर, शिक्षणाचा अभाव. श्री. लांडगे मात्र बी. कॉम झालेले होते. घरची परिस्थिती अत्यंत बिकट होती. शेतात जावे लागे. घरचीही सगळी कामे आलीच. वाटायचं की आपले आयुष्य ‘ रांधा वाढा उष्टी काढा.’ यातच जाणार. पण भविष्याच्या पोटात वेगळच काहीतरी होतं. लहानपणापासून वाचनाची खुप आवड होती. मी कुठेतरी वाचले होते की,‘भूतकाळासाठी रडण्यापेक्षा वर्तमानाशी लढण्यात आणि भविष्याच्या शिखरापर्यंत पोहाचण्याची ’ धडपड करण्यातच खरा आनंद असतो.

लग्नानंतरची तीन वर्षे अशीच निघून गेली. आम्ही दोघांनी ठरवलं की आपण काहीतरी केले पाहिजे. मी १९८५ मध्ये शिवण-क्लास केला. कपडे शिवू लागले. मेंहदी शिकले, नवऱ्यांमुलींच्या हातावर मेहंदी काढू लागले. ब्युटी पार्लर शिकले, नवऱ्या मुलींना सजवू लागले. अरगंडीची फुले बनवून पॅकींग करून विकू लागले. ही कामे घरच्याघरी होत होती. पण तरी काहीतरी वेगळे करावेसे वाटत होते.

मी हे सगळे करत असतांना कोण काय करत आहे? कसे करत आहे? या गोष्टींपासून दूरच राहिले. आणि जे काही करायचं ते स्वत:च्या हिंमतीवर करायचं ठरवलं. यजमानांची पूर्ण साथ होतीच. अशातच अमळनेरातील साने गुरूजी विद्यालयात मुलाखत झाली. माझी शिक्षक म्हणून निवड झाली. पण माझे डी. एड. झालेले नव्हते. शाळा पण विना अनुदानित होती. पोस्टल डी. एड. केले काही काळानंतर शाळेला अनुदान मिळाले. दोघांचा उत्साह वाढला. अशिक्षीत कुटुंब असल्यामुळे कौटुंबिक अडचणींचा डोगंर नव्हे तर पर्वतच समोर होता. पण मला माहिती होतं की,‘ नाही’ हा शब्द जोपर्यंत तुम्हाला ऐकू येत नाही, तोपर्यंत सगळ काही शक्य असतं. आणि हे ही मी

वाचंल होतं की, जर तुम्हांला सर्वोत्तम व्हायच असेल तर इतर कोणीही करत नाही इतकी मेहनत तुम्हांला करावी लागेल. हे जाणीव असल्यामुळे मी मागे वळून पाहिजे नाही. शिक्षणाचा वसा सोडला नाही. डी. एड. , बी. ए., एम. ए आणि संगीत विशारद ही केले.

लेखनाचे अंग होते. कविता करत होते विविध विषंयावर लेखन करत होते. वर्तमान पत्रातून लेख, कविता करणे हे छंद होते. ते जोपासले. खूप अडचणी येत गेल्या पण माघार घेतली नाही. लहानपणापासूनच माझा प्रयत्न इतरांपेक्षा श्रेष्ठ होणे जी काल होते त्यापेक्षा चांगल होण्याचा होता. मी ठरवले होते. 'आपल्या वाटेत कुणी काटे ही टाकले तरी फुले समजून वाटचाल करेन.' संपूर्ण जळगावं जिल्ह्यात सूत्र संचलन करण्यासाठी, स्वागत गीतांसाठी आमंत्रणे येत. खूप वाहवा मिळवली. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, ना. अरूणभाई गुजराथी, ना. अजितदादा पावर, भाऊ कदम (चला हवा येऊ दया फेम) अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र देखणे तसेच साहित्यीक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांच्या शुभेच्छांनी खूप श्रीमंत झाले. त्यासोबतच प्रसिध्दीही खूप मिळाली. आकाशवाणी जळगावं केंद्रावर माहेर या कार्यक्रमात 'शेजारीण सखेबाई' या मालिकेचे कित्येक दिवस लेखन आणि सादरीकरण केले. आकाशवाणीवर अनेक विषयांवर भाषणे झाली. आकाशवाणी मुंबई केंद्र, अस्मिता वाहीनीवर डायलिंग मुलाखत झाली. जळगांव आकाशवाणीवर शास्त्रीय संगीत व सुगम संगीताच्या स्पर्धांचे परीक्षण केले स्वत: पोवाडे रचले, गायिले.

अमळनेर येथील १५० वर्षाची परंपरा असलेल्या ' साने गुरूजी ग्रंथालय व मोफत वाचनालय येथे सतत ९ वर्षे संचालक होते. मराठी वाड्:मय मंडळ अमळनेर येथेही दोन टर्म संचालक आहे. तसेच खान्देश शिक्षण मंडळ (प्रताप कॉलेज) येथे दुसऱ्यांदा विश्वस्त पदावर कार्य करण्याची संधी मिळत आहे. अमळनेर अर्बन बँकेत डायरेक्टर आहे. या सर्व निवडणुका म्हणजे जनमाणसात माझी प्रतिमा काय आहे, हे दाखवणाऱ्या ठरल्या. विविध शिक्षक संघटनावंर मी काम करत आहे. अनुभवांची शिदोरी गाठीशी आहे. अमळनेर, जळगांव, मुक्ताईनगर, पुणे, मुंबई, दिल्ली येथे शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामाबद्दल खूप पुरस्कार व सन्मान झालेत. उल्लेखनीय कामाबद्दल खूप पुरस्कार व सन्मान झालेत. मराठा सेवा संघातर्फे शिवधर्म' पध्दत तीने ब्राम्हणशिवाय १२५० विवाह लावण्याचे सौभाग्य म्हणून मिळाले. गायन आणि वाचन या छंदाबरोबरच १००-१५० वर्षांपूर्वीची तांबे व पितळाची भांडी जमविण्याचा छंद मी जोपासते आहे. त्या भांडयाचे छोटे म्युझियम मठ्ठ घरी आहे. गरीब व गरजू महिला आणि विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी मी नेहमी तत्पर असते. माझे स्वप्न आहे. अजूनही मला खूप चांगले काम करायचे आहे.

मला दोनच मुली आहेत. दोघी सरकारी नोकरी करतात. जावई ही नोकरी करतात. मला दोन मुली असतांना हि मला नात झाली तेव्हा गावातून बग्गीत मिरवणूक काढली. माझा सक्रिय सहभाग आहे. माझ्या या मंगलमय प्रवासाचे तुम्हींही 'आनंदायात्री' बना हेच सांगणे अट्टहासाचे!

शेवटी आयुष्यात ज्याला त्याला आपल्या पाऊलवाटेने पुढे जावे लागते. त्या वाटेला नव्या वाटा फुटतात. जुन्या वाटा येऊन मिळतात. त्या सर्वांचे स्वागत केले पाहिजे. आषाढतल्या पावसासारखी, कोजीगिरीच्या चांदण्यासारखी त्यांच्यावर माया केली पाहिजे.

(विश्वस्त, खान्देश शिक्षण मंडळ, अमळनेर , डायरेक्टर, अर्बन बँक, अमळनेर , डायरेक्टर, साने गुरूजी माध्यामिक शिक्षक पतपेढी, अमळनेर, डायरेक्टर, मराठी वाड:मय मंडळ, अमळनेर, जिल्हाध्यक्ष, ओ.बी.सी शिक्षक-विद्यार्थी-पाल असोसिएशन, जळगावं , विभागीय अध्यक्ष, अहिल्या महिला संघ, डायरेक्टर, पाडळसरे धरण समिती, अमळनेर, शिक्षीका, साने गुरूजी विद्यालय, अमळनेर.)

# उंच माझा झोका...

**सीमाताई सासरी आल्यानंतर जीवनास मिळालेली कलाटणी व अण्णाबाबांनी जी सेवेचे बीज रोवली होती त्याचे वटवृक्ष बनविण्यात ताईनी उचलेला खारीचा वाटा यासह अनेक पदं भूषविलीत व सन्मान पटकावले, सामाजिक कार्य केले त्यांचा हा जीवन प्रवास.....**



**सीमा तुषारजी रंधे**
राजकारण/समाजकारण
बोराडी ता.शिरपूर जि.धुळे
९४२११८८४२२२

मी सीमा तुषारजी रंधे. मला माझा जीवनपट लिहितांना मनापासून आनंद होत आहे. त्यांचे कारण मी सर्वसामान्य परिवारात जन्माला आली पंरतू वैवाहिक जीवनानंतर मला एक कर्तृत्ववान व सुसंस्कारीत असा परिवार मिळाला.

माझा जन्म दि. २८ फेब्रवारी १९७६ रोजी गुजरात राज्यात अहवाडांग येथे झाला. माझे लग्नापूर्वीचे नाव कु. सीमा कडूराव रोकडे असे होते. वडीलांचे नाव कडूराव शंकरराव रोकडे असे असून आईचे नांव सौ. आईचे नांव सौ. वर्षाताई कडूराव रोकडे आहे. दोन भावंडे अनिल ,चेतन. परिवारात कन्या म्हणून मी एकटीच . माझे बालपण गुजरात राज्यातच गेले. वडील पोष्टमास्तर म्हणून नोकरीला होते. आई पण चांगली शिकलेली आहे असे असुन तीने गृहीणी म्हणून आमच्यावर फार आदर्श असे संस्कार केलेले आहेत. घरीपण तिला जमेल तेवढा अभ्यास ती आमचेकडून करून घ्यायची. तसेच माझे वडीलही घरी माझे कडून चांगला अभ्यास करून घ्यायचे. माझे प्राथमिक शिक्षण अहवाडांग येथे झाले. माध्यमिक शिक्षण बलसाड येथील अतुल या ठिकाणी झाले. एस.एस.सी. नंतर मी वाणिज्य महाविद्यालयातुन बी.कॉम.पदवी प्राप्त केली. मला आधीपासूनच अभ्यासाची गोडी होतीच. मी एन.सी.सी. कॅडेट म्हणून २६ जानेवारीच्या राष्ट्रीय परेडमधे सहभागी व्हायची व त्याप्रमाणे संचलनपण करायची. मला बालपणापासूनच संगिताची आवड आहे. मी वैयक्तीक रित्या व सांघिकरित्या गायनात भाग घ्यायची. शिक्षण क्षेत्राची तर मला लहानपणापासूनच आवड होती व आजही कायम आहे. ती माझ्या आजेसासरे थोर स्वा. सै., शिरपूर तालुक्याचे माजी आमदार, शिक्षणमहर्षी, कर्मवीर स्व. अण्णासो. व्यकंटणराव तानाजी रणधीर यांच्या संस्कारक्षम परिवारामुळेच.

माझा विवाह भारतमातेचे थोर सुपुत्र, थोर स्वा.सै., शिरपूर तालुक्याचे माजी आमदार, शिक्षणमहर्षी. कर्मवीर स्व. अण्णासो. व्यंकटराव तानाजी रणधीर यांचे मोठे नातू व महाराष्ट्र राज्याने ज्यांना शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार देऊन सन्मानित केले ज्यांची उदारमतवादी व्यक्तिमत्व म्हणून ख्याती आहे ते स्व. दादासो. विश्वासराव व्यंकटराव रंधे यांचे मोठे सुपूत्र मा.डॉ.भाऊसो. तुषारजी विश्वासराव रंधे यांच्याशी झाला. माझा खान्देशाच्या संस्कृतीशी किंवा महाराष्ट्रात संबंध आला नसेल परंतु माझे आजोळच बोराडी असल्याने मला खान्देशाच्या संस्कृतीची तोंड ओळख मात्र नक्कीच होती. मला भाषेची अडचण किंवा अडसर आला नाही. माझे मामाही शिरपूर येथीलच असल्यामुळे खान्देशची संस्कृती माझ्या आईकडून जवळुन पाहिली होती. बी.कॉम.नंतर मी एम. कॉम. केले व बी.एड्. ही केले.

कर्मवीरांच्या परिवारामुळे व त्यांच्या छत्रछायेत मला शैक्षणिक धड्यांसोबत सामाजिक बांधिलकीचेही धडे मिळाले. या परिवारामुळे नाती कशी निर्माण करावी व ती किती व कशी जोपासावी याचे बाळकडूच मला रंधे परिवारात

मिळाले व मिळत आहे. कर्मवीरांच्या संस्कारामुळे अंधश्रद्धा म्हणून नाही पण डोळसपणे मी एका असामान्य अशा कर्तृत्ववान घराण्यात सुन म्हणून आली याचा मला अत्यानंद आहे. माझ्या जीवनातील हा सर्वोच्च अत्यानंद आहे. या घरात महाराष्ट्र राज्यातील नव्हे भारतातील ध्येयवादी असामान्य व्यक्ति व त्यांच्या कार्यप्रणालीची ओळख झाली. यापेक्षा जीवनात अधिक महत्त्वाचे ते काय? या परिवारामुळेच मला शैक्षणिक, सामाजिक व राजकिय क्षेत्रात संधी मिळाली. धुळे जिल्हा परिषद सदस्य म्हणूनही मी माझ्या परिने यथायोग्य अशी कामे जिल्ह्यात केली. आपण समाजासाठी जगलं पाहिजे हा ध्येयवाद या परिवारात आहे. तो मला मिळला. सामाजासाठी जगणं ही एक कला आहे हे मी बोराडी येथेच या रंधे परिवारात शिकले. रंधे परिवाराचा इतिहास राजकिय, सामजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उज्वल आहे परंतु तो तेवढाच संघर्षमयही आहे. इंग्रजांच्या काळापासून कर्मवीर स्व. अण्णासाहेब व्यंकटरावजी रणधीर यांनी आपला भारत देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून सन १९४२ पासून स्वांत्र्यसंग्रामात उडी घेतली. चिमठाणा खजिना लुटीतही त्यांना आमरण कारावासाची शिक्षा झाली. नंतरच्या काळात ते या तालुक्याचे दोन पंचवार्षिक आमदार होते. धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले. ते स्काऊट गाईड यात महाराष्ट्र राज्याचे तीन वेळा स्टेट चिप कमिशनर झाले. कर्मवीर अण्णासाहेब अतिशय शिस्तप्रिय होते. माझ्या आजीसासु लोकमाता स्व.सावित्रीबाई व्यंकटराव रंधे या बोराडी गावाच्या संरपचही होत्या.त्या काळात म्हणजे सन १७७५ ला त्यांनी बोराडी ग्रामपंचायतीवर संपूर्ण जागा संदस्य म्हणून महिलांच्या निवडून आणलेल्या होत्या.महाराष्ट्रातील ही ग्रामपंचायत त्या काळातही महिला सदस्य असलेली पहिली ग्रामपंचायत होती. या परिवाराचा स्पर्श मला आणि माझे जिवन अगदी बदलुन गेले. जसा लोखंडाला परिस स्पर्श होतो व त्यांचे रूपांतर सोन्यात होते. तसे माझे जिवन याा परिवारामुळे परिसस्पर्शी झाले आहे.

मला महाराष्ट्र परिट सेवा मंडळाचे परिट सेवा मंडळाचे अध्यक्ष पद तसेच जायन्ट लक्ष सखी ग्रृपचे अध्यक्षपदही मिळाले आहे. ही सेवा करीत असतांना राज्यस्तरीय संस्कार प्रतिष्ठाण तर्फे समाजरत्न पुरस्कार-२०१९ , अन्याय अत्याचार निर्मुलन समिती नाशिक तर्फे रणरागिणी पुरस्कार-२०१९ मिळाले.

महिला सक्षमीकरणासाठी बोराडी आदिवासी भागात व पाड्यांवर मोफत आरोग्य तपासणी, शिबिर, गॅस सिलेंडर हाताळणी प्रशिक्षण कार्यशाळा, ग्रामीण मजुर महिलांचा सत्कार, हळदी कुंकू, बालिका दिन, महिला मेळावा तसेच मुलीच्या जन्माचा स्वागत इ. उपक्रमांनी महिलांना सन्मान होण्याचा प्रयत्न केला.सामाजिक उपक्रमात पुरग्रस्त निधी रू. ५१,०००/- चा निधी जमा करून मा.जिल्हाधिकारी सो. यांच्याकडे जमा केला. १०० दिव्यांग विद्यार्थ्यासाठी मोफत दंत तपासणी शिबिर घेतले. ब्रश, टुथपेस्ट वाटप केले. स्वच्छता अभियात सक्रीय सहभाग घेतला. महिलांसाठी कायदेविषयक जागृती शिबिरही घेतली. ग्राहक पंचायत शिबिराचे आयोजन केले.

पर्यावरणाचा समतोल राखला जावा म्हणून एक मुल एक झाड योजना राबविली. वृक्ष दिंडी काढल्या त्यासाठीही जनजागृती केली.शैक्षणिक कार्यात लेक वाचवा लेक शिकवा अभियाना अंतर्गत गरजू होतकरू मुलींना आर्थिक सहाय्य दिले. गतीमंद मुलांसाठी खाऊ वाटप, मनोरजंनात्मक कार्यक्रम तसेच दरवर्षी आरोग्यविषयक सुविधा पुरविणे इ. उपक्रम राबविले. अंधश्रद्धा निमुर्लनासाठी उपक्रम राबविले. सांस्कृतिक कार्यक्रमात दांडीया स्पर्धा भव्य प्रमाणात राबविली त्यात ६०० महिला सहभागी झाल्या होत्या.

ही सगळी कामे मी माझ्या कुटुबांच्या जबाबदाऱ्या सांभाळून करू शकले व मला जी संधी मिळाली ती रंधे परिवाराने दिलेल्या संधीमुळेच. या परिवारात स्व. कर्मवीर अण्णासाहेब, लोकमाता स्व. सावित्रीबाई व्यंकटराव रंधे, माझे सासरे स्व. दादासो. विश्वासराव व्यंकटराव रंधे माझ्या सासु श्रीमती लिलाताई विश्वासराव रंधे, माझे लहान सासरे स्व. प्रा. डॉ. विजयराव व्यंकटराव रंधे व माझ्या सासु श्रीमती आशाताई विजयराव रंधे तसेच आमच्या परिवारातील माझे सर्व दिर, दिराण्या, यांच्याकडून मला लेकीसारखी, बहिणीसारखी वागणुक मिळाली, आजही मिळते आहे. या घरात मी आजही परिवारातील मुलगी म्हणून वावरते आहे.

# उंच माझा झोका...

**मनिषा देवेंद्र पाटील. नाजूक प्रकृती असून देखील त्यांची पर्वा न करता शिक्षण घेतले, राजकारणात सक्रीय सहभाग व सोबत कुटुंबाची जबाबदारी पार पाडत सन्मान, पूरस्कार प्राप्त केला व खरच आदीशक्तीचे रूप व प्रगतीचे पंखावर भरारी घेत समाजाच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग करून देणारा साधा-सरळ व सुंदर जीवनप्रवास.**



मनिषा देवेंद्र पाटील
राजकारण
शिरपूर जि.धुळे
९७३०७२०९०६

पुर्वाश्रमीची मनिषा बाबुलाल साठे आणि आता मनिषा देवेंद्र पाटील. माहेर ते सासरचा प्रवास अनेक आठवणींचा आहेत. कारण राजकारणाच्या पासून दुर असलेल्या मनिषास राजकारणाचा गंध पार जवळून घेता आलाय नि आजही आजकारणाशी समरस झालेय. माझे माहेरचे गाव चिंचोली (यावल जळगाव)माझा जन्म वीस आक्टोबंर सत्त्याहत्तरचा. वडिल बाबुलाल साठे व आई बेबाताई साठे दांम्पत्याच्या पोटी आलेले मी शेंडेफळ. वडिलांचा व्यवसाय शेती. आई गृहीणी घरची आर्थिक परिस्थिती साधारण त्यात आम्ही.६..भांवडे (भाऊ-२ बहिणी-४). माझे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेत शाळेत गेले. पहिली ते चौथी पर्यंतचा प्राथमिकचा अभ्यास म्हणजे खुपच मजा असायची. लहान असल्याने घरात सर्वाची लाडकी होते. त्यात मला लहान पणापासून ह्दयाचा त्रास होता. म्हणून मला सारे जपत. शिक्षणाची रूची मला जास्तच. मात्र शारिरीक अस्वास्थ्यामुळे मला शिक्षणाचा टप्पा पुर्ण करण्यात अडचणी होत्या. मात्र आई-वडिलांचा आग्रहाने मी उच्च माध्यमिक पर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले. भाई-वडिलांनीही शिक्षणासाठी कधी हात आखडता घेतला नाही. माध्यमिक शिक्षण चिंचोलीत उच्च माध्यमिकचे सा शिक्षण जळगावला पूर्ण केले. माझ्या ह्दयाच्या त्रासामुळे मी शिक्षण पूर्ण करू शकते की नाही याची शंकाच होती. मात्र वडिलांची भक्कम व खंबीर साथीने माझ्या जीवनाला यशाकार मिळला.

वयाच्या चोवीसव्या वर्षी मी लग्नबधंनात अडकले. मिळालेले सासर प्रस्थ होते. राजकारणी, घराण्याची मी सुन झाले. माझे सासरे जयराम भंदाजी पाटील विविध पदावर कार्यरत होते. त्याच बरोबर उत्कृष्ट शेतीचे कौशल्यही त्यांचेकडे होते. माझ्या सासुबाईंनी ही(मनकर्निका) यांनी करवंद ता.शिरपूर जि.धुळे गावाचे सरपंचपद भुषवले होते. एकुणच राजकारणी घराण्यातील देवेंद्र पाटील यांच्याशी झालेली विवाह माझ्यासाठीही राजकारणातील पहिले पाऊल ठरले.

पंचक्रोशीतील बडे प्रस्थ असलेल्या आमच्या घरी नेहमीच लोकांची वर्दळ असे. गावकऱ्यांसोबत परिसरातील नागरिकांचा राबता असे. त्यामुळे मला देखील समाजकारण, राजकारणाची ओळख होऊ लागली. त्यातच माझे सासरे वारल्यानंतर राजकारणाची धुरा माझे पती देवेंद्र पाटील यांनी सांभाळली. धुळे जिल्हा परिषदेची निवडणूक लढवून ते पहिल्याच प्रयत्नात जिल्हा परिषद उपाध्यक्ष पदी विराजमान झाले. त्यांच्यामुळे राजकारण मला देखील समाज कारणाची ओढ लागली.

म्हणूनच लोकनियुक्त सरपंच पदाची निवडणूक लढवण्याची संधी मिळाली. माझ्या या निर्णयाला

माझ्या कुटुंबाने तर साथ दिलीच परंतु माझ्या करवंद गावाच्या नागरिकांनीही मदत केली. आणि या सर्वांच्या आशिर्वादाने मी प्रथम लोकनियुक्त सरपंच झाले.

सरपंच पद जबाबदारीचे होते. लोकांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू लागले. महिला राजकारणी म्हणून वाटते तेवढे सोपे काम नव्हे याची जाणीवही झाली. परंतू माझे पती देवेंद्र पाटील यांची खंबीर साथ असल्याने मी यशस्वी कारभार करू लागले. महत्वाचे म्हणजे परिवाराच्या जबाबदाऱ्या सांभाळून राजकिय कामे करायची होती. त्यामुळे माझी तीन मुले, त्यांचा अभ्यास याकडे दुर्लक्ष न होता सामाजिक कामे हे करतांना कसरत होत होती. अशावेळी माझ्या सासूबाई, माझ्या जेगाणी माझा परिवार सोबत होता. यांची शिकवण सोबत होती. महिला जरी असले तरी त्यांचे मला प्रोत्साहन असायचे.म्हणूनच मी सरपंच पदाचा भार यशस्वीपणे पेलवू शकते. गावाचा कारभार पहातांना पायाभूत सुविधेबरोबर आरोग्यदायी वातावरण कराण्याचा माझा प्रयत्न होता. गावात अंडरग्राऊंड गटारी, वॉटर फिल्टरेशन प्लान्ट, रस्ता कॉक्रीटीकरण, पेव्हर ब्लॉक, सार्वजनिक शौचालय, याकडे लक्ष दिले. व प्राध्यान्याने ही कामे करून घेतली. अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळेकडे विशेष लक्ष दिले. डिजीटल यंत्रणेबरोबर शाळा आकर्षक करण्याचे काम केले. गावात एलईडी दिवे लावूले. विविध शासकीय योजनांचा लाभ लोकांना मिळावा यासाठी ग्रामपंचायत कारभार डिजीटल केला.

या अशा सामाजभिमुख कांमामुळेच लोकमत वृत्तपत्र समुहातर्फे ' बेस्ट सरपंच' आणि मराठा कुणबी पाटील महिला मंडळातर्फे 'कार्यगौरव' पुरस्काराने माझा गौरव झाला हा गौरव माझा नसुन माझ्या सोबत असणाऱ्या प्रत्येक ग्रामस्थांच होता. आणि त्यांच्या मनातल्या आनंदच माझ्यासाठी पारितोषीक आहे. मी महिला म्हणून स्वत:ला कधीच मागे खेचले नाही. आपला स्वत:चा एक रंग असायला हवा जो इतर कुणाला नको आला तरी स्वत:चा रंग असायला हवा जो इतर कुणाला नको आला तरी स्वत:पुरता असायला हवा. आपली आवड, आपले छंद या साठीही वेळ देत महिलांनी जीवन जगायला हवे.

**महिलांनो तुमच्यासाठी ...**

# महिलांसाठी योजना...

**प्रधानमंत्री मातृवंदना योजना ...**

आई कामावर गेल्याने बाळाला आईचं दूध मिळत नाही. बाळाचेही पोषण होत नाही आणि यातून कुपोषणाची समस्या जन्म घेते हीच बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने प्रधानमंत्री मातृवंदना योजना १ जानेवारी २०१७ पासून राबवण्यास सुरूवात केली. महाराष्ट्र शासनाने ही योजना सर्व जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आरोग्य सेवेचे आयुक्त हे राज्य पातळीवरील समन्वय अधिकारी म्हणून काम करतील. ही योजना केवळ पहिल्याच अपत्यासाठी व सरकारने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणी झालेल्या स्त्रियांना लागू आहे. या अंतर्गत पाच हजार रूपयांची रक्कम तीन टप्प्यांत संबंधित लाभार्थी स्त्री च्या खात्यात थेट जमा करण्यात येईल. या योजनेचे लाभ वेतनासह मातृत्त्व रजा मिळणाऱ्या स्त्रियांना मिळणार नाही.मातृवंदना या योजनेमधून आर्थिक साहाय्यचा १ हजार रूपयांचा पहिला हप्ता गरोदर मातांनी शासकीय रूग्णालयात नोंद केल्यानंतर मिळेल. दुसरा दोन हजार रूपयांचा हप्ता बाळंतपूर्व तपासणी करतांना गर्भधारणेच्या सहाव्या महिन्यानंतर मिळेल. योजनेतील तिसरा दोन हजार रूपयांचा हप्ता स्त्री प्रसूत झाल्यानंतर बाळाला सर्व लसी दिल्याची खात्री केल्यानंतर मिळेल.

* संकलन- **सोनिका संदेश हजारे**

# उंच माझा झोका...

**स्मिता संदीप जातेगांवकर यांनी घरातून विरोध पत्करून कलाक्षेत्रात पदार्पण केले स्वत: घेतलेला हा निर्णय कर्तुत्वाने खरा करून दाखविला व एक उत्तम चित्रकार होण्याचे स्वप्न उराशी बाळगले ते ध्येयपूर्ण होईतो ध्येयवेड्या, स्वप्नवेड्या होऊन घेतलेली भरारी तरूणींना एक नवा आदर्श देऊन जाते.**



स्मिता संदीप जातेगावकर
चित्रकार
पुणे
७४४७७७७३९९

तस माझं बालपण खुप छान गेलं आम्ही पाच बहिणी त्यात माझा नंबर चौथा. माझे वडील शिस्तीचे काटकसरी असल्याने तोही एक पगडा होताच पण त्यामुळे प्रत्येक गोष्ट करताना काटकसर डोक्यात येते. त्याचा फायदा संसाराला मात्र नक्कीच होतोय!

माझा जन्म झाला तो मात्र आईच्या माहेरी जालना येथे आणि बालपण गेलं अहमदनगरला. नगर म्हणजे निमशहरी गाव. तिथे शाळा व थोडं कॉलेज झालं. मी कलेकडे वळले त्याच कारण माझे दादा म्हणजे माझे वडिल. कारण ते फोटोग्राफर असल्याने दृक माध्यम. न चित्रकलेत तरी काय तेच महत्त्वाचं. त्यामुळे मला वडिलांकडूनच बाळकडू मिळाले असेच म्हणू शकेन. त्यात आम्ही सोनार कलाकुसरीच नक्षीकाम करणारे. मग काय ते रक्तातच न पिढ्यान पिढ्या पासून.... मग काय वळले ईकडे थोडस पुस्तकी ज्ञान मिळवायला. गाठलं पुणं.... अभिनव कला महाविद्यालयात प्रवेश घेतला व रहायला मुलींसोबत सदाशिव पेठेत मधुमिता लागू यांच्या कडे राहायचो....

खर तर मी पुण्यात आले ते वडिलांचा तीव्र विरोध पत्करूनच.... कारण मला काहीही करून पुढील म्हणजे नेमके काय...!!??? हे सारं माझ्या डोक्यात अस्वस्थ करून टाकणारे प्रश्न होते त्यात माझा स्वभाव जिद्दी असल्यामुळे वडिलांच्या विरोधाला न जुमानता आले मी पुण्यात....

दोन वर्षे कॉलेज व कॉलेज साठी स्ट्रगल मध्ये गेले. त्यात समाधान एक होते की मला कॉलेज मध्ये आमच्या सरांचा खुप छान ग्रुप मिळाला. झांजे सर, भालेराव सर, काळे सर आणि आम्ही चौघी मैत्रीणी आम्ही सोबत असायचो मग काय प्रदर्शन पहाने इतर कामे पहाणे या सगळ्यांच्या चर्चेतून माझी विचारांची दृष्टी छान तयार होतेय बोलावले. न होते तेवढ्यात वडिलांनी मला नगरला गाशा गुंडाळला.... पण एका अटींवर जिद्दी होते. न शेवटी. वडिलांना सांगीतले जो मुलगा मला पुढे शिकवेल व मला माझ्या कलेल्या प्रोत्साहन देईल असाच मुलगा शोधा. मग काय अट मान्य झाली, व माझ्या मोठ्या बहिणिकडचं पहिलच स्थळ अस आल व रेशीम गाठी जुळल्या....

माझे माझे लग्न २००३ साली झाले. मी पूर्व जातेगावकर हे मुळ नाशिक चे पण लग्ना नंतर संदिप (माझे पती) पुण्यात स्थाईक झाले. आम्ही रहायला कात्रजला आलो पण आणि कॉलेज अगदी टिळक रोड ला मग काय मी परत ॲडव्हान्सला ॲडमिशन घेतले व सुरू झाली संसाराची व कॉलेजची वारी. सारं काही नवीन. त्यात डिप्लोमा पास झाले. घरी क्लासेस व छोटेमोठे प्रदर्शन करू लागले.

ईशान्य मॉल मध्ये १ ग्रुप शो केला तेव्हा गणपतीचे पेन्टींगज विकले गेले. त्यामुळे उत्साह वाढला. पण मला

नंतर डि.पि.एड. करायचं होतं म्हणून मी माझ्या घराजवळ म्हणून भारती विद्यापीठ मध्ये ॲडमीशन घेतली. ( आमच्या कडचं हे पोस्ट ग्रॅज्युएशन म्हणायला हरकत नाही) पण इथे मला खुप मोठा ब्रेक घ्यावा लागला. आयुष्यात कधी कधी आपण खुप कात्रीत सापडतो व काय करावे कळत नाही.... तर माझ डि.पि.एड च वर्ष संपत आलेलं होतं आता परिक्षेला पंधराच दिवस शिल्लक आहेत म्हटलं तर नाशिकला माझे सासरे खुपच आजारी पडले ईकडे आड-तिकडे विहीर अशी अवस्था झाली.

जे व्हायला नको होते ते झालं. परीक्षा ही गेली व सासरे ही.... आपल्या आयुष्यात अशास्तव परिक्षा. अनेक वेळा येतात. तेव्हा काय निर्णय घ्यावा कळत नसतं पण मी मात्र नेहमीच सद्सद विवेक बुद्धी जागी ठेऊन माझ्या मनाचं ऐकते. त्यामुळे घेतल्यां निर्णयावर पश्चाताप होत नाही. तसा मला झाला नाही. पण जर मी इथे परिक्षाच देत बसले असते. तर मात्र परिक्षेत पास होऊ नाही मी आयुष्याच्या परिक्षेत नापासच झाले असते. व माझ्या सकट इतरांनाही ते आयुष्यभर लक्षात राहील असतं.... मग माझ्या त्या डि.पी.एड. ला काही महत्त्व मिळालच नसतं...

त्यानंतर काही वर्षानी मी शाळेत नोकरी करून पेटिंग पण करायचं ठरवलं.

लग्नानंतर जवळजवळ ११ वर्षांनी साईशा (गार्गी ) माझी लेक हीचा जन्म झाला. त्यामुळे तसं मी फार अडकली नव्हते त्यामुळे बरचं काही करायचं स्वातंत्र्य होतचं म्हणून अधं मुलांच्या शाळेत जाऊन कार्यशाळा घेतल्या त्यांचे

भरवले त्यात मदत केली. ममता फौंडेशन या माध्यमातून एच.आय.व्ही.ग्रस्त मुलांना चित्रकला हस्तकला शिकवणे अशा बऱ्याच कार्यशाळा मला घेता आल्या पण यातून त्यांना शिकवण्यापेक्षा मला स्वत:ला खुप शिकायला मिळाले.

सगळचं नवीन शिकायचं स्वभाव असल्यामुळे धावपळ तर होतेच पण त्यात मला संदीप (माझे पती) यांची खुप साथ मिळते. माझ्या पेन्टींग क्षेत्रात मला काही बक्षिसे पुरस्कार मिळाली. पण त्यापेक्षा मला कामाचं समाधान जास्त महत्त्वाचं वाटतं.

आज इतर महिला जेव्हा नावारूपाला येतात व त्यांची काहाणी आपण जेव्हा वाचतो व ऐकतो तेव्हा खरच खूप प्रेरणादायी वाटते.... तशी तर माझी प्रेरणा म्हणजे ‘ माझी आईच’ आई घर संभाळणारी मस्त जेवण तयार करणारी आपले लाड करणारी. हवे नको सगळ्यांचच पाहणाऱ्या आईलाच महिला दिनाबद्दल महिला दिनाबद्दल प्रणाम करावेसे वाटतेय.... कारण आजही माझी एकुलती एक लेक असून देखिल माझ्या आईने माझ्यासाठी जे केले ते मी माझ्या गार्गी साठी करू शकेन की नाही ही भीती आहे.

संसाराचे जाते चालू आहे....
चित्रकाराचे गाव आहे.
साईच्यां आनंदी सहवासात
माझे स्मित सतत चेहऱ्यावर आहे.

चित्रकार होणे म्हणजे नवनिर्मितीचा आनंद आहे. आणि सर्जन शीलतेचा महोत्सव आहे. आपण रोज नव्या गोष्टी जन्माला घालत असतो त्यासाठी आपला आत्मा त्यात ओतत असतो. जगात असंख्य गोष्टींचा महासागर हेलावत असताना या सगळ्यांना आपल्या स्मृतिमंजूषेत साठवून त्याचा अमृतकुंभ काढण्याचे काम चित्रकारालाच जमतं. म्हणून चित्रकार हा समाजासाठी खूप मोठं वरदानच आहे. म्हणायला हरकत नाही.

समाधानी आयुष्य

खरे तर मी माझ्या आई वडिलांचे घर सोडून कलेच्या ध्यासापाई पुण्याला आले होते. पण खरेच सांगायचे झाले तर त्यावेळी पळुन येण्याचा जो मी निर्णय घेतला त्याबद्दल मला यात किंचितही पश्चाताप होत नाही. त्याचे कारण मी मला हवे तसे जीवन जगू शकले व तसे तयार केले. एक कलाकार म्हणून जो नवनिर्मितीचा आनंद असतो तो मी आजतागायत मिळवतेय.... रोजच मी काहीना काही तरी कलेच्या माध्यमातून करतच असते व कलेच्या शिक्षणाचे योगदान देण्याचे पवित्र कामही माझ्याकडून घडते त्याचेही मला खूप समाधान लाभते.

# उंच माझा झोका...

**आशा गजरे यांचे जीवन संघर्षमय असून देखील परिस्थितीत धैर्याने वाट काढून सेवाव्रत स्वीकारले एवढेच नव्हे तर पाच दिवसाच्या बाळाचे मातृत्व स्विकारुन माणुसकी जिवंत असल्याचा दाखला देणाऱ्या आशाताई यांनी रुग्णसेवेचा नंदादिप तेवत ठेवला आहे.**



आशा पंडित गजरे
रूग्णसेविका
चोपडा जि.जळगांव
९०४९०११११६४

माझा जन्म १९६४ सालचा चुंचाळे यावल (जळगांव) चा आई मंडाबाई तर वडिल पंडित . वडील पेशाने शेतमजूर. दोन भाऊ एक बहिण.

परिस्थिती हालाखीची त्यात वडिलांचे छायाछत्र हरपले आमच्या वर खूप मोठा डोंगर कोसळला परंतु हार न मानता मार्ग काढला.

इ. १ ली ते ६ वी पर्यन्तचे शिक्षण. जि.प. शाळा चुंचाळे येथे झाले. इ. ६ वी पर्यन्त नंतर शिक्षण घ्यायचे की , नाही हा प्रश्न समोर उभा होता. सुट्यांमध्ये मजुरी करून शालेय साहित्य घेतले त्यावेळेस मी १२ वर्षाची होती. इ.७ वी ते इ. १० वी पर्यतचे शिक्षण आदर्श विद्यालय दहिगांव (यावल) येथे घेतले.

चुंचाळे ते दहिगांव येऊन जाऊन २० कि.मी अंतर रोज पायी जात होते पायात चप्पल सुद्धा नव्हती. इ. १० वी . फर्स्टक्लास मध्ये पास झाली म्हणून मला स्कॉलर शिप (११००रू) मिळाली खूप आनंद झाला कारण रॉकेलच्या चिमणी समोर बसून अभ्यास केला. केव्हा केव्हा तर चिमणी पण विझून जायची मग चंद्राच्या चांदण्यात बाहेर बसून अभ्यास केला.

इ. १०वी पास झाल्यांनतर शिक्षण करायचे की नाही हा प्रश्न होता. कारण डोळ्या समोर काहीच कोणाचा आधार नव्हता. परंतु माझी आई कधीच हिम्मत हरली नाही. तिने मला इ. ११ वी ला यावल येथे प्रवेश घेण्यास तयार केले. त्याच वेळी नर्सिंग चा फॉर्म भरला. ज्या दिवशी तोंडी मुलाखत झाली त्या वेळेस माझी परिस्थिती कथन केली व १०वी ला चांगले मार्क्स असल्यामुळे मला ट्रेनिंगसाठी बोलाविण्यात आले.

१९८३ साली नर्सिंग ट्रेनिंगला सामान्य रूग्णालय जळगांव येथे हजर झाले.

दिड वर्षानंतर प्रशिक्षण आटोपले नंतर सरकारी नोकरी मिळाल्यानंतर खाजगी रूग्णालयात काम करू लागले. सरकारी दवाखान्यात काम करतांना आहे त्या परिस्थितीत रूग्णसेवा करू लागले.

हातेड प्रा.आ.केद्र येथे हजर झाले. कर्तव्य बजावत असतांना अपघात झाला. त्यात मणक्यांना इजा झाली. चालता येत नव्हते. म्हणून सर्जरी झाली. सहामहिन्यांतर मला आरोग्य साहाय्यीका प्रशिक्षणासाठी अकोला येथे बोलविण्यात आले. त्या प्रशिक्षणानंतर परीक्षा दिली त्यात: चांगला मार्कानी ८२% पास झाले. आरोग्य सहाय्यीका म्हणून पदोन्नती मिळाली. त्या ठिकाणी नंतर सोबत असलेले आरोग्य साहाय्यक (मेल)पुरूष दोन्ही पदे रिक्त झाले. आणि सर्व पदभार एकटी सांभाळत होते. चार पंदाचे काम एकटी करत होते.

त्या काळात २०१७-२०१८ मध्ये विशेष मिशन इंद्रधनुष्य कार्यक्रम आला माझे कार्यक्षेत्रात काही भाग असो आहे की त्या भागात जायला रस्ता नाही. स्वत: रस्ता

काढला आणि उमर्टी, मोरचिडा, सत्रासेन, उत्तमनगर, नवाड भागातील प्रत्येक मुलां पर्यन्त पोहचून प्रत्येक बालकांना शोधून लसीकरणाचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यावेळी ड्यूटीवर असतांना डोगंरात माझा अपघात झाला. कमरेला व मणक्यांना इजा झाली. ० ते ५ वर्षे वयोगटातील बालके डोळ्यासमोर दिसत होती त्यांच्या आशिर्वादाने मी या अपघातातून बरी झाली. त्यावेळेस जवळ पास ८०.९०% बालकांना संरक्षित केले.

माझ्या आयुष्यातील ९ माता माझ्या प्रयत्नांनी जिवंत आहेत. कुपोषित मुले स्वत: दत्तक घेऊन औषधोपचार करित असते. रूग्णाचे, कुष्ठरोग, माताबाल संगोपन. सिकजसेल, हिवताप, व जल जन्य आजार, मानव विकास स्त्रिं वा. नसबंदी कॅम्प सामाजिक कार्यात सहभाग घेऊन शासनाच्या राबविण्यात येणाऱ्या निति आयोगाच्या योजना १००% राबविते आहे.

इ.स २०१४ मध्ये बेटी, बचाव बेटी पढाव कार्यक्रमात नेहमी सहभाग असतो. २००३ मध्ये मी स्वत: एक पाच दिवसांची मुलीची जबाबदारी स्वीकारली आहे.ती आता (तुनश्री) १०वी वर्गात शिकत आहे. माझ्यात प्रत्येक कामात माझे पति गोपीचंद लहू सोनवणे यांचा मला खूपच आधार असतो.

मला १ मुलगी, १ मुलगा आणि तनुश्री असे तीन अपत्ते आहेत. तनुश्री ५ दिवासांची होती तेव्हापासून माझ्या जवळ आहे. शासनाने दिलेल्या जबाबदाऱ्या इनामदारीने पार पाडल्या त्याचे फळ म्हणून २००६ पासून विविध क्षेत्रातील संस्था कडून पुरस्कार मिळाले बेटी बचाव-देश बचाव च्या राजीव गांधी आदर्श कर्मचारी पुरस्कार मिळाला. जिल्हास्तरीय ९ प्रकाराचे पुरस्काराचा त्यात समावेश आहे.

विविध संस्था असे एकूण १६ पुरस्कार आता पर्यंत मिळाले. मला काहितरी मिळावे म्हणून कधीच काम केले नाही. मी फक्त मला दिलेली जबाबदारी पार पाडत होते. आणि त्यातून मला मिळालेला लोकांचा प्रतिसाद त्यांचा माझ्या प्रति विश्वास, आणि मिळालेला आशिर्वाद यामुळे मी माझ्या क्षेत्रात यशस्वी ठरवले. २०१९ चा नॅशनल फ्लॉरेन्स नाइटिंजेल अवार्ड भारताचें महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद साहेब यांच्या हस्ते दिलेली येथे विज्ञान भवन येथे मिळला. या पुरस्काराने रूग्णसेवेचे चीज झाले असेच म्हणावे लागेल.

**महिलांनो तुमच्यासाठी ...**

## अटकेसंबंधी महिलांचे अधिकार...

* महिलांना फक्त महिला पोलिस सूर्योदयानंतर आणि सुर्यास्तापुर्वी अटक करू शकतात.
* कुटूंबाच्या सदस्यांच्या उपस्थितीत योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते.
* स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.
* महिलांच्या तक्रारीचे स्वरूप असेल तर पोलिस एफआयआर दाखल करतात.
* एफआयआर दाखल केला, तर त्याची प्रत देणे पोलिसांवर बंधनकारक आहे.
* सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयापुर्वी कुठल्याही महिलेला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी थांबवुन ठेवता येत नाही.
* पोलिस ठाण्यात महिलेची चौकशी सुरू असेल, तिथे महिला कॉन्स्टेबल असणे अनिवार्य आहे.
* महिला आरोपीची वैद्यकीय तपासणी महिला डॉक्टर करील किंवा महिला डॉक्टरच्या उपस्थितीत पुरूष डॉक्टर करू शकेल.
* कुठल्याही महिला साक्षीदाराला पोलिस ठाण्यात येण्याची सक्ती करता येणार नाही. गरज भासल्यास पोलिस तिच्या घरी जातील .

* संकलन- **सोनिका संदेश हजारे**



जागतिक
महिला
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा !



सौ.वैशाली
सुनिल सोनवणे

पंचायत समिती सदस्य
मांडळ, ता.शिरपूर जि.धुळे




जागतिक
महिला
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा !



सौ.उज्वलाताई
निलेश पाटील

लोकनियुक्त : सरपंच, बाळदे, ता.शिरपूर जि.धुळे



नारी शक्ती
महान शक्ती








सौ.वैशाली वासुदेव देवरे
नगरसेविका,
शिरपूर वरवाडे नगरपरिषद,शिरपूर



जागतिक महिला
दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !






सौ.चंद्रकला संतोष माळी
नगरसेविका,
शिरपूर वरवाडे नगरपरिषद,शिरपूर

# श्री एकवीरा देवी व रेणुका माता मंदीर ट्रस्ट



रजि. नं. २०० अ / १९५५ महाराष्ट्र, धुळे

या देवी सर्वभुतेषु शक्तिरूपेण संस्थितः | नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ||

**महिला भक्तांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**

एकवीरा देवीस दिलेली देणगी आयकर
सवलतीस पात्र क्रन आआ/तकनीकि/१२एए (१) २०१२-१३/३८९१ दि.
२७/२/२०१३ ८० जी ६०/८२/२०१२-२०१३/३८९० दि. २७/०२/२०१३
अंध/अपंगांसाठी व्हील चेअरची सुविधा.. मंदीर विकासासाठी सढळ हाताने मदत करा.

| | | |
|---|---|---|
| बँकऑफमहाराष्ट्र खाते नं. | : | 20110749738 |
| आयएफसीसी कोड | : | MAHB0000348 |
| पॅन कार्ड नं. | : | AVQFSI1226F |
| देना बँकखाते नं. | : | 023110004795 |
| आयएफसीसी कोड | : | BKDN0520231 |

.. विश्वस्त मंडळ ..

श्री. मधुकर वल्लभ गुरव (कार्यकारी अध्यक्ष)
श्री. सदाशिव कालिदास पुजारी (ट्रस्टी)
श्री. मनोहर त्र्यंबकगुरव (ट्रस्टी)
श्री. चंद्रशेखर गुरव (पुजारी)



.. मुख्य विश्वस्त ..

श्री. सोमनाथ निंबा गुरव
मो. ९८५०२ ५८४८० / ८३०८८ ६९३३४

श्री. एकवीरा देवीची शोभायात्रा काढणेसाठी १८ फुट उंचीचा संपूर्ण पितळी धातूचा २ घोडे, इष्ट देवी देवतांच्या मूर्ती असलेला पाच टन वजनाचा अष्टकोनी नक्षीदार असा रथ बनविण्याचा निश्चय करून रथ बनविण्याची ऑर्डर दक्षिण भारतात कुंभेकोनम या गावी श्रीराम हॅण्डीक्राफ्टस् यांना देण्यात आलेली आहे. या सर्व कामासाठी सुमारे ३० लाख रूपयांचा खर्च अपेक्षित आहे. तसेच रथ धुळे येथे येईपर्यंत ३ ते ४ लाख रूपये इतका खर्च अपेक्षित



# महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

रजि.नं.१३५/२०१७ दि.१६/३/२०१७

विना सहकार नाही उध्दार

## धुळे जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था लि. धुळे



श्री.जितेंद्र गवळी (चेअरमन)

श्री. संजय साळुंके (गट नेते)
श्री. राजेंद्र पाटील (गट नेते व तज्ञ संचालक)
श्री.प्रभाकर भामरे (गट नेते)



श्री.प्रविण देसले (व्हा.चेअरमन)

**संचालक मंडळ**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.उज्वल भामरे | श्री.कल्पेश माळी | श्री.साहेबराव चौरे | श्री.ज्ञानेश्वर पेंढारकर |
| डॉ.मधुकर चौधरी | श्री.सारंगकुमार देवरे | श्री.हेमंत सुर्यवंशी | श्री.धनराज पाटील |
| श्री.महेंद्र पाटील | श्री.विलास माळी | श्री.चेतनकुमार पाटील | श्रीमती रुपाली पाटील |

श्रीमती किरणमाई सोनवणे

श्री.विजय पाटील(का.संचालक) श्री.अजयकुमार भदाणे(मॅनेजर)

# उंच माझा झोका...

**विजया कैलास हिरेमठ यांनी वाचनासाठी तहानलेल्यांची तहान भागवण्याचे कार्य तेही विनाशुल्क केले. आजच्या महिलांना व बालकांना टि.व्ही व मोबाईल स्क्रीन मधून बाहेर आणून वाचनाचे वेड लावण्याचे एक उत्तम कार्य केले त्यांचा जीवनप्रवास.**



विजया कैलास हिरेमठ
वाचन चळवळ
सांगली
९५११७६२३५१

वाचनाने आयुष्य बदलते असं म्हणण्यापेक्षा वाचनामुळे आपले विचार ,आचार बदलतात आणि त्यायोगे आयुष्यही बदलते असं मला वाटतं. जेव्हा काही कारणांनी जगाशी ,आजूबाजूच्या व्यक्तींशी कमी संबंध यायला लागतो तेव्हा वेळ कुठे घालवायचा? कसा घालवायचा? असा मोठा प्रश्न पडू लागतो तेव्हा साथ देतात ती पुस्तके आणि पुस्तकातून भेटणाऱ्या निरनिराळ्या व्यक्ती.

लहानपणी शाळेत असताना मी अभ्यास,गायन,खेळ या सर्वच गोष्टीत हिरहिरीने भाग घ्यायचे . चउउ ,सामुदायिक कवायत यामध्ये मी शाळेचे नेतृत्व करायचे. सुरवातीला शिक्षक सांगत म्हणून सगळ्या गोष्टी करताना ,शिकताना खूप काही कळायचं असं नाही पण सगळ्या गोष्टी मनापासून करायच्या इतकं मनाशी पक्क असायचं. आज जेव्हा मागे वळून पाहते तेव्हा शिस्तप्रियता,वक्तशीरपणा,कामाप्रती निष्ठा,नेतृत्व, वक्तृत्व ,आत्मविश्वास या गोष्टी मला माझ्या शाळेने माझ्या शिक्षकांनी मला दिलेली देणगी आहे ,असं मनापासून वाटते. कॉलेजमध्येही शिक्षकांनी या सर्व गोष्टींना प्रोत्साहन दिले. त्यामुळे समूहासोबत रहायची सवय झाली.

मला आठवतंय मला आणि माझ्या बहिणीला वाचनाची आवड होती. दोघी मिळून घरचा पेपर तर वाचायचो पण वाचनाची भूक भागवण्यासाठी रद्दीत मिळणारी खजाना,चंपक ही आम्ही गोळा करायचो. शेजाऱ्यांच्यात गेलो की मिळेल ती पुरवणी, छोटी पुस्तके वाचायला घेऊन यायचो. लहानपणापासूनची वाचनाची आवड आणि थोडं कळायला लागल्यावर स्वतःचे अनुभव लेख ,कविता,दैनंदिनी या माध्यमातून लिहायची सवय लागली. दहावी नंतर मात्र कॉलेज ,जॉब यामुळे वाचन लेखन यापासून दूर व्हायला लागले,कदाचित त्यावेळची ती गरज असावी. ग्रॅज्युएशन नंतर ही कॉलेज, जॉब आणि संसार अश्या तिहेरी भूमिकेत असताना अवांतर वाचन ,लेखन यापासून अक्षरशः तुटले. पण मनाच्या तळाशी या गोष्टी जिवंतच होत्या. पहिल्या गरोदरपणात रिकामा वेळ जास्त नसला तरीही वाचायला पुन्हा सुरवात झाली पण डिलीव्हरी नंतर पूर्वीच्या जबाबदाऱ्यांसोबत मातृत्वाची नवी जबाबदारी अंगावर आली आणि परत वाचन प्रवासात एक मोठा खंड पडला.

त्यानंतर जवळजवळ सात वर्षे न काही वाचलं न काही लिहलं. पण दुसऱ्या मुलाच्या वेळी गरोदरपणात डॉक्टरांनी संपूर्ण विश्रांतीची सक्ती केली आणि मग मी पुन्हा एकदा पुस्तकांच्या सहवासात मनसोक्त रमू लागले. टीव्ही पाहणे, वायफळ गप्पा मारणे,मोबाईलचा जास्त वापर करण्याच्या सवयी नसल्यामुळे या काळात पुस्तके आणि वाचन यासाठी माझ्याकडे काही पर्यायच नव्हता.पूर्वीपासून असणारी वाचनाची आवड आणि आता भरपूर उपलब्ध असणारा मोकळा वेळ यामुळे पुस्तकांसोबत दिवस रात्री जाऊ लागल्या. मला वाचताना पाहून नुकतीच छान वाचायला

शिकलेली सात वर्षांची माझी मुलगी ईश्वरी हिला वाचनाची आवड निर्माण झाली. हा माझ्यासाठी खूप छान अनुभव होता.

मी जिजाबाईंच्या आयुष्यावरील अग्निरेखा,डॉ अब्दुल कलाम यांचे अग्निपंख सोबतीला महाश्वेता, युगंधरा या कादंबऱ्या सुधा मूर्तींचे कथासंग्रह ,एक होता कार्व्हर ही पुस्तके वाचली. माझ्या वाचनानंतर मी जेव्हा पुस्तकांविषयी मैत्रिणींशी बोलायचे तेव्हा त्या ही पुस्तकांविषयी भरभरून बोलायच्या मग आम्ही आवर्जून पुस्तक खरेदी करून एकमेकींबरोबर ती पुस्तके शेअर करू लागलो.यातूनच मोफत वाचनालय ही संकल्पना मनात रुंजी घालू लागली. महिलांकडे थोडाफार मोकळा वेळ असतो त्यात त्यांच्या हाती जर सहज पुस्तक पडू लागल तर त्या नक्की वाचतात ही गोष्ट सातत्याने जाणवू लागली.

पुस्तके प्रेरणा देतात, आनंद देतात आणि सकारात्मक दृष्टिकोन देतात. या गोष्टी मी स्वतः मनापासून अनुभवत होतेच आणि हा अनुभव मला माझ्या मैत्रिणींना द्यायचा होता म्हणूनच ८ मार्च २०१७ च्या महिला दिना दिवशी कॉलनीतील सार्वजनिक कार्यक्रमात मी माझ्या मनातील मोफत वाचनालय ही संकल्पना सर्वांसमोर मांडली. परंतु कोणाकडूनही मला काही प्रतिक्रिया किंवा सकरात्मक प्रतिसाद न आल्याने माझा हिरमोड झाला. पण आमचे मैत्रिणींचे वाचन मात्र सुरू होते. याच दरम्यान ईश्वरी आणि तिच्या सोबतच्या मुलांना वेगवेगळी पुस्तके मिळाली तर ती वाचतात असा एक अनुभव आला. आजूबाजूला टीव्ही ,मोबाईल मध्ये गुंतत जाणाऱ्या मुलांच्या पालकांची मुलांना या जाळ्यातून सोडवण्याची धडपड दिसत होती त्यामुळे पुस्तके हा मुलांसाठी मनोरंजनाचा उत्तम पर्याय आहे असे मनापासून वाटतं होतं . म्हणूनच मैत्रिणींपुढे प्रत्येकी २०० रुपये जमा करून मुलांसाठी छोटी पुस्तके खरेदी करूया असा प्रस्ताव मी ठेवताच मैत्रिणींनी तत्काळ होकार दिला. माझी मैत्रीण सुनंदा कदम हिने तर वर्षभरापूर्वी मी पाहिलेले वाचनालयाच स्वप्न आपण सत्यात उतरेल हा विश्वास दिला . आजूबाजूच्या लोकांनी वाचून झालेली जुनी पुस्तके आम्ही घरोघरी जाऊन आम्हाला देण्याची विनंती केली.लोकांनीही आम्हाला खूप छान प्रतिसाद दिला, यातून मुलांसाठी २५० तर मोठ्यासाठी १५० पुस्तके आम्ही जमा केली. आणि ८ मार्च २०१८ रोजी मी आणि माझ्या ७ मैत्रिणींनी मिळून 'वाचनप्रेमी' 'वाचनालय' माझ्याच घरी सुरू केले. मी पाहिलेलं मोफत वाचनालयाचा स्वप्न माझ्या मैत्रीणींच्या सोबती मुळेच सत्यात उतरले याचा खूप अभिमान वाटतो.

आमच्या या उपक्रमाची माहिती आम्ही सोशल मिडियाद्वारे लोकांना दिल्यानंतर सांगली व सांगलीच्या आसपास भागातूनच नव्हे तर पुणे,मुंबई,कोल्हापूर,नाशिक येथून वाचनप्रेमींनी आम्हाला मोफत आणि स्वखर्चाने पुस्तके पाठवून प्रोत्साहित केले. इतक्या विश्वासाने या सर्वांनी दिलेली पुस्तके आता वाचकांपर्यंत पोहचवण्याची आमची जबाबदारी लक्षात घेऊन आम्ही फक्त

पुस्तके न्या,वाचा , वेळेत आणि सुस्थितीत परत करा या एका अटीवर कोणालाही पुस्तके देऊ लागलो.

पुण्यातील जयश्री तडफळे मॅडम यांनी त्यांच्याकडे वापरात नसलेली ३५० पुस्तके वापरली जावीत,मुलांनी वाचावीत अश्या आशेने अत्यंत विश्वासाने आम्हाला पाठवली. तेव्हा ही पुस्तके जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहचवीत यासाठी प्रयत्न करीत असतानाच सांगलीतील संवाद बालक पालक व्हाट्स अप ग्रुपच्या संस्थपिका अर्चना मुळे मॅडम यांच्याशी संपर्क झाला आणि या वाचन चळवळीने खऱ्या अर्थाने मार्गक्रमण करायला सुरुवात केली.

संवादाची कार्यकारी टीम आणि वाचनप्रेमी वाचनालय टीम यांनी मिळून 'जिथे मुले तिथे पुस्तके' या संकल्पनेवर आधारित संवाद वाचनकट्टा हा उपक्रम सुरू केला. आज सांगली आणि आसपासच्या भागात दर शनिवारी आणि रविवारी १५ ठिकाणी मुले व पालक यांच्यासाठी वाचनकट्टे होतात. वाचनप्रेमी वाचनालयातून या वाचकट्ट्यावर पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. ४० समन्वयिका स्वतः वाचकट्ट्यावर मुलांना वाचायला,लिहायला,व्यक्त व्हायला प्रोत्साहित करतात. कोणत्याही अपेक्षेशिवाय या सर्व समन्वयिका प्रत्येक वाचनकट्ट्यावर स्वतः चा वेळ

आणि ज्ञान निस्वार्थीपणे देतात. वाचनकट्ट्यावर वाचनासोबत ध्यान,विविध खेळ,कविता, गाणी,गोष्टी सांगण्याचे वेगवेगळे प्रयोग सुरू असतात.

मुले अनुकरणप्रीय असतात. आपल्या आजूबाजूला ,आई-वडिलांकडे ,नातेवाईकांकडे पाहून मुले खूप काही शिकतात. म्हणून मुलांसोबत माता पालकांनीही वाचनप्रवाहात यावे यासाठी संवाद आणि वाचनप्रेमी वाचनालय टीमने 'संवादिनी' हा उपक्रम सुरू केला. यामध्ये प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेस आम्ही ३० संवादिनी एकत्र येतो. वाचनालयातील पुस्तकांची देवाणघेवाण करून गेला महिनाभर वाचलेल्या पुस्तकांचा अभिप्राय सर्वांसमोर सांगतो आणि त्यावर चर्चा करतो. चालु घडामोडी,स्वतः च्या समस्या,आपले उपक्रम याविषयी छान गप्पा होतात.

महिलांच्या भिशी आणि किटी पार्टीसारख्या फॅडला मोडीत काढीत आम्ही संवादिनी विचारधन लुटतो.पैसे गोळा करतो पण ते नवीन पुस्तक खरेदीसाठी.

इतक्या साऱ्या महिला एकत्र येऊन असा जगावेगळा सामाजिक उपक्रम राबवित आहेत याच आजूबाजूच्याच काय तर आमच्या घरच्या लोकांनाही आश्चर्य वाटतं कारण महिला एकत्र येऊन साड्या,दागिने,फॅशन,एकमेकींची उणीदुणी काढण्या व्यतिरिक्त काही चांगलही काम करू शकतात हे आम्ही सर्वजनींनी दाखवून दिले आहे. नोव्हेंबर २०१९ मध्ये आम्ही आमचा पहिला संवाद विशेषांक प्रकाशित केला. त्यामध्ये संवाद ग्रुपमधील बालक- पालक ,संवादिनीतील महिला,मान्यवर लेखक - कवी यांचे लेख ,कविता प्रकाशित करण्यात आल्या.

आमच्या वाचनप्रेमी वाचनालय,संवाद ,संवादिनी या सर्व उपक्रमासाठी समाजातील निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवरांचे सहाय्य, मार्गदर्शन आम्हाला वेळोवेळी भेटत आहे. हे सर्व आम्हाला पुस्तकरूपी किंवा पुस्तके खरेदी व इतर उपक्रमासठी देणगीरुपी भेट देऊन आमच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व प्रोत्साहन देत आहेत.

छोट्याशा वाचनालयाचे स्वप्न तर सत्यात उतरलेच पण त्याची व्याप्ती इतकी वाढेल याची आम्ही कधीच कल्पना देखील केली नव्हती. पण समविचारी लोक एकत्र आली की क्रांती घडते त्याप्रमाणे वाचनालयाचे रोपटे आता वटवृक्ष होऊ पाहत आहे. निरंतन ,निस्वार्थी काम करणे आणि त्यातून आनंद मिळवणे आणि तो इतरांना वाटणे या एकाच उद्देशाने आम्ही साऱ्या मैत्रिणी मिळून काम करीत आहोत . एकमेकींच्या सहकार्याशिवाय हे कार्य चालू ठेवणे अशक्यच आहे .

म्हणूनच
मिळुनी साऱ्याजणी
एक मत एक विचारांनी
उत्तुंग ध्येय बाळगू मनी
यशवंत होऊ आम्ही
सदैव कार्यमग्न राहुनी...

**महिलांनो तुमच्यासाठी ...**

# दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल...

सासु-सासऱ्यांच्या स्थावर आणि जंगम मालमांतवर सुनेचा काहीही अधिकार नाही असा निर्णय एका प्रकरणावर सुनावणी करतांना दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. एका महिलेने न्यायालयात याचिका दाखल करुन सासु-सासऱ्यांकडे देखभाल खर्च मागत नसल्याने त्यांच्या घरात राहू दिले जावं अशी मागणी करणारी याचिका केली होती. महिलेने यापूर्वी नवऱ्यावर आणि सासु-सासऱ्यांवर हुंड्यासाठी छळत असल्याचा आरोप केला होता. घटकस्फोटासाठीही अर्ज केला होता. परंतु सासऱ्यांनी जिल्हा न्यायालयासमोर सुन मारहाण करते म्हणून दिला घरातून बाहेर पडण्यास सांगितले होते. म्हणून हि महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावर सासु-सासऱ्यांची मालमत्ता पैतृक असेल किंवा स्वकमाईची त्यामुळे त्यांच्या मालकी हक्कात बाधा येत नाही त्यांना मालकीचा घरात शांततापूर्ण जिवन जगण्याचा अधिकार असून ते वारसालाही घरातून बाहेर जाण्यास सांगू शकतात. असे न्यायालयाने म्हटले आहे.

* संकलन- **सोनिका संदेश हजारे**

# उंच माझा झोका...

**गीतांजली कोळी यांचे स्वत:चे आयुष्य नवऱ्याच्या दारूच्या नशेपायी उद्ध्वस्त झाले परंतू स्वत:च्या जीवनातील समस्यांचे भांडवल न करता व कुठलेही पाठबळ नसतांना संपूर्ण महाराष्ट्राला दारूच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचे स्पप्न पाहणाऱ्या नारीशक्तीचे प्रतिक आहे.**



गीतांजली कोळी
दारूबंदीचे ध्येय
धुळे
९५२७८५०७४२

महाराष्ट्रातील तळागाळातील घराघरातील महिला ज्या समस्याशी अगदी सतत वर्षानुवर्षे पासून लढा देत आहेत ती जटील समस्या म्हणजे दारू. घरातील कर्ते माणसं, तरूण मुले दारू च्या आहारी गेल्याने आपल्या उघड्या डोळ्याने स्वत:च्या संसाराची राखरांगोळी झालेली महिला पाहत आहेत.....

या महिलांच्या आक्रोशातून,वेदनातून खान्देशातील एका अगदी सामान्य,साध्या भाड्याच्या घरात राहून पार्लर चा व्यवसाय सांभाळून एका महीलेने संपूर्ण महाराष्ट्र दारूबंदी महिला युवा मोर्चा ची स्थापना धुळ्यात करून महिलांच्या आक्रोशाला वाचा फोडली...

वीस वर्षांच्या संसारात व्यसनांच्या आहारी गेलेल्या जीवनसाथी सोबत संघर्ष करीत मुलाबाळांसह संसार सांभाळणाऱ्या धुळे येथे राहणाऱ्या गीतांजली कोळी भाड्याच्या घरात राहतात.तसेच भाड्याचा रूम घेऊन महिलांसाठी पार्लर ही चालवितात.त्यामुळे लहान मोठ्या सर्वच महिलांशी संपर्क येत होता. महिला विषयी काही करण्याच्या धेय्यातून पदरी पैसे नसतांना एका वकिलाच्या पत्नीला पार्लर चे प्रशिक्षण देऊन त्याच्या मोबदल्यात त्यांची मदत घेऊन विरांगना झलकारी बाई कोळी स्त्री शक्ती सामाजिक संस्था ची २०११साली धुळ्यात स्थापना केली.

त्यामार्फत महिलांना वेगवेगळया समस्या सोडविण्यासाठी मदत करणे, महिला दिन, निरक्षर महिलांना शिकविणे, कष्टकरी महिलांना दरमहा मोफत किराणा वाटप करणे, दिवाळीला दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून झोपडपट्टी मध्ये जाऊन शंभर महिलांना किराणा वाटप करणे.यासारखे बरेचसे उपयुक्त उपक्रम झलकारीबाई संस्थेच्या वतीने राबविण्यात पुढाकार घेतला.

परंतु हे सर्व करीत असताना महिलांच्या मनावरील आघात बघतांना सर्व सामान्य, गरीब महिलांच्या घरात दारू मुळे अतिशय भीषण परिस्थिती उद्भवली आहे आणि या त्रासातून महिलांची मुक्ती आणि तरूणांची व्यसनमुक्ती होण्याची नितांत गरज आहे अशी जाणीव गीतांजली ताई यांना झाली.स्वत:ही त्यांचं जीवन या निखा-यावरून चालतांना भाजून निघालेले होते.

खंबीर निर्णय, ठाम आत्मविश्वास गाठीला बांधून महिला भगीनींशी चर्चा केली.सर्व महिला भगीनींनी दारू बंदी व्हायलाच पाहिजे असा कौल दिला.

दहा महिला मैत्रिणींच्या साक्षीने २३जुलै २०१७रोजी विरांगना झलकारी बाई कोळी स्त्री शक्ती सामाजिक संस्थेच्या माध्यमातून.संपूर्ण महाराष्ट्र दारूबंदी महीला युवा मोर्चा ची धुळ्यात स्थापना झाली.

दै.पुण्य नगरी ने दखल घेत धुळ्यात दारू बंदी मोर्चा ची स्थापना अशी बातमी प्रसिद्ध करून प्रोत्साहन दिले.त्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या. गीतांजली कोळी यांना अनेक आप्तस्वकियांनी यासाठी कुठलेही प्रोत्साहन न देता उगाच

थोड्याच दिवसात त्रास झाल्यावर तुम्ही दारू बंदी करण्याचा नाद सोडणार असे सांगितले. त्यामुळे मैत्रिणी ंवरही दबाव येऊन मात्र मनातून शुभेच्छा देत दारू बंदी च्या कार्याला साथ देणा-या मैत्रिणी ही मागे हटल्या.

परंतु गीतांजली ताई मागे हटल्या नाहीत.

परंतु महाराष्ट्रातील दारू च्या व्यसनांच्या आहारी जात असलेली तरूण पिढी, गावोगावी दारू मुळे मरणारे लोक , दारू पिणा-यांकडून महिलांवर होणारे अन्याय अत्याचाराच्या घटना, कुटूंबातील दारू च्या आहारी गेलेल्या पुरूषांकडून महिलांच्या हत्या किंवा महिलांनी केलेल्या आत्महत्या यामुळे व्यथीत झालेल्या पेटून उठलेल्या गीतांजली कोळी यांनी एकट्याने निडरपणे हिम्मतीने संगीता सैदांणे, सगुणाबाई भिल या महिलांच्या साथीने गावोगावी जाऊन जनजागृती करून महीलांना एकत्र करीत दारूबंदी च्या सभा घेण्यास सुरुवात केली.गावोगावी दारू मुळे त्रासलेल्या महिला चे उदंड प्रोत्साहन मिळू लागले. धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील सोनेवाडी गावातून सुरूवात झालेल्या , दारूच्या व्यसनामुळे उभरत्या महाराष्ट्रातील महिलांचे संसार व तरूणांचे आयुष्य बरबाद होण्यापासून रोखण्यासाठी उभारलेल्या या क्रांतीकारी चळवळीला ख-या अर्थाने व्यापक स्वरूप मिळण्यास सुरुवात झाली.

या वास्तवाला धरून असलेल्या चळवळीला पहिली साथ मिळाली ती शिंदखेडा तालुका पोलिस स्टेशन च्या सहकार्याने. शिंदखेडा, धुळे,जळगांव, नंदुरबार जिल्ह्यातील पोलीस विभागाच्या सहकार्याने ८७ खेड्या पाड्यात दारूबंदी जनजागृती व धडक कारवाई होऊन त्यातील अनेक गावे दारूबंदीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत.

या कार्यात सारीकाताई रंधे, विजया मानमोडे, डॉ.जितेंद्र देसले, बापुसाहेब हटकर, आशाताई रंधे, पुष्पा शिरसाठ, विजय माळी, उज्वला ताई चौधरी, प्रवीण कुमार देवरे, चौगुले सर, ज्योती सुर्यवंशी, सुनंदा निकम, सुदाम महाजन, विश्राम बिरारी, डॉ. सुजाता आडे, सुशीला पगारीया, शोभा ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.सर्व पत्रकार बांधवांनी ताईंच्या या लढ्याला वेळोवेळी प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध देऊन लढ्याला व्यापक स्वरूप देण्यात मदत केली आहे.गीतांजली कोळी या सर्व साधारण महिलेने कोणाकडून कधीही कसलिही अपेक्षा न ठेवता. स्वत:च्या पार्लरच्या व्यवसायातून स्वत:चा कुंटूब, मुलेबाळे सांभाळून महाराष्ट्र दारू मुक्त करण्यासाठी धेय्यवेडाने, जिद्दीने खेडोपाडी मिळेल त्या वाहनाने प्रवास करून प्रसंगी वाहन नसतांना पायी फिरून दारू बंदी चा लढा उभारला आहे....

दारू मुळे उध्दवस्त संसार झालेल्या, तरूण मुले व्यसनाधीन झालेल्या मुलांची विदिर्ण अवस्था बघून व्यथित झालेल्या गीतांजली कोळी यांनी जोपर्यंत महाराष्ट्रात दारूबंदी होत नाही तोपर्यंत कोणत्याही सत्कार व पुरस्कार स्विकारणार नाही असा पण केला आहे.

**महिलांनो तुमच्यासाठी ...**

## दुसऱ्या पत्नीची मुले नोकरीस पात्र ...

सेवेत असतांना मृत्यु पावलेल्या सरकारी कर्मचाऱ्याने पहिली पत्नी हयात असतांना दुसरा विवाह केला असेल तर त्याच्या मृत्यु नंतर दुसऱ्या पत्नीची मुलेही अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरतात असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. अनुकंपा नोकरी हा हक्क नाही व दिवंगत पालका नंतर वारसा हक्काने मिळणाऱ्या संपत्तीप्रमाणे ती संपतीही नाही. तसेच बहुपत्नीत्वासारख्या कुप्रथेला आळा घालण्यासाठी निर्णय घेण्याचा अधिकार सरकारला आहे. हे मान्य केले तरी एकदा कायद्याने जी संतती औरस ठरविली गेली आहे तिच्या बाबतीत सरकारला भेदभाव करता येणार नाही. कोणाच्या पोटी जन्माला यायचे हे मुल ठरवू शकत नाही. सदरचा निकाल न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचुड व न्यायमूर्ती एम. आर. शाह यांच्या खंडपीठाने दिला आहे.

* संकलन- **सोनिका संदेश हजारे**

# उंच माझा झोका...

**सुरेखा दफ्तरे यांचे खेळाविषयीचे प्रेम व त्यासाठी वाट्टेल ते कष्ट सहन करण्याची वृत्ती कौतुकास्पद आहे. अभ्यासात देखील कुशाग्रबुध्दीमत्तेच्या जोरावर पी.एचडी.व सेट परिक्षा उत्त्तीर्ण झाल्या. त्यांची प्रत्येक कामात असलेली निष्ठा, प्रामाणिकपणा व चिकाटी पाहून मन अभिमानाने भरून येते.**



सुरेखा सुदाम दप्तरे
क्रिडा प्रशिक्षक
मालेगांव जि.नाशिक
९९७००४६५४८

मी डॉ. सुरेखा सुदाम दप्तरे महात्मा गांधी विद्यामंदीर संस्था, नाशिक या संस्थेत गेली बारा वर्षे क्रीडा संचालक म्हणून काम पाहत आहेत. मुळ गाव पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील अलदरे. हजार लोकवस्ती असलेले खेडेगाव छत्रपतींची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला, अष्टविनायकापैकी लेण्याद्री व ओझरचा गणपती, ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या रेड्याच्या मुखी वेद बोलविले, त्या रेडयाशी समाधी असलेले आळेगांव, माणिकडोळ, वडज पिंपळगाव, जोगा, येडगाव अशी चार धरणे, नाणेघाट आणि सह्याद्रीच्या पर्वत रांगांनी नटलेला असा जुन्नर तालुका. त्यात लेण्याद्रीच्या पायथ्याशी, शिवनेरीच्या कुशीत व पवित्र कुकडी नदीच्या तीरावर वसलेले अलदरे गांव. बालपण याच गावात गेले. आई-वडील शेतकरी आणि तीन मुले दोन भाऊ आणि त्यांची एकुलती एक बहीण, पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले.

लहानपणापासूनच खेळण्याची आवड होती. परंतु खेळासाठी लागणारे पोषक वातावरण गावाकडे नव्हते. म्हणून क्रिकेट खेळणे हा एकच छंद मी जोपासला. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. अशा परिस्थितीतही आईवडीलांनी त्यांना काही कमी पडू दिले नाही. नंतर आठवीला जुन्नर येथील कृष्णराव मुंढे विद्यालयात प्रवेश घेतला आणि तिथेच खऱ्या अर्थाने माझ्यातील खेळाडूचा श्रीगणेशा झाला. तिथेच असलेले गुंजाळ आणि श्रीमती डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव चालू केला. तिथे फक्त कबड्डी, खो-खो आणि मैदानी स्पर्धा हेच खेळ चालत. मैदानी स्पर्धात लांबउडी व उंचउडी ह्या क्रीडा प्रकारात मी सहभाग घेऊ लागल्या. पण तिथे पाहिजे तेवढी संधी मिळाली नाही. त्यातच दहावीतून अर्धवट शिक्षण सोडून द्यावे लागले. कारण होते दहावीच्या परीक्षा अर्ज भरण्यासाठी लागणारी फी. तेवढी पण माझ्याजवळ नव्हती. मला वाटले आता संपले माझे शिक्षण. पण हार मानली नाही. शेतामध्ये मजुरीचे काम चालू केले आणि दुसऱ्या वर्षी सतरा नंबरचा दहावीचा फॉर्म भरला आणि दहावी पास झाल्या. नंतर त्या अकरावीला जुन्नरमधील शिवनेरीच्या पायथ्यशी असलेल्या श्री छत्रपती महाविद्यालयात विज्ञान शाखेला प्रवेश घेतला. कारण वडीलांची इच्छा डॉक्टर करण्याची होती. पण माझे लक्ष फक्त मैदानच होते. त्यामुळे स्वत:हून विज्ञान शाखेतून कला शाखेत प्रवेश घेतला आणि खऱ्या अर्थाने मैदानाकडे वळले, घर ते महाविद्यालयातील अंतर पाच किलोमीटर आहे. सकाळी ७ वाजता मैदानावर

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No.

यायचे. पुन्हा १० वाजता घरी जायचे. पुन्हा १२ वाजता कॉलेजला जायचे आणि सायंकाळी ६ वाजता घरी जायचे असा २० किलोमीटरचा त्यांचा लेण्याद्री ते शिवनेरी व शिवनेरी व लेण्याद्री हा प्रवास दोन वर्षे चालू होता. अकरावीमध्ये फक्त खो-खो, कबड्डी व मैदानी स्पर्धा हेच खेळ खेळल्या, तिथे जास्तीत जास्त विभागीय स्तरावर खेळल्या १२ वीला गेल्यावर चुलत भाऊ दत्ता दप्तरे याला म्हणाले, 'दादा मला आता राष्ट्रीय स्तरावर खेळायचे त्यासाठी मी कितीही कष्ट घ्यायला तयार आहे.' कारण तो एक चांगला खेळाडू होता. त्याने ते मनावर घेतले. कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रमोद कबाडी यांच्याशी बोलले. कबड्डी व खो-खो खेळांना त्यांनी दुय्यम स्थान देवून सर्व लक्ष मैदानी खेळावर केंद्रीत केले. १०० मीटर धावणे या खेळाची त्यांनी निवड केली. सकाळी ३ तास व दुपारी २ तास असा रोजचा पाच तास सराव चालू केला. मग त्या तालुका पातळी, गटपातळी, जिल्हा विभागीय पातळीवर पोहचले. त्यात लांब उडीत विभागीय पातळीवर पराभूत झाले. पण उंच उडी व १०० मीटर या क्रीडा प्रकारात त्यांची राज्यस्तरावर निवड झाली. जिल्हा व विभागीय स्पर्धाप्रमाणे राज्यस्तरीय स्पर्धादेखील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे झाल्या. १०० मीटर धावणे या क्रिडा प्रकारात मी अंतिम सामन्यात चौथी आले. पण माझाच उच्चांक मोडून १२.०४ ही वेळ नोंदविली.

मी बारावी पास झाले आणि वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला. कबड्डी, खो-खो मागे पडले आणि हॅण्डबॉल, बास्केट बॉल, क्रिकेट, कोर्फबॉल, ॲथलेटिक या खेळात त्या सहभागी झाल्या. पहिल्याच वर्षी क्रिकेटमध्ये पुणे विद्यापीठ संघात सहभागी झाले. त्यानंतर मैत्रीण रत्ना माने हिने आव्हान दिले. बॉलगेम मध्ये विद्यापीठ खेळूच शकत नाही. माझे गुरू स्व. मेजर एन.ए.रोकडे सकाळी ६.३० वाजता यायचे, मग मी देखील सकाळी सायकलवर ६.४५ वाजता जायचे. तो अर्धा तास जास्त भेटायचा. तेव्हा त्या हॅण्डबॉल आणि बास्केटबॉल खेळायचे, खेळातल्या बारीक-बारीक गोष्टी शिकून घ्यायचे आणि त्याचवर्षी मैदानी स्पर्धा क्रिकेट, हॅण्डबॉल या खेळासाठी पुणे विद्यापीठ संघात निवड झाली. कोल्हापूर येथे झालेल्या अश्वमेध क्रीडा स्पर्धेत उंचउडी व तिहेरी क्रीडा प्रकारात पुणे विद्यापीठाला दोन पदके मिळवून दिली. त्याच वर्षी मलेशिया येथे होणाऱ्या पहिल्या आंतरविद्यापीठ कॉमनवेल्थ स्पर्धासाठी भारतीय विद्यापीठ संघात निवड झाली, आर्थिक परिस्थितीमुळे सहभागी होऊ शकले नाही. पण मी ठरविले क्रीडा संचालक होऊन, गरीब व होतकरू खेळाडूंना यशाच्या शिखरावर पोहचवीन, टी.वाय. ला असताना मैदानी स्पर्धा हॅण्डबॉल बास्केटबॉल, कोर्फबॉल या क्रीडा स्पर्धात पुणे विद्यापीठाचे नेतृत्व केले. त्याचवेळी मुंबई येथे झालेल्या अश्वमेध स्पर्धेत पुणे विद्यापीठाला तिहेरी उडीत सुवर्णपदक तर उंचउडीत रौप्य पदक प्राप्त केले. त्याचवर्षी प्रथमच पुणे ग्रामीण क्रिकेट संघाने पुणे शहर संघाचे पंधरा वर्षाचे वर्चस्व मोडीत काढले. त्यात नाबाद ५२ धावा व चार विकेट घेतल्या होत्या. टी.वाय. झाल्यानंतर बीपीएड ला प्रवेश घ्यायचा होता, चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयात प्रवेशासाठी गेले देखील. मात्र प्रवेशासाठी २१ हजार रूपये फी सांगितली, नंतर वसतिगृह फी, मासिक मेस धरले तर जवळजवळ ५० हजार खर्च होता आणि ते शक्य नव्हते. तेव्हा वाटले की माझे क्रीडा क्षेत्रातील करीयर संपले. मग एम.ए. साठी पुन्हा जुन्नर महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्याचवेळी रोकडे यांची बायपास सर्जरी झाली होती आणि डॉक्टरांनी त्यांनी पूर्ण आराम करायला सांगितला होता. सुरेखा दप्तरे सिनियर म्हणून मुलींच्या सर्व संघाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आणि तिथेच माझ्यातील प्रशिक्षक पुढे आल्या. आणि त्याच वर्षी महाविद्यालयाने बास्केटबॉल, कोर्फबॉलमध्ये विजय संपादन केला. हॅण्डबॉलमध्ये संघ उपविजयी झाला. तसेच मैदानी स्पर्धेत चॅम्पियनशिप संपादन केली. तेवढे यश पाहून संस्थेचे विश्वस्त बशीरभाई तिरंदाज यांनी एम.ए. ची सर्व ५ हजार फी भरली. दुसऱ्या वर्षी प्रथमच बीपीएड साठी महाराष्ट्र शासनाची प्रवेश पात्रता परीक्षा आली आणि परीक्षेत त्या १०० पैकी ९६ गुण मिळवून महाराष्ट्रात मुलींमध्ये पहिली तर एकूणात दुसरी आले. आणि फक्त ७ हजार रूपयामध्ये चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षक महाविद्यालयात प्रवेश

झाला. यासाठी मामा, मावशी, आत्या यांनी आर्थिक मदत केली आणि बघता-बघता त्यांचे बीपीएड पूर्ण झाले. त्यावर्षी मी पुन्हा क्रिकेटमध्ये पुणे विद्यापीठ संघाचे नेतृत्व केले आणि पुणे विद्यापीठाला अखिल भारतीय स्तरावर द्वितीय स्थान मिळवून दिले. नंतर एम.पी.एड. करण्याचा विचार केला पण घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी मला नाही सांगितले. कारण दोन वर्षाचा खर्च जवळपास एक लाख रूपये होता ते शक्य नव्हते. मग हार न मानता दप्तरे जुन्नर येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत गेले. त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. माझे क्रिडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व शिकण्याची इच्छा पाहून शैक्षणिक कर्ज मंजूर झाले आणि मी एमपीएड ला प्रवेश घेतला नंतर तेथील प्राध्यापिका डॉ.श्रध्दा नाईक म्हणाल्या, सुरेखा तू मैदानावर खूप चांगली आहेस परंतु तुला आत वर्गात पण तेवढेच लक्ष द्यावे लागेल. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास चालू केला. सुरेखा दप्तरे म्हणतात, आज मी जे काही क्रीडा संचालक म्हणून आहे त्या यशात नाईक मॅडमचा सिंहाचा वाटा आहे. प्रथम वर्ष संपल्यानंतर मी सेटचा अभ्यास चालू केला, त्यातच मला पुण्यातील एस.एस.पी.एम.एस. मिलीटरी स्कूलमध्ये हॅण्डबॉल कोच म्हणून पार्टटाईम नोकरी मिळाली. लगेच पंधरा दिवसांनी आझम स्पोर्टस् ॲकेडमी येथे ॲथलेटिक कोच म्हणून नोकरी मिळाली. सकाळी ६ ते ७ हॅण्डबॉल कोचिंगनंतर साडेसात ते दहा वाजेपर्यंत ॲथलेटिक कोचिंग करून दुपारी १ ते ५ कॉलेज व नंतर अभ्यास असे माझे चालू होते.

तेवढ्यातच मला एस.एम. चौकसी ज्युनिअर कॉलेजचे तासिका तत्वावर नोकरी मिळाली. मग मी हॅण्डबॉल कोचिंग सोडून दिल आणि जास्तीत जास्त लक्ष मी सेट परीक्षेच्य अभ्यासावर दिले, पण पहिल्या व दुसऱ्या प्रयत्नात अपयशी झाले, पण तरी हार न मानता मी अभ्यास चालू ठेवला व त्यातच माझे एमपीएड पूर्ण झाले. मी फस्ट क्लास विथ डिस्टींक्शन ने पास झाली. पुणे विद्यापीठात चौथी आली. पार्टटाईम नोकरी व अभ्यास यांच्या बरोबर पीएचडीची तयारी चालू केली. ४ जून २००८ रोजी सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या. तो माझ्या आयुष्यातील खुप मोठा आनंदाचा क्षण होता. २३ जून २००८ ला डॉ. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठातच पीएचडीला प्रवेश घेतला. प्रामाणिकपणे कष्ट करण्याऱ्यांना त्यांच्या कामाची पावती नक्की मिळते. कारण लगेच जूनच्या शेवटच्या आठवड्यात महात्मा गांधी विद्यामंदीर संस्थेची जाहिरात आली आणि नोकरीसाठी अर्ज केला आणि अखेर संस्थेच्या श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प येथे १४ ऑगष्ट २००८ रोजी क्रीडा संचालक म्हणून रूजू झाले. जेव्हा मी मालेगांवला आले त्यावेळी माझे गुरू स्व. मेजर एन.ए. रोकडे यांनी दोन गोष्टी सांगितल्या एक म्हणजे कधीही फुकटचा पगार घ्यायचा नाही आणि दुसरी म्हणजेच कधी कुणावर अन्याय करायचा नाही. हीच दोन तत्त्वे समोर ठेवून मी गेल्या बारा वर्षापासून काम करीत आहेत.


साद दे, साथ घे - प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद दे, साथ घे, अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या सम स्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य
महिला आयोग, मुंबई
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

# उंच माझा झोका...

**मोनीका मेहता यांचा जीवनप्रवास म्हणजे कुटुंबातल्या सर्व जवाबदाऱ्या अगदी आत्मीयतेने पार पाडून लहानपणी पाहिलेले नृत्य प्रशिक्षक व उत्तम ब्युटीशियन होण्याचे स्वप्न व त्याची पुर्ती होत असतांनाचा आनंदमयी प्रवास उल्लेखनीय आहे.**



मोनिका मनिष मेहता
नृत्य दिग्दर्शक
अहमदनगर
७९७२००१७०१

मोनीका प्रदीपकुमार मेहता (लग्नापूर्वी). अमळनेर प्रताप कॉलेज येथे माझे बी.ए. चे शिक्षण पूर्ण केले. घरची परिस्थिती साधारणच होती परंतू विशेष यांचे वाटते की आमच्या आईने किंवा वडिलांची कधीही ह्या गोष्टीची जाणीव होऊ दिली नाही. आम्ही तीन भावंडं आई-वडील, काका तीन आत्या असा परिवार होता. वडील एकटेच कमावणारे होते. आई खूपच कष्टाळू वृत्तीची, ती सर्वाचे खूप प्रेमाने करायची. माझी एक आत्या वडीलांपेक्षा मोठी होती ती आमच्यासोबतच असे. ती थोडी शांत, मंद स्वभावाची होती. आईने तिचा बहिणीप्रमाणे सांभाळ केला. त्यामुळे त्याग, प्रेम,जिव्हाळा याचे शिक्षण आम्हाला घरातच मिळाले.

शालेय जीवनापासूनच मला कलेची खूप आवड अभ्यास फक्त पास होण्यापूरता करायचे. गणित हा माझा अत्यंत आवडीचा विषय. स्व कष्टाने, मेहनतीने कुठल्याही प्रकारची ट्यूशन आम्हा भावंडानी न लावता अभ्यास केला व पास झालो. त्यात माझी दिदी व लहान भाऊ दोघेही अभ्यासात अतिशय हुशार, मी मात्र सॉफ्ट टॉईज बनवणे, क्रोशाचें विविध वस्तू बनवणे, मॅट तयार करणे, नवनवीन ड्रेस शिवून बघणे, कला अविष्कारातून नेहमीच काहीतरी नवे करत असे. रांगोळी मेहंदी, ड्रॉइंग नृत्यातही अतिशय निपून होते. लहानपणीच ठरविले. की खूप मोठी नृत्यांगणा किंवा ब्यूटी शियन होईल. फॅशन डिझायनिंग व ब्यूटीपार्लरचा एक वर्षाचा कोर्स (सरकारी ) करून त्यात विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी नाशिक, पुणे इथे कोर्स केला. अडचण नेहमी आर्थिक यायची परंतू त्याचे उत्तर देखील लवकच मिळायचे प्रश्न सुटायचे.

नंतर अहमदनगर निवासी मनिष मेहता यांच्या सोबत विवाह झाला व जीवनात एक नवीन प्रवासाची सुरूवात झाली. मनिष देखील माझ्याप्रमाणेच कलाप्रेमी होते. त्यांनी बी.बी.ए.क्यु.इंटेरीयर डिझायनिंगचा कोर्स केला. माझ्या लग्नानंतरही काही वर्ष थोडी संघर्षात गेली परंतू नंतर सर्वच समस्या दूर झाल्या व आमच्या संसारवेलीवर मनन व जैनम नावाची दोन फुले उमलली. मुलांचे पालन-पोषण, संस्कार, ही मी माझी प्रथम जबाबदारी मानते व त्यात कुठल्याही प्रकारची कमतरता राहु नये असाच प्रयत्न आम्ही केला. गेली १२ वर्षे मी कुठल्याच भाग न घेता फक्त माझ कुंटुब परिवार, यावर लक्ष दिले. मुलं स्वावलंबी झाल्यावर मी ब्यूटीशियनची प्रॅक्टीस सुरू केली.इतके वर्ष जरी मी कुठल्याही प्रकारची प्रोफेशनल तयारीत नव्हते परंतू कुंटुबात काहीही आनंदाचा प्रसंग असो मेकअप-डान्स बसवणे धार्मिक कार्यक्रम बसवणे व बक्षिस मिळविणे चालूच होते मी माझे स्वत:चे पार्लर चालू केले. मी केलेला मेकअप सर्वांना खूपच आवडू लागला हळूहळू मी एक प्रतिष्ठीत व नामांकीत ब्यूटीशियन म्हणून नावारूपाला आले.

एकदा एका नवरात्रीच्या दरम्यान मी बसविलेल्या

नृत्याला प्रथम बक्षिस मिळाले व मला बेस्ट डान्सरचे बक्षिस मिळाले व त्यांनतर अहमदनगर शहरात मी व माझी टीम जिथे कुठे पण गेली नेहमीच प्रथम क्रमाकांचे बक्षिस मिळे. नंतर जणू ही परंपराच झाली. माझे व नृत्याचे अतुट नाते निर्माण झाले. मी व माझी सखी ज्योती आम्ही एक डान्स ॲकडमी चालू केली आजपर्यंत आम्ही १००० लोकांना नृत्य शिकविले आहे. माझे दोन्ही स्वप्न एक चांगली नृत्यांगना व एक चांगली ब्यूटीशियन होण्याचे पूर्ण झाले. यात माझे कष्ट, माझी मेहनत चिकाटी, तर आहेच परंतू सर्वात महत्त्वाचे सांगायचे तर माझे जीवनसाथी, मनिष मेहता यांचे संपूर्ण सहाय्य ,मार्गदर्शन व संघर्षाच्या दिवसात. कठीण परिस्थिती नेहमी असलेला सकारात्मक दृष्टीकोन माझ्या संपूर्ण वाटचालीस कारणीभूत ठरला.

मला मिसेस संकल्प ऑफ द इयर अवार्ड, बेस्ट परफॉर्मर अवार्ड, बेस्ट डान्सर अवार्ड, डान्स, क्वीन अवार्ड, ब्यूटीशियन ऑफ द इयर अवार्ड असे अनेक पूरस्कार प्राप्त झाले. परंतू खंत एका गोष्टीची वाटते की ब्यूटीशियन असू द्या किंवा कोरीयोग्राफर असू द्या क्षेत्रात स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन वाईट आहे. म्हणजे ह्या क्षेत्राकडे थोडे तुच्छतेने बघितले जाते. परंतू मी नेहमीच प्रयत्न केला की प्रत्येक कला ही फक्त आणि फक्त सरस्वती मातेची उपासना आहे. कुठलीही कला आत्मसात करायला शेवटी तुमच्या चिकाटी व धैर्य लागते. व कला ही कलाच असते. ती कधीच प्रथम व दुय्यम नसते.

**महिलांनो तुमच्यासाठी ...**

## पोलिसांकडून मदत कशी मिळवावी ?

* महिलांनी त्यांच्याविरूध्द होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलिस ठाण्यास जावे.
* पोलिस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील. तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य दिली जाईल.
* विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पालिस ठाण्यात जा. पोलिस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलिस ठाण्यास त्वरित हस्तांतरित करतील.
* महिला जर लैंगिक गुन्ह्याचा बळी बसेल तर महिलांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती पोलीस ठाण्यास येऊन तक्रार देऊ शकते.
* महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्रकरिता १०९१ या हेल्प लाईनवर संपर्क साधा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद / जबाब नोंदवतील.
* महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक /मानसिक व्यंग असेल तर पोलिस दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद / जबाब नोंदवून घेतील. पोलिस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/तपासणीसाठी रूग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील.
* जर तुम्हाला आश्रय / निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलिस सहकार्य करतील. महिला पोलिस अधिकारी पोलिस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही. महिला सायबर गुन्ह्याबाबत सायबर सेलशी संपर्क साधू शकतात. एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलिस व महिला साक्षीदार असतात.
* महिला त्यांच्याप्रकरणी जिल्हास्तरावर पोलिस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात.

* संकलन- **सोनिका संदेश हजारे**

## जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !





**सौ.मोनिका रोहित शेटे**

नगरसेविका,
शिरपूर वरवाडे नगर परिषद

## जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !





**सौ.मोगराबाई जयवंत पाडवी**

सभापती - महिला व बालकल्याण,
जिल्हा परिषद धुळे





## जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !





## हार्दिक अभिनंदन !







**श्री.तुषार विश्वासराव रंधे**
(धुळे जिल्हा परिषद अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन)

**श्री.राहुल विश्वासराव रंधे**
(८ मार्च - वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा!)

## - शुभेच्छुक -



**सौ. सारिका निशांत रंधे**
(उ.विभागीय प्रदेशाध्यक्षा परिट समाज)

# जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

अत्यल्प दरात सर्व साईज मध्ये

**लॉकर्स**

सर्व शाखां मध्ये उपलब्ध



कृपया नजिकच्या शाखेशी संपर्क साधावा.

३६५ दिवस अविरत सेवा देणारी एकमेव बँक

**सर्व प्रकारचे कर्ज माफक व्याजदरात उपलब्ध.**

उपलब्ध सुविधा

- जिवन सुरक्षा विमा योजना
- पॅन/टॅन कार्ड/ई-टीडीएस
- व्यवसाय कर भरणा
- पी.एफ./ई.पी.एफ.भरणा
- प्रधानमंत्री जिवन-ज्योती विमा योजना
- फ्रँकींग सेवा-धुळे व शिरपूर शाखा
- ई-स्टॅम्पींग
- जनरल इन्शुरन्स्

**कामकाजाची वेळ :** सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजे पर्यंत
शनिवार,रविवार व सार्वजनिक सुटीच्या दिवशी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० वाजे पर्यंत

शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| शिरपूर | : (०२५६३) २५७१७३,२५११०९ | चोपडा | : (०२५८६)२२०२७७ |
| धुळे | : (०२५६२) २८०७८५,२८०५८५ | अमळनेर | : (०२५८७)२२२१७३ |
| जळगांव | : (०२५७) २२२७२३६,२२३५३८२ | शहादा | :(०२५६५)२२३१७३, |
| नाशिक | : (०२५३) २३११४०९,२२३२४०९ | भुसावळ | : (०२५८२)२२७०२२ |

## दि शिरपूर पिपल्स् को-ऑप.बँक लि.,शिरपूर

मुख्य कार्यालय : महाराजा कॉम्प्लेक्स् मेन रोड,शिरपूर जि.धुळे ☎ : (०२५६३) २५६२७१,२५७१७३,२५११०९



# जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



## कृषी उत्पन्न बाजार समिती,शिरपूर

मुख्य बाजार : शिरपूर जि.धुळे. फोन : (०२५६३) २५५००८, २५५६१४

प्रेरणास्थान व संचालक



मा.आ.अमरीशभाई पटेल

सभापती



मा.नरेंद्रसिंह सिसोदिया

उपसभापती



मा.इशेंद्र प्र.कोळी




**महाराष्ट्रातील कपाशी, भुसार, धान्य, भुईमूग शेंगा व गुरांची अग्रगण्य बाजारपेठ**

### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री.राजेंद्र साहेबराव पाटील | श्री.अविनाश गोपीचंद पाटील |
| श्री.अशोक गंगाराम पाटील | श्री.नरेश विश्वासराव पाटील |
| श्री.राजकुमार किसन मराठे | सौ.सविता पद्माकर देशमुख |
| सौ.दीपा दिनेश मोरे | ॲड.प्रतापराव हिंमतराव पाटील |
| श्री.हिरालाल रुपसिंग पावरा | श्री.सुकदेव खुमान भिल |
| श्री.युवराज गिरीषचंद जैन | श्री.मोहन पंडीत पाटील |
| श्री.शिवाजी गहिनाथ वाळूंजकर | मनोज चौधरी सहा.निबंधक |
| श्री.वसंत बुवा (प्र.सचिव) | श्री.चंद्रकांत पाटील (तज्ञ संचालक) |

# उंच माझा झोका...

**वनमाला पाटील यांचा खडतर प्रवास, आयुष्य संघर्षमय परंतू अबतक छप्पन म्हणजे छप्पन प्रकारचे प्रशिक्षण घेऊन समाजाला त्याचा उपयोग करून दिला एम.ए., एम. लीब पर्यंतचे उच्चविद्याविभूषित व्यक्तीमत्व, उत्तम लेखिका, भावूक कवियित्री, उत्तम नेपथ्यकार परंतू कमालीचा साधेपणा मनाला स्पर्शुन जातो.**



वनमाला यादवराव पाटील
समाजकारण
जालना
९५६१४९१००१

सारेच जन्मा येतात.माझी इच्छा नसतांना घातले देवाने जन्माला पण लक्षात आले की देवाला माझ्या कडून काही करून घ्यायचे असेल बरं.आले या धरेवर.

आईच्या माहेरी म्हणजे अस्ताने,तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक येथे माझा जन्म झाला.

मी तीन महिन्याची असताना आई शिक्षणाला गेली मला सोडून.आजी,मावशी,मामा यांनी सांभाळ केला. (तीन मामा व एक मावशी.)असे आई म्हणायची.माझी आई म्हणजे नक्षत्रच.कमालीची कुशाग्र,ती त्या काळी चौथी बोर्डात पहिली आलेली.आजही ते फुलपात्र,ग्लास,ताटं साक्ष देतात.

मी चारचौघात बरी होते सुंदर नाही पण ठिक.काळी सावळी,सडपातळ पण देवाने बुद्धीत मात्र उजव ठेवलं होत.आईला आम्ही तिघं. अग्रज दादा,मधला आबा,मी सगळ्यात अनुज.अवखळ वा–या आणि मी थोडेफार अंतर बस. पण लाड झाले की नाही काही कळलेच नाही.सार वेळेवर न मागता मिळायच.दादाचे माझे कधी जमलेच नाही अन् आबाच न माझ कधी भांडण नाही झालं.शाळा, अभ्यास, स्पर्धा, नविन आत्मसात...कारण घरची परिस्थिती जेमतेम म्हणावं तर ताई तात्या (आई वडील) त्या काळात गुरूजी अन् बाई होते माझ्या तात्यांनी कधीच खडू-फळा हातात घेतला नाही पण संपूर्ण बाराखडी व उजळणी,परवचे तोंडपाठ केल्याशिवाय एकालाही सोडले नाही.तात्या दिसतांच पोरं हातातील खेळ टाकून पोबारा.

सोबत गुण की संगत गुण मित्रांत शिरलेले तात्या आमच्या लग्नाच्या वेळी माणसांत आले.मग मात्र जबाबदारी समजताच तात्या वडिल झाले.वडिलांना सात बहिणी,दोन भाऊ,तात्या सर्वात मोठे.आई वाघीण होती सारे सरस्वतीच्या पावलाने झेलून जगाच्या जंगलात छावे घेवून जगत होती.बरेच सण दारूमुळे अशेच जात होते.

पण मुलं म्हणजे जीव की प्राण बरं.मी,मला तर ते तिसरा मुलगा समजत होते.मी सर्वात लाडकी होती.आईने मला खूप छान शिकवले.तिला वाटे मी खूप शिकावे.मी सातवी असतांना तिने माझा भरतकामाचा क्लास लावला.मी ही शिकले बरं. शेठ.के.डी.हायस्कूल येथे,कारणं ताईतात्या तळोदा येथे जि.प.शाळेत होते. तेथेच के.डी.हायस्कूलमध्ये दहावीपर्यंत शिकले.

दहावीत पहिली दुसरी नाही पण तिसरी आले.तेव्हा सारेच कडकच ना.बारावीला धुळे. खूपच अभ्यास असायचा. तिनंच मैत्रीणी. सायन्स होते माझे. पहिल्याच दिवशी प्रयोगशाळेत प्रवेश.ॲसीड ओतले लाकूड जळाले. काचेच्या बाटलीत विंचू सील बंद. दरदरून घाम आला. हातांतून बाटली सुटली पाठीवर दणका मिळाला पण झाशी राणीच आठवली हो. एक मुलगा होता आज तो इन्स्पेक्टर झालाय तो आम्हाला बेडकाच्या ऑपरेशनासाठी तेव्हा पंन्नास पैशाला बेडूक विकायचा,लय राग यायचा त्याचा

पण.कोणी वाटेला गेलं की त्याची सायकल पंक्चर झालीच तिघीच आम्ही सायकलीचे वॉल काढून भंगारवाल्याला देवून कुल्फी खायचो.पण पास झालो बरं

एवढं सार करत लग्नाची झाली मी.मला आईच्या आते बहीणकडे दिले.तेव्हा पंचाहत्तर हजार हुंडा दिला.सासऱ्यांनी काढून घेतले पैसे.बाकी डी.एड साठी ठेवले.माझी हळदीची साडी फक्त साठच रूपयांची होती. मी खूपच रडले तेव्हा वडील म्हणाले बरं मी भरपूर साड्या देतो ते पैसे काढून मगं जा लोकांचे बांध खुरपायला.मला मर्म कळले.झाले लग्न.आले इकडच्या घरी. येथे कोणाचाच कोणाला मेळ नव्हता.नवरा प्रकरण खूप सुंदर एवढच बसं.मला शेती माहीती नव्हती.बांधावरून पाणी भरायला जावे लागायचे चालता नाही यायचे.त्यात वा-याने ऊसांची सळसळ आली की हांडा फेकून नीट घरी.मला वाटायचं तेथून कोणीतरी चोर डाकुच येतोय.सकाळी उठल्यावर नवीनच काम सांगीतले म्हणे गायी म्हशीच शेण काढ. बरं मी उठली शेण काढायला गेली पण एवढ्या जवळून कधीच म्हैस पाहिली नव्हती म्हणून तिचे डोळे पहाताच मी चार दिवस तापाने फणफणले हो.मात्र सारे मन जिंकून मी वावरत होती.ऊस निंदायला जावं लागायचं. सारे अंग पाचटाने चिरले जायचे,हे पाहून आई लय रडायची.सासूबाई विहीरींच्या कामावरही पाठवायच्या परिक्षेत उतरले पण कैलासपती जरा विक्षिप्तच. डि.एड ला नंबर लागला.माझ्या पेक्षा जास्त मार्क सगळ्याना (दादा,वहिनी,भाची,हे न्

मी) वडिलांनी एकच शब्द वापरला आक्का पहा आता तुझी परीक्षा बरं.प्रवेश मिळाला तो पंधरा जानेवारीला परिक्षा होती सोळा एप्रिलला दोन महिने तर विषयच समजेना.आ वा सारे यक्ष प्रश्न. एकुण विद्यार्थी एकशे वीस...चॅलेंज होते.लागली अभ्यासाला पेपर दिलेत.निकाल लागला आठवं आश्चर्यच घडले एकशे वीस विद्यार्थी मधून फक्त तिनंच पास मी आणि दोन मुलं,टक्के जास्त नाही पण वारी नाही केली.पण नशीबाने पुढे साथ देणं बंद केलं अशात एक सुंदर राजकुमार जन्मा आला मोठे ऑपरेशन झाले.नांव बाळकृष्ण ठेवले.पाच वर्षे झालीत पण नौकरी नाही.सारे लागले पण सासू,नवरा सारखे भांडण नवरा प्रकरण लय महाग होत चालल होतं.माझ्या आईवडीलांचे कृपेने ते लागले. आणि बदफैली पणाने डोके काढले. दारू,पत्ते,बाई असे एकही वर्तन त्यांनी सोडले नव्हते फक्त हौस बाकी विपरीत कांहीच घेणं ना देणं,कुठेही मारझोड,मैत्रीणी घरी आणनं....मला कॉल आला नकाशा शिवाय जालना पाहीलेले नव्हते.सोबतीला कोणी नाही.मी नाही म्हटले,वडील म्हणाले अशक्य हा शब्द मुर्ख माणसांच्या शब्दाकोशात असतो.मी एकटीच आले.पास झाले नौकरीला ही लागले. मुलगा आईवडीलांनी सांभाळला.

आता समाज कार्य सुरू झाले.नवरोबा दुरावत आहे रे समजत होते...भुकेला,तहानलेला,अभ्यासाची भुक असलेला,गरीब सारे जवळचे झाले.सगळ्याचं मन सांभाळत मी प्रत्येक मनात आदराचे,विश्वासाचे घर तयार केले.इंगळी दोन पाय तुटल्यावरही चालतेच ना.सोबत शिक्षण करत गेले आईच्या हिंमतीमुळे.डि.एड,बी,एड,एम.एड,बी.ए , एम. ए, एम. लीब अजूनही बरंच.स्वच्छता अभियानात मी समाजाची आई,बहिण, मुलगी बनली व ऐंशी गावाच्या निर्मलग्राम पुरस्कार मिळवून दिला. महामहिम डॉ.अब्दुलजी कलाम यांचे राष्ट्रपती पारितोषिक अशोका हॉल दिल्ली येथे पुरस्कार मिळाला. समाजप्रबोधन करत असताना देहू ते पंढरपूर पायी वारी करून समाजाला अथक परिश्रमांतून समजावले. तेथेही मा.अशोकजी चव्हाण यांच्या हस्ते पंढरपूरला पुरस्कार मिळाला.आता कसून काम करते. मला आज पर्यंत बत्तीस पुरस्कार मिळालेत.मोफत कपडे दरवर्षी दहा विद्यार्थी,परिक्षा पॅड दरवर्षी शंभर, कापडी पताके दरवर्षी एक शाळा मी स्वतः शिवते.आज पर्यंत मी छप्पन्न प्रशिक्षण घेतले तसा सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून पुरस्कार आहे.नेपथ्य पुरस्कार ही ठरलेलाच असतो.

एक छोटी कल्पना होती,मी महाराष्ट्र माझ्या घरी बोलावले. गृप तयार केला.जिल्ह्यातून एक अशी प्रत्येक जिल्ह्यातील एक कवयित्री,साहित्यिक,गृहिणी,डॉ आहेत हिरकणी नाव दिलंय.गेल्या चार वर्षांपासून मी निशुल्क कवयित्री संमेलन भरवते.प्रातिनिधिक स्वरूपात संग्रह काढते तेही निशुल्क,पुरस्कार देते,आणि महत्वाचे म्हणजे कोणत्याही कार्यक्रमात माझी डावललेली हिरकणी मी

मनसोक्त स्टेजवर बोलावते.मोहरतात बिचा-या.पण एक आहे कमालीच्या हिरे,माणकं आहेत की ज्यांची कदर कोठेच नाही होतं.आज मी त्यांच्यामुळे नावारुपाला आहे.तेही कोणाची मदत न घेता एकटीच करते.ताईतात्या प्रित्यर्थ.अकरा पुस्तक प्रकाशित आहेत.थोडे परखड व्यक्तीमत्व आहे म्हणून फार काळ मैत्री टिकत नाही.त्यामुळे मला मैत्रीण नावाचा प्रकारच नाही.मनात साचलेल उद्रेक होवून कागदावर येतो किंवा रागात शीघ्र कोपावर जातो.एकलपणा आवडतो.माझे वैयक्तिक ग्रंथालय आहे त्यात किमान हजार पुस्तकं आहेत.माझा महत्वाचा आधार देवाने हिरावून घेतले आईबाबा. सारे असूनही मी पोरकी आहे.माझा एकच मुलगा माझे विश्व समजते.तोही मुलापेक्षा मित्रासारखे वागतो. त्याच्या मनातले ताबडतोब ओळतो. बीई होवून एम.टेक केलय सध्या तो विजयवाडा येथे पि.एच.डी करतोय. सुन शिकवली एम.टेक करून घेतले.नातू आहे दोन वर्षाचा.

महिलांना संदेश काय देणारं हो! तरीही सांगते आपला संसार आपल्याकडून सुधारत नाही मगं मी दुस-याचा संसार मी बिघडवला नाही या तत्वावर मी जगते.दुस-याला मोठेपणा देते.पटकन माघार घेते,उगाच उपदेश जमतं नाही, मी मनातलं देवाला सांगते,माझे काम मी स्वतः करते,मी कोणाला दोष देत नाही,हेवा करत नाही,कोण काय म्हणेल याचे घेणे देणे नाही.मी उत्कृष्ट साहित्यिकार, गायिका, नर्तक,वक्ता,शिंपी,संचयनी,स्वयंपाकी,तत्वाची भांडकुदळ, अध्यापिका,नाटककार,कथाकार एक किडनी नसूनही आणि हो हे सारे श्रेय मी फक्त माझ्या आईला व मुलाला देते.

**महिलांनो तुमच्यासाठी ...**

# सुरक्षितेचा मूलमंत्र ...

★ एखादा वाईट प्रसंग, घटना अनोळखी ठिकाणीच होते असं नाही. बरेचदा आपल्या पायाखालच्या, नेहमीच्या रस्त्यावरही होऊ शकते. Don't be Predictable! तीच वेळ, तोच रस्ता, तीच पार्किंगची जागा याचं रोजचं दळण दळू नका! घरून बाहेर पडल्यावर १०० पावलं वाचवून तुम्ही एखाद्या ठिकाणी लवकर पोहोचत असाल तर आठवड्यातून २ दिवस लांबचा रस्ता घ्या. १० मिनिटं लवकर निघा. मध्ये एखादं काम असेल तर ते काम करून वाट वाकडी करून इच्छित स्थळी पोहोचा! ऑफिसच्या ठिकाणी कधीतरी वेगळ्या ठिकाणी गाडी लावा. थोडक्यात, घरच्यांव्यतिरिक्त कोणालाही तुमची वेळ, जागा याचे वेळापत्रक माहित असता कामा नये. ★ कुठे निघालोय याची माहिती घरच्यांना प्रत्यक्ष, फोनवरून किंवा तेही शक्य नसेल तर Sms, Whatsapp वर कळवा.

रस्त्यावरून चालताना किंवा सार्वजनिक ठिकाणी फोनवर खाजगी, वैयक्तिक बोलणे टाळा. कुठे जाणार आहात किंवा कुठे राहणार आहात याची माहिती द्यायची असेल तर text मेसेज पाठवा. फक्त भिंतीला कान नसतात तर तुमच्या आजूबाजूच्या सगळ्यांना असतात आणि काही लोकं याचा गैरवापर करू शकतात. ★ फोन लवकर डिस्चार्ज होत असेल तर पोर्टेबल चार्जर सोबत घेऊन फिरा. तो वेळोवेळी चार्ज असेल याकडे लक्ष द्या. २५% बॅटरी असताना तसाच फोन घेऊन निघायची रिस्क घेऊ नका. २०% बॅटरी झाली तर पटकन उतरते आणि अगदी ५ मिनिटांमध्येही फोन बंद पडू शकतो. ★ अनोळखी ठिकाणी अंधार झाल्यावर शक्यतो जाणे टाळा.

★ तुमच्या ओळखीचा, नेहमीचा रस्ता असला तरी रस्त्यावरची लोकं, उभे राहणारे टवाळखोर लोकं यांच्यापासून आपल्याला काही होणारच नाही अशारितीने बिनधास्त राहू नका. (याचा अर्थ असा नाही, घाबरून राहा, पण ती लोकं सतत दिसत असतील तर सजग राहा.)

★ काळजी घेऊनही पाठून, समोरून हल्ला झाला तर बचावाच्या काही बेसिक टेक्निक शिकून घ्या. डोळे, जबडा, सेंटर पॉईंट अश्या जागांवर जोरावर मुक्का मारून तात्पुरती सुटका करून घ्या. हातपाय गाळून घाबरून धीर सोडू नका. नखं हे आपले हत्यार आहे. प्रसंग पडला तर चावा, नखं रुतवा, केस खेचा, त्यांच्या कानात जोरात किंचाळा पण स्वतःची सुटका करून घेण्याचे ध्येय ठेवा!

★ महिला सुरक्षिततेसाठी अनेक ॲप्स आहेत. असुरक्षित वाटलं तर लगेच त्याचा वापर करा. काही घडेल याची वाट बघू नका.

★ हल्ला झालाच तर महिलांच्या सेफ्टीकरिता बरीच प्रोडक्टसही बाजारात उपलब्ध आहेत. सतत एकटीने प्रवास करावा लागत असेल तर यापैकी कुठलेही एक साधन पर्समध्ये कायम ठेवावे.

- Women Safety electric torch
- Pepper Sprey
- Automatic Alarm Watch

हे सगळे ऑनलाईन मिळते.

✼ संकलन- **सोनिका संदेश हजारे**

# उंच माझा झोका...

**रजनीबाई लंगुसे स्वत: एक प्राध्यापिका, संघर्षमय जीवनप्रवास अनेक पुरस्कारांच्या धनी व पति-पत्नींची भांडणं कोर्टापर्यंत न जाऊ देता समुपदेशन करून त्यांच्यात प्रेम व जिव्हाळा निर्माण करण्याचे शब्दकौशल्य त्यांच्याजवळ आहे व युवकांपुढे एक आदर्श प्रस्थापित करण्याचे समाजकार्य ज्यांच्या जीवनाचे ध्येय आहे अशा आदर्श मुलगी, सून, पत्नी, आई व गुरू!!**



डॉ.रजनी नकूल लुंगसे
साहित्यीक
शिरपूर जि.धुळे
९७६३२३६४२२

स्त्री जन्माची अवहेलना होऊनरी फिनिक्स पंक्षाप्रमाणे भरारी घेणाऱ्या नारीशक्तीला मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ज्यांना त्यांच्या अस्तित्वाची अस्मितेची ओळख झाली त्यांनी स्वत: बरोबर कुटूंब, समाज आणि राष्ट्राचेही नाव उज्ज्वल केले परंतु कितीतरी स्त्रियांना त्यांचे जीवन कोणासाठी आहे. भान नाही हे आपण सभोवताली पहात आहोत.

माझा जन्म एका गावकीचे धुणे धुणाऱ्या परिटाच्या घरात झाला. आई-वडील जातीयतेच्या चटक्यामुळे शिक्षणापासून दुरच राहिले होते. आई-वडिलांना शिक्षण घेता न आल्याचे दु:ख होतेच पण त्यांनी निश्चय केला की आपल्या मुलांना तरी शिकवू. आईने अत्यंत कष्टाची कामे केली. धोब्याच्या भट्टी धुतल्या. प्रेस सुरू ठेवली, शेतीची कामे केली आणि आम्हा सर्व भावंडाना उच्चशिक्षित केले. म्हणूनच आम्ही उच्चपदावर नोकरी करू शकलो. माझे १०वी पर्यंन्तचे शिक्षण झाले. आणि माझ्या मोठ्या बहिणीसांरखाच विरोध मलाही झाला. काकांनी माझ्या लग्नाचा डाव घरात मांडला. पहिली संघर्षाची ठिणगी येथून पडली. वडिलांचा मृत्यू झालेला आई एकटी. मुलीला शिकू द्या म्हणून विनंती केली परंतू व्यर्थ ठरले. मी मात्र मोठ्या हिमतीने प्रश्न केला. उत्तर आले. मुलींनी शिकून काय करायचे आहे. शेवटी चूलच फुकणार ना, धोब्याचे कपडेचे धुणार ना! मी शांतपणे सांगितले. मी कपडेही धुईल. चूलही फुंकेल पण हातात पुस्तकही घेईन (१९७६) काका शांत बसणाऱ्यापैकी नव्हते. पुढे म्हणाले, मुली जास्त शिकल्या की (वाया जातात) बिघडतात. आई बापाच्या ताब्यात रहात नाही. मला हे ऐकून खूप रागही आला. परंतु राग करून चालणार नव्हते.

तुम्ही नाही म्हटले तरी मी शिकणार. मला खूप शिकायचे आहे. मी चुकली तरच तंगड्या तोडाव्या. काका तर उठून निघून गेले. आणि माझा शैक्षणिक प्रवास सुरू राहिला. माझा १९७८ ला पुणे येथे डी.एड. कॉलेजला नंबर लागला परंतु लग्नाचा ससेमिरा काही पाठ सोडत नव्हता. डी.एड. चे एक वर्ष झाले. परिक्षा सुरू होणार तोच वहिनीने एके दिवशी लग्नपत्रिका हाती ठेवली. वाचून पाहू कोणाची आहे. तर माझेच नाव लग्नपत्रिकेवर! क्षणातच सारे काही लक्षात आले की आता आपली सुटका नाही. माझ्या कसोटी आणि संघर्षाचा नवा अध्याय आता सुरू झाला होता. कोणालाही, कसलाही प्रतिकार करायचा नाही. परंतु आपले ध्येय मात्र गाठायचे हा संकल्प ठरविला. आणि परिक्षेचा अभ्यास आणखी जोराने सुरू केला. हि बातमी-कॉलेजला पोहचायला वेळ लगला नाही. मॅडम विचारू लागल्या कसे काय करणार? मॅडम मी ठरवले आहे की या बोर्डावर तुम्हाला माझे नाव पहिल्या क्रमांकावर दाखवायचे आहे. पुणे वाडिया कॉलेजला पहिला नंबर माझाच असेल. मी माझ्या मैत्रिणीच्या लग्नाला जाणार आहे. काळजी करू नका. आणि खरोखर तसेच झाले मी प्रथम आले. पेपर झाले त्याच दिवशी रात्री पुण्याहून बसले शिरपूरला सकाळी आठ वाजला पोहचले. नऊ ला साखरपुडा

व हळद दहा वाजेला लग्नही लागले. नवरी असून हाताला मेंदी नाही. मेकअप नाही. भरजरी शालूही नाही (बस्ता १५००/-रू) आणि लग्न लगले. झाले लग्न नवरा बायकोचे नातेही न कळणाऱ्या, शिकण्यांची वेडी जिद्द मनात असणाऱ्या लग्नाच्या पवित्र बधनांत बांधली गेली पण मनाशी अस्वस्थता आणखी वाढली. आता पुढील राहीलेले डी.एड. चे वर्ष पूर्ण करणे. पुन्हा झेप घेतली पुन्हा सर्वांची परवानगी मिळवली. वर्ष निघाले डी.एड. पूर्ण करून पुन्हा शिरपूरात. पुन्हा अस्वस्थता. पुढील शिक्षणासाठी बेचैन होणे सुरू झाले. निसर्गानियमानुसार संसारात मातृत्वाची चाहूल लगाली. माझी मुलगी दोन महिन्याची झाली आणि मनात पुन्हा शिक्षणाचे वादळ घोंगावू लागले. माझ्या पतीजवळ विषय काढला. मला खूप शिकायचे आहे. मदत करणार का? होकार तर एका क्षणातच आला. जे सहकार्य पतीचे मिळाले ते कधी थांबलेच नाही. त्यांचेही उच्चशिक्षण पूर्ण झाले. प्रत्येक पुरूषाने आपल्या पत्नीला असेच सहकार्य केले तर जीवनात आनदंच येईल. आमचे प्रेरणास्थान मा.ज्यो.फुले आणि सावित्रीबाई फुले होत्याच पण त्याबरोबर कर्मवीर व्यकंटराव रणधीर सर्वांचे अण्णाबाबा खानेदशातील शिक्षणमहर्षी यांचे लक्ष आमच्या शिक्षणावरही होते. मी बी.ए. फर्स्ट इयरला प्रवेश घेतला तेव्हा माझी मुलगी फक्त २ महिन्याची होती, आणि पी.एच.डी. पूर्ण होऊन मला डॉक्टरेट मिळाली २००५ त्याचवर्षी माझ्या मुलगी डॉक्टर झाली. मला दोघी मुलीच नाही तर आमचे एकत्र कुटुंबात पाच मुली आहेत. त्याचेही उच्चशिक्षण एकत्र कुटुंबामुळेच होऊ शकले.

समाजातील अस्थिरतेचा आरोप कुटुंब सांभाळूनही महिलांतवरच होत आहेत. कुठेतरी हे थांबायला हवा हे द्या सर्वांचा विचार करून मला जे शक्य आहे ते मी कुटुंबासाठी, समाजासाठी करणार असे ठरवले पाहिजे. गेल्या ५-६ वर्षापासून मी समुपदेशनाचे काम करत आहे. अल्पशा कारणाने पती-पत्नीची होणारी भांडणे त्यांना कोर्टापर्यंत पोहचवत आहेत. सासर-माहेरची मुला-मुलीची दोन्ही परिवार कोर्टामुळे हैराण होत आहे. हे बघून मी स्वेच्छेने हे काम करत आहे. त्यात मला ५-६ केसेस सोडवण्याचे समाधानही आहे. त्यांची मूले आई बाप असूनही आईबापा शिवाय न राहता एकत्र आल्याने आई-बापाचे प्रेम घेत आहेत. कुटुंबाला स्थिर करण्यात प्रत्येकाने सहकार्याची भावना ठेवायला हवी. भाकरीला चटका लागू नये ती करपू नये म्हणून काळजी घेणाऱ्या स्त्रीने आपल्या लेकंराचे मनही बेचैन होऊ नये यासाठी काळजी घ्यायला हवी. आई तर फक्त प्रेम आहे. आई वडिलांना सांभाळण्याची तयारीही मुलींनी दाखवायला हवी स्वत: मी सुद्धा माझ्या आईचा सांभाळ वृध्दापकाळ पावेतो करून तिला शेवटचा अग्नीडागही दिला आहे. स्मशानात जाऊ नकोस स्त्रिया जात नाही असे सांगून मलाही अडवणाऱ्या स्त्रिया होत्यांच पण माझ्या आईला माझ्या हाताने अग्नी देणार हा माझ्या निश्चयही होता. आताच एक महिला (शिरपूरमध्ये) सौ. चव्हाण ताईनी त्यांच्या सासूची सेवा केली आणि अग्नीडागही त्यांनीच दिला खरोखर जीवनातले हे फार मोठे मानसिक परिवर्तन आहे.


मासिक **शिक्षण यात्री**

## मालकी हक्कासंबंधी व इतर माहिती बाबत

## निवेदन

फॉर्म नं.४ (नियम ८ पहा)

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | : ३४,क्रांतीनगर, १ली गल्ली, शिरपूर,ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५ |
| २) मालक प्रकाशक संपादक | : शैला नंदकिशोर हजारे |
| ३) मुद्रक | : सतिष कमलसिंग गिरासे, यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे |
| ४) भारतीय नागरीक आहे काय? : होय. | |
| ५) पत्ता | : ३४,क्रांतीनगर, १ली गल्ली, शिरपूर,ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ |

मी शैला नंदकिशोर हजारे याद्वारे जाहीर करीते की, वरील माहिती माझ्या समजूतीप्रमाणे व माहितीनुसार खरी आहे. दि. ७/३/२०२०

शैला नंदकिशोर हजारे

# उंच माझा झोका...

**अनुपमा तवर उत्तम गृहीणी, उत्तम कवियित्री, एम.ए, बी.एड इंग्रजी विषयाची प्राध्यापिका व नगरसेविका, शिक्षण सभापती म्हणून राजकारणातील सक्रीय सहभाग त्यांनी नोदंविला. भरभरून जीवन जगण्याची कला जिच्या अंगी आहे तिचा हा सुंदर जीवनप्रवास....**



अनुपमा शरद तवर
शिक्षण/साहित्यीक
शिरपूर जि.धुळे
७७४३८७६९८४

मी अनुपमा शरद तवर. माझा जन्म ८ जून१९८३ ला मैंदाणे ता. साक्री या माझ्या मामाच्या गावी झाला. मी माझ्या आई वडीलांचे पहिले अपत्य. माझा जन्म एका सधन कुटुंबात झाला. सधन कुटुंब याचा अर्थ संपत्तीच नाही तर नात्यागोत्याने ही परीपुर्ण.आमचे मुळगाव थाळनेर ता. शिरपूर जि. धुळे. माझे वडील माझा जन्म झाला तेव्हा राष्ट्रीय महामार्ग अभियंता म्हणून कार्यरत तर आई गृहिणी होती.मला दोन बहिणी व एक भाऊ. घर नात्यांनी गजबजलेले होते आजही आहे. मला काका-काकू, आत्या, मामा-मामी, सात मावश्या असा मोठा परिवार आहे. दोन्ही परीवारातील आजी बाबांचा सहवास आजतागायत लाभलेला आहे. माझे नाव आईच्या काका-काकूंनी ठेवले आहे. या मोठ्या परिवारात संस्कारांचे धडे मिळाले आहेत.वडील सरकारी नोकरीत असल्या कारणाने त्यांची दर तीन-चार वर्षांत बदली होत असे व त्यामुळे माझे शिक्षण वेगवेगळ्या गावात व वेगवेगळ्या शाळेत झाले. आईवडिलांच्या प्रेरणेने मी बी.ए.(इंग्रजी),बीएड् चे शिक्षण घेतले. MHCIT (computer course) web page designing, DC ही मी याच काळात शिकले. यात अपूर्ण राहिले ते शास्त्रीय गायन. यात मी चौथी परीक्षा पास झाले आहे. लग्नानंतर मी माझे एम.ए. इंग्रजी चे शिक्षण पूर्ण केले आहे. लिखाणाची मला लहानपणापासून आवड आहे. आईवडीलांना वाचनाची आवड आहे.त्यामुळे ही आवड आमच्यातही रूजत गेली. आईवडीलांनी लिहण्यास वारंवार प्रोत्साहन दिले. तेव्हाही व आजही माझ्या कवितेचे ते पहिले वाचक आहेत. मी पहिली कविता पाचवीत लिहिली होती. महाविद्यालयात असतांना वेगवेगळ्या स्पर्धांना कविता व लेख पाठवण्याचा छंदच जणू लागला. आयुष्यातल्या प्रत्येक कठीण प्रसंगात माझा परीवार माझ्या सोबत आहे.

माझे लग्न जगदीश बाबुलाल रोकडे यांच्याशी झाले. आमचे गाव उंटावद ता. शिरपूर जि. धुळे. माझ्या आयुष्यात सिंहाचा वाटा असलेले जगदीशराव उच्च शिक्षीत, मेहनती आहेत.जगदीशराव डॉ.पा.रा.घोगरे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून नोकरीला आहेत. आम्हाला दोन मुले सोहम आणि निलभ. घरच्या प्रत्येकानेच साथ दिली व मी ही २००९ या वर्षी डॉ. पा. रा. घोगरे कनिष्ट महाविद्यालय शिरपूर येथे शिक्षिका या पदावर रुजू झाली. किसान विद्या प्रसारक संस्थेच्या या परीवारात मी ही जोडले गेले.

कि.वि.प्र. संस्थेचे प्रणेते व्यंकटराव रंणधीर यांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी ठरले आहे. त्यांनी तळागाळातील मुलांसाठी शिक्षणाची दारे उघडल्यामुळे त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडला आहे. तसेच अध्यक्ष मा. डॉ. तुषारभाऊ रंधे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सतत कार्यरत असतो व त्यात आम्हाला तोलामोलाची साथ लाभली आहे ती म्हणजे रोहितभाऊ रंधे यांची.आमच्या या परीवाराने मला फक्त नोकरीच नाही दिली तर मान- सन्मान, प्रतीष्ठा हि मिळवून दिली. या परीवारात देखील मी कुणाची सुन तर

कुणाची मुलगी अशा अनेक नात्याने मी वावरते. म्हणून काम करतांना कधी दडपण जाणवत नाही तर कधी कंटाळाही येत नाही.

निवडणूकिचा माझा पहिलाच अनुभव होता, हि संधी मला मिळाली ती मा.अमरीशभाई पटेल साहेबांकडून. खुप विचारांती मी निवडणूक लढवण्याचे ठरवले. जेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून नगरसेवक म्हणून निवडणुक लढवण्याची संधी मिळाली तेव्हा सर्वांचाच पाठिंबा मिळाला. या निवडणुकीत माझ्या सासर-माहेरच्या प्रत्येक व्यक्तीची अनमोल साथ मिळाली. शहरातून अनेक दिग्गजांचा पाठिंबाही मिळाला. आणि १२ डिसेंबर २०११ या वर्षी मी शिरपूर वरवाडे नगरपरिषदेमध्ये नगरसेवक म्हणून निवडून आले. येथे माझ्या आयुष्याला नविन कलाटणी मिळाली. येथून मी ज्ञानदानासोबतच समाजसेवेकडे वळले.या काळात मला नगरपालिकेचे व्यवस्थापन व कार्यपद्धती जवळून अनुभवता आली. येणारा निधी आणि त्यातून नगरपालिकेचे कामे यांचे व्यवस्थापन,त्याविषयीच्या अडचणी जवळून पाहायला मिळाल्या. शिक्षण सभापती म्हणून निवड झाल्यावर नगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे कार्य अनुभवता आले.एक स्त्री म्हणून काम करताना कुठेही तडजोड करावी लागली नाही. नगरसेवक हा नगरपालिका व लोकांमधला दुवा असतो. जो त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मदतगार ठरतो. या पदामुळे प्रभागातील लोकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करू लागले, तळागाळातील लोकांचे प्रश्न समजून सोडवण्याचा प्रयत्न करू लागले. लोकांच्या सुखदुःखात सामिल झाल्याने जनसंपर्क वाढला.शिक्षणक्षेत्रात असल्यामुळे दारीद्र्य रेषेखालील मुलींना शिक्षणप्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. २६ जानेवारी या दिवशी जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप आम्ही करतो. उंटावद येथे विद्यार्थ्यांसाठी वाचनालय उघडले आहे. जेणे करून गावातल्या गावात पुस्तके वाचायला मिळतील. वाचनाची आवड निर्माण होईल.या पुढेही मला माझ्या क्षेत्रात कार्य करायचे आहे.

म्हणूनच लहानपणाची लिखाणाची आवड मी आजही जोपासते. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या किंवा अनुभवनाऱ्या घटनांना मी माझ्या लेखनीने माझ्या भावना वहित रेखाटते. आता तर कवितेच्या अनेक प्रकारांचा मी अभ्यास करून त्या प्रकारात कविता करू लागली आहे. माझ्या कविता हायकु, अष्टाक्षरी, पंचाक्षरी, प्रणु चाराक्षरी, अभंग, षडाक्षरी, दशाक्षरी,अनुत्तम कविता, दर्पण काव्य प्रकार, नसंपणारी कविता,मुक्त छंद, चारोळी या सारख्या प्रकारात आहेत. खरं तर हे लिखाण माझ्या पर्यंतच मर्यादित होते. परंतु डॉ. रजनी लुंगसे मॅडम, माझ्या मैत्रिणी, वनमाला पाटील, शिल्पा जैन व माझे पती जगदीशराव यांच्या प्रोत्साहनामुळे मी परत वेगवेगळ्या कविता/ लेख यांच्या स्पर्धेत सहभागी होऊ लागले व आज मला माझ्या स्वतःच्या या कलेसाठी 'सावित्रीच्या लेकी' हा पुरस्कार ओतुर येथे एप्रिल २०१९ ला मिळाला तर हिरकणी पुरस्कार बहुउद्देशिय संस्था लातूर यांच्या कडून मिळाला व माझ्या लेखणीला अजूनच धार मिळाली. मी 'Story Mirror app' bm माझ्या कविता प्रकाशित केल्या, तेथे सुरवातीला मला literary captain नियुक्त करण्यात आले होते व सध्या literary colonel म्हणून नियुक्ती झाली आहे.

मैत्रीणींनो कुणाच्या आयुष्यात अडथळे नाहीत. प्रत्येकीचे आयुष्य खडतर आहे. आज सावित्रीबाई फुलेंच्या प्रयत्नांमुळे आपण शिक्षण घेऊ शकत आहोत व नोकरी, व्यवसाय या निमित्ताने घराचा उबंरठा ओलांडून बाहेर पडलो आहोत. पण यामुळे आपल्या समोरील समस्या वाढल्या आहेत. या समस्यांना आपण धैर्याने सामोरे जायला हवे. आपल्यातला आत्मविश्वास वाढवायला हवा. वाचन, लिखाणाने आपण आपला आत्मसन्मान जागृत करू शकतो. स्त्री ही जगाची निर्माती आहे. सृजनशीलता हे कौशल्य आपल्यात आहेच. त्याचा उपयोग आपण आपल्या व्यक्तीमत्व विकासासाठी करू या. स्त्री ही स्वतःच One Man army आहे. आपले चारित्र्य तिचा आरसा आहे. आपला परीवार आपली ताकद आहे. मैत्रीणींनो लिखाणामुळे आत्मपरीक्षण करता येते. धाडसाने येणाऱ्या कठीण प्रसंगांना सामोरे जाता येते.सकारात्मक दृष्टीकोण वाढतो. चला सखीनों आपणच आपला सर्वांगिण विकास करू या आणि सबळ बनु या.

# उंच माझा झोका...

**सुचिता सिसोदीया स्त्रीयांसाठी, त्यांच्या हक्कांसाठी, त्यांना त्या हक्कांची व त्यासाठी असणाऱ्या कायदयांची ओळख करून देऊन स्वत: प्रयत्नशील असून स्वत:च्या शिक्षणाचा केवळ पैसे कमवणे उद्देश न ठेवता सामाजिक बांधीलकी म्हणून स्त्रीयांना न्याय मिळवून देण्यासाठी सदा तत्पर अशा वकील.**



ॲड.सूचिता सिसोदिया
ॲडव्होकेट
औरंगाबाद

स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक भारताच्या राज्य घटनेने स्त्रियांचा समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला स्त्रिया तसेच अन्य दुर्बल घटकांचे संरक्षण करण्यासाठी खास सवलती आणि कायदे करण्याची तरतूदही घटनेत केली गेली. जीवनाच्या सर्व अंगात स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्यात कायद्याचे महत्त्व आहे. विषमता, दारिद्र्य, पुरूषप्रधानता व पितृसत्ताकता, जातीभेद, वर्णभेद, वंशभेद, धार्मिक तणाव यामुळे घटनेने दिलेली समानता प्रत्यक्षात येत नाही.यासाठी स्त्री विषयक कायद्यात काळाप्रमाणे बदल आवश्यक आहेत. मात्र केवळ कायदे न करता कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी कायदे पुस्तकात किंवा न्यायालयापुरतेच मर्यादित राहता कामा नयेत. सर्वसामान्य स्त्रियांनाही त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव हवी. म्हणून पुढे सोप्या भाषेत विविध कायद्यांची माहिती दिली आहे.

**स्त्रियांच्या अनंत समस्या आहेत. कोणत्या कारणांखाली तक्रार करता येते?**

छेडछाड, शारीरिक जबरदस्ती,अपहरण, बलात्कार, मारहाण, व्यसनाधीनता नवऱ्याकडून मारहाण, मानसिक छळ , क्रुर वागणूक, भ्रूणहत्या, बालिका हत्या, अंधश्रद्धा, जाचक रूढींमुळे छळ, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, मुली देवाला सोडणे, बालिकांवरील अत्याचार, अनेक लग्ने व बाहेरखाली पणा जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे, युद्ध व दंगलींमध्ये होणारा स्त्रियांवरील अत्याचार, स्त्रियांचा आंतरराष्ट्रीय व्यापार, पतीने दुसरा विवाह करून सोडून देणे, छळाबद्दलची तक्रार कोणाकडे करायची.

१) पोलिस स्थानक : स्त्रियांना पोलिस स्थानकांपर्यंत मोकळेपणाने जाता यावे यासाठी पोलिसांना मुख्या प्रवाहात ३० टक्के आरक्षण ठेवून महिलांची भरती केली जात आहे व नवप्रविष्ट महिला पोलिस शिपायांना प्रशिक्षण दिले जात आहे.

२) स्त्री संघटना : पिडीत स्त्रीला आपली कैफियत मोकळेपणाने मांडता यावी यासाठी स्त्री संघटनांनी ठिकठिकाणी सल्ला केंद्रे, मदत केंद्रे सुरू केली. ही प्रक्रिया जगातील बहुतेक सर्व देशात सुरू झाली. कुटूंबातील प्रश्न सामोपचाराने सोडविले जावेत. त्याचबरोबर आपल्या प्राणांची किंमत देवून कुटूंब टिकविण्याची पाळी कुठल्याही स्त्रीवर येऊ नये हेही त्यामागील उद्दिष्ट आहे. अशारितीने कुटूंबातील समस्यांमध्ये स्त्री संघटनांनी एकप्रकारे सामाजिक हस्तक्षेपच केला गेल्या काही वर्षांच्या अनुभवातून हा हस्तक्षेप प्रभावी व्हवा आणि स्त्रियांच्या हिताचा दृश्य परिणाम लोकांना दिसावा यासाठी अनेक मार्गांचा अवलंब होऊ लागला.१) समुपदेशन : दोन्ही बाजूंशी विचारविनिमय करून सामोपचाराने निर्णय घेण्यासाठी केलेले प्रयत्न गृहभेटी इ. २) कुटूंबातील व्यक्तिंचे सहकार्य : मित्रपरिवार, शेजारी, व्यवसाय/कचेरीतील वरिष्ठ इ. चे सहकार्य. ३) कायदेशीर मदत : पोलिस ठाणे किंवा न्यायालय इथे दाद मागण्यासाठी मदत.

३) महिला आयोग : अनेकदा सगळ्या प्रकारचे प्रयत्न करूनही पिडीत स्त्रीला न्याय मिळत नाही. तेव्हा अशी महिला आयोगापुढे दाद मागू शकते.

# उंच माझा झोका...

**संगीता थोरात उच्चविद्याविभूषित, संसाराची कुंटुबाची जवाबदारी सांभाळून अनेक सामाजिक संस्थाच्या सदस्या, पूरस्काराच्या मानकरी व उत्तम कवियित्री यांनी जायन्ट्स क्लब, लायनेस क्लब व बालाजी सेवा समितीच्या माध्यमातून समाजकार्य केले त्याचा हा प्रवास......**



संगिता संजीव थोरात
समाजकारण
शिरपूर जि.धुळे
९८८१५६२५९९

माझा आजवरचा जीवन प्रवास कसा झाला? जीवनातील चांगले वाईट अनुभव ओलांडत मी इथवर कशी पोहचली.....माझा जन्म एका शासकीय कर्मचाऱ्याच्या घरात शिंदखेडा या गावी झाला. वडील मला नेहमी सांगतात तुझा जन्म झाला नर्सने सांगितले मुलगी झाली, तेव्हा सर्वात जास्त आनंद वडिलांना झाला त्यांनी सकाळी सकाळी तोंड न धुता जिलेबी खाल्ली आणि इतरांना वाटून आनंद साजरा केला. आम्ही दोन बहीणी आणि तीन भाऊ मी सर्वात लहान सगळ्यांचीच लाडकी. वडीलांची नोकरी समाधान कारक होती. तसेच गावाकडे शेती सुद्धा होती. त्यामुळे घरात सुख समृध्दी नांदत होती. गुरे, गाय, म्हशी असल्यामुळे दुध दुभत घरीच होत असे. वडीलांना नोकरी सोबतच समाज कार्याची देखील आवड होती. त्यात वडील लेखक , कवी, कथा, कांदबऱ्या, नाटक, एकांकीका, स्फूट लेखन करत त्यामुळे ते साहित्यीक म्हणून नावारूपाला आले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एम.ए च्या विद्यार्थ्यांना त्यांचे लेखन अभ्यासक्रमात सामील केले गेले आहे. वडीलांमुळे घरात लेखक, कवी अशा लोकांचे येणे जाणे असायचे वेगवेगळ्या विषयावरचे संवाद, चर्चा ह्या आमच्यात घरात व्हायच्या. त्यामुळे कालांतराने पुढे जाऊन मलाही साहित्य क्षेत्रात आवड निर्माण झाली.

वयोमानानुसार आजीही तब्बेत खराब झाली. वडीलांना भाऊ नसल्या कारणाने गावाकडील शेती सांभाळायची जबाबदारी आमच्यावरच येऊन ठेपली. त्यामुळे आमचं पुर्ण कुटुंब चिंचोली या मुळ गावी स्थलांतरीत झालं आणि माझं शिक्षण चिंचोलीतच सुरू झालं शेती व गुर ढोरांची जबाबदारी आईवर आली. बहिणच लग्न झालं असल्याने ती तीच्या संसारात रमली होती. त्यामुळे तीच येण जाणे सुख दुःखा पुरतेच होते. मी आता आईला घर कामात मदत करत असे तसेच शेतावर जाणे गायी, म्हशीचें दुध काढणे, त्यापासून दही, लोणी, तुप, ताक तयार करणे हे आईचे पाहून मी ही पारंगत झालं, भाऊ आणि सालदार हे बाहेरची काम करत वडील शेती खात्यातच नोकरीला होते. ते आठ दहा दिवसांनी घरी यायचे शेतीच्या आवश्यक सूचना द्यायचे आणि माझा अभ्यास कसा चाललाय ते शाळेत येऊन चौकशी करायचे.

माझी दहावीची परीक्षा झाली दहावीला चांगले मार्कस मिळाले घरात सर्वांना आनंद झाला. शाळेत कौतुक झाले शाळा, शेती घरकाम करत शाळेत होणाऱ्या प्रत्येक ॲक्टीव्हीज मध्ये मी भाग घेऊ लागले. शाळेतील सर्व मैदानी खेळ लंगडी, कबड्डी, खो-खो, १०० मीटर, २०० मीटर, धावणे यासारख्या स्पर्धा मध्ये भाग घेऊ लागले. प्राविण्य मिळवू लागले. अशातच एकदाची बारावीची परीक्षा दिली आणि मी बारावीत केंद्रात आणि चिंचोलीच्या शाळेत ही प्रथम आली. माझे नाव आजही शाळेच्या मेरीटलिस्ट बोर्डवर नोंदलेले आहे.

आता पुढे काय ? असा प्रश्न वडिलापुढे निर्माण झाला कारण चिंचोलीत शिक्षणाची सोय केवळ बारावी पर्यंतच होती. त्या पुढच्या शिक्षणासाठी तालुक्याच्या गावाला म्हणजे यावल ला जावे लागणार होते. म्हणून मग माझ्या शिक्षणाकरीता चिंचोली येथील सर्व पसारा आवरून पुढच्या शिक्षणासाठी आम्ही जळगांवला स्थायिक झालो. चिंचोलीची शेती आता वडिल जळगांववरून सांभाळू लागले. आणि माझा महाविद्यालयात प्रवेश झाला. चिंचोलीची शेती आता वडिल जळगांववरून सांभाळू लागले. आणि माझा महाविद्यालयात प्रवेश झाला. तो जळगांव येथील मुलजी जेठा महाविद्यालयात. येथे खेड्या गावातून शिक्षण घेऊन आलेली मी जळगावच सारेच वातावरण नवीन होते. अशातच प्रथम वर्षातच स्वामी विवेकानंद प्रतिष्ठाण कन्याकुमारी यांचे तर्फे कॉलेजला माझी एक नविन ओळख निर्माण झाली.

मध्यंतरी १२ वीच्या सुट्यामध्ये मला वाचनाचा छंद लागला वडील साहित्यिक असल्याकारणाने घरात वेगवेगळ्या विषयाची पुस्तके असत वडीलांचे लेखन कथा, कविता लिहू लागले. ते न्युजपेपर, मासिक कॉलेजच्या मॅग्झीन यांत प्रसिध्दीस देऊ लागले. अशा तऱ्हेने मी माझा हा छंद अभ्यासा बरोबर जोपासू लागले. महाविद्यालयातील स्नेहसंमलनातून काव्य वाचनाच्या प्रोग्रमात माझ्या कविता सादर करू लागले. अशातच अमळनेर प्रताप कॉलेजला अर्थशास्त्राची एक परिषदेत मी भारतीय अर्थव्यस्थेत महिलांचे स्थान या विषयावर एक निंबध सादर केला. तिथे देखील सर्वांनी माझे कौतुक केले. आणि महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागात मी नावा रूपाला आले.

साहित्य क्षेत्रात आता जास्त आवड निर्माण झाली होती. त्यातच १९९६ साली विद्यार्थ्यासाठी प्रथमच प्रतिभा संगम अमळनेर येथे झाले. त्यात माझ्या कवितेला बक्षिस मिळाले.

अशा तऱ्हेने महाविद्यालयातून माझा अर्थशास्त्राचा अभ्यास आणि साहित्य क्षेत्रातील वाटचाल सुरू होती. यातूनच मग पुढे मला दलित साहित्य अकादमी दिल्ली यांच्या तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप अवार्ड १९९७ हा पुरस्कार उपराष्ट्रपती शंकर दयाला शर्मा यांच्या हस्ते ताल कटोरा स्टेडियम दिल्ली येथे मला मिळाला. अर्थशास्त्रात एम.ए.ची पदवी प्रथम श्रेणीत मिळाली. त्याच वर्षी शिरपूरच्या थोरातांकडून लग्नाची मागणी आली. आणि लग्न करून मी शिरपूरकरांची सून झाली.

त्यांचा बांधकाम व्यवसायात बऱ्यापैकी जम बसला होता मुले आता थोडी मोठी व्हायला लागली होती. अशातच सासू सासऱ्याचा आग्रह होता की, सर्वाचे घर बांधून झालीत आता तुम्ही स्वत:साठी देखील घर बांधा त्यानुसार आम्ही स्वत:साठी घर बांधले आणि नविन कॉलनी परीसरात रहायला आलो. मुलांचा आता जास्तीत जास्त वेळ शाळेत जात होता पतीचाही व्यवसायातील व्याप वाढल्याने ते देखील जास्तीत जास्त वेळ घराबाहेर राहू लागले. त्यामुळे मला आता बऱ्यापैकी रिकामा वेळ मिळू लागला. आता या रिकाम्या वेळात आपण काय करायंच काहीच सुचत नव्हते शिक्षित मन मला स्वस्थ बसू देत नव्हते. आणी अशातच एक नविन संधी चालून आली. ती म्हणजे शिरपूरचे सर्वे सर्वो आदरणीय भूपेशभाई पटेल यांनी शिरपूरच्या महिलांसाठी त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सर्व जाती धर्माच्या महिलांना एकत्र करून बालाजी सेवा समितीची स्थापना २००८ साली केली त्या समितीचे सचिव या पदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली त्यामुळे पुन्हा एकदा समाज कार्य करण्यासाठी एक चांगले व्यावपीठ मला मिळाले. बालाजी सेवा समितीच्या माध्यमांतून मग आम्ही वेगवेगळे सामजिक उपक्रम राबवू लागलो. त्यात वयात येणाऱ्या मुलीसाठी मिशन पिंकहेल्थ हा उपक्रम वर्षेभर वेगवेगळ्या शाळेतील मुलींसाठी राबविला, महिलासाठी आरोग्य शिबीर घेतले. शाळा कॉलेजातील मुलांसाठी रोड सेप्टी प्रोग्राम घेऊन मार्गदर्शन केले. महिलांना आपले सण, उत्सव एकत्र करता यावे यासाठी गणेश उत्सव, गरबा यासारखे सण साजरे करून आपली संस्कृती जपण्याचे कार्य केले. बालाजी सेवा समितीमधील माझे कार्य बघुन मला जायण्टस इंटरनॅशनल गृप मध्ये या अशी विचारणा बिनविरोध निवड झाली. जायण्टस गृपच्या माध्यामातून देखील वर्षेभर मी खूप कामे केली त्यात वृक्षारोपण, आरोग्य शिबीर, अंधश्रध्दा निमुर्लन

प्रोग्राम, वाघाडी गावात गरीत आदिवासी १०० महिलांना साडी वाटप, उत्तराखंड येथील पुरग्रस्तांच्या आपत्ती निवारणासाठी मदत फेरी काढून ५१ हजारांचा चेक प्रांताधिकारी यांना सुपुर्द केला. आणि शहीद जवानांच्या कुटुंबियांना २१ हजारांचा निधी गोळा करून देण्यात आला. बेटी बचाओ अभियांनाअंतर्गत पोस्टर प्रदर्शनाद्वारे जनजागृती, वाघाडी गावात पाणपोईची व्यवस्था केली. तसेच जायण्टस सहेली गृपतर्फे महिलांसाठी विविध कार्यक्रम घेतले. वर्षभरातील सर्व विविध कार्यक्रमाची दखल घेऊन जायण्टस् गृपने आपल्या विभागातील सर्वोत्कृष्ठ अध्यक्ष म्हणून मला सन्मानीत केले.

हे सामजिक कार्य करीत असतांना अडचणी अशा काही आल्या नाही पण प्रत्येक क्षेत्रात चढाओढ स्पर्धा ही असतेच परंतु मी इतके काही मनावर घेतलं नाही कारण कुणाची मन दुखवून, स्पर्धा करत प्रसिध्दी मिळवण्यासाठी माझ कार्य नव्हते. माझ्यासाठी माझ कुटुंब हे केंद्रस्थानी होते आणि उरलेल्या रिकाम्या वेळात मला माझ्या हातून काहीतरी समाजकार्य घडावे आपण घेतलेल्या शिक्षणांचा कुठेतरी उपयोग व्हावा हाच उद्देश असल्याने काही अडचणी आल्या तरी त्या मला अडचणी जाणवल्या नाही. माझं कार्य आज ही कुठल्याही सन्मानासाठी पुरस्कारासाठी अपेक्षा न करता चालू आहे. आता मुले मोठी झाली. मुलगा २१ व्या वर्षीच सार्वजनिक बांधकाम विभागात इंजिनियर म्हणून पनवेल येथे कार्यरत आहे. मुलगी देखील सिव्हील इंजिनिरींग करत आहे. तरीही आजही बऱ्याच ठिकाणी विविध सेवाभावी संस्था, समित्यामध्ये सक्रीय सहभाग आहे. जसे लायन्से क्लब, सखीमंच शिरपूर दक्षता समिती, नुकत्याच शिरपूर नगरपालीकेने राबविलेल्या स्वच्छता अभियांना अंतर्गत होम कॉम्पोस्टींग चा प्रोजेक्ट करून स्वच्छता अभियानात माझा छोटाचा सहभाग नोंदविला. त्यांचे प्रशस्ती पत्रक शिरपूरच्या नगराध्यक्षा सौ.जयश्रीबेन पटेल यांच्या हस्ते मिळाले.

या सर्व कार्याचा उद्देश इतकांच की कुटुंब सांभाळून मिळालो वेळ सत्कारणी लागावा व माझ्याहातून चांगले समाज कार्य घडावे. यातून मी महिलांसाठी इतकाच संदेश देऊ इच्छितो की कुटुंब सांभाळून आपल्याला जो काही वेळ मिळतो त्यातून थोडातरी वेळ समाज कार्यासाठी द्यावा. आजची सामजिक परिस्थिती पाहाता स्त्रिया आणि मुलीवर होणारे अन्याय आणी अत्याचाराचे प्रमाण हे वाढत आहे. त्याच बरोबर घटस्फोटाचे देखील प्रमाण वाढलं आहे. या मागे आम्ही महिला कुठेतरी आपल्या घरातील मुलांना संस्कार द्यायला कमी तर पडत नाही ना? याचे आत्मपरिक्षण केले पाहिजे. महिलांनी जरूर त्याबरोबरच त्यांनी आपल्या कुटुंबाकडे ही तितकेच किंवा त्याहीपेक्षा जास्त लक्ष द्यावे कारण महिला ही त्या कुटुंबासाठी त्या घराचा कणा असते. पुढची सक्षम आणी चांगली पीढी ही महिलाच घडवू शकते.


प्रेरणास्थान



मा.आ.अमरीशभाई पटेल

आमोदा परिसर तेलबिया उत्पादक सहकारी संस्था मर्या.शिरपूर

चेअरमन



मा.यशवंत प.बाविस्कर

व्हा.चेअरमन



मा.अशोक कलाल

संचालक मंडळ

श्री.राजेंद्र गुलाबराव पाटील, श्री.सर्जेराव डिगंबर पाटील, श्री.हिंमत सीताराम धनगर, सौ.कल्पना नाना कोळी, सौ.प्रेमलता सग्रामसिंग राजपूत, श्री.सत्तारसिंग दुर्गा पावरा, श्री.काशिनाथ नारायणसिंग राऊळ

सर्व कर्मचारी वृंद

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

बाबुराव वैद्य मार्केट, शिरपूर जि.धुळे




जागतिक
महिला
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा !

**सौ.रेखा सोनू सोनार**



नगरसेविका
शिरपूर वरवाडे नगरपरिषद




जागतिक
महिला
दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा !

**सौ.अमृता मनोज महाजन**



सचिव : महात्मा फुले होमीयोपॅथिक कॉलेज,शिरपूर




# जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

गटनेते



**मा.दादासो.देवेंद्र पाटील**
सदस्य : जि.प.धुळे

सरपंच



**सौ.मनिषा देवेंद्र पाटील**

उपसरपंच



**श्रीमती साहेबकोर गुमानसिंग राऊळ**

**सदस्य**

श्री.भास्कर नामदेव पाटील
श्री.सुधाकर सुरेश पाटील
श्रीमती बानुबाई हिरामण भील
श्रीमती आरस्तोलबाई पुंडलिक पाटील
श्री.नारायण पंडित पाटील
(सह सल्लागार सदस्य)

श्री.एकनाथ रामदास वाघ
श्री.हिरामण फडा भील
श्रीमती सोनाली किशोर कुवर
श्रीमती अनुसयाबाई भगवान पवार
श्री. नामदेव भटा अहिरे
(सह सल्लागार सदस्य)

मुश्ताक अली सबदर अली
श्री.अशोक गोरख पाटील
श्रीमती हिराबाई सुरेश कोळी
श्री. आनंदराव पाटील
(ग्रामसेवक)

**ग्राम पंचायत करवंद,**
**ता.शिरपूर जि.धुळे**